That name has saved crores and crores of people,
And has made them to sit down in Vaikuntha.
There is nothing in the universe so real as this name,
What, do you not remember it in your mind?
Tuká says,—'That name is above the reach of the Vedas,
But Gopála has given it to us without price.'"

A "crore" is ten millions. "Vaikuntha" is the heaven of Vishnu. "Gopála" is a name for Krishna.

The following specimen contains a denunciation of the idleness of the external ceremonies practised at one of the periodical festivals of the Hindus.

(19.)

"When Jupiter enters Leo, the barbers and the priests enrich themselves;
In the mind are millions of sins,
But externally the man shaves his head and his beard.
What is shaved, that is removed,
But tell me, what is altered in the man?
His vices are not changed,
Which would be the sign of the removal of his sin.
'Without faith,' says Tuká, 'all is in vain.'"

(20.)

"This is called 'sin'—if doubt remains in the mind;
In the mind itself are both merit and guilt.
The highest good consists of noblest thoughts.
As is the seed, so are the fruits,
Excellent or inauspicious.
Tuká says,—'to purify the mind, that is good.'"

The following specimen contains one of Tukáráma's summaries of morality.

(21.)

"Having gathered wealth by honest trade,
One should spend it with justice.
He alone will obtain an excellent end,
And will enjoy an excellent banquet,
Who does good to others, and knows not how to reproach them;
To whom others' wives are ever as sisters and mothers;
Who is merciful to the creatures, and cherishes cattle;
And in the desert gives water to the thirsty;
Who is calm and never blames any,
And exalts the dignity of his elders.
Tuká says,—'This is the fruit of A'shramas.
The climax of asceticism.'"

The "A'shramas" are the four divisions of a Bráhmana's life—bachelorhood, housekeeping, retirement, mendicancy.

Perhaps Tukáráma's highest moral flight is contained in the following specimen.

(22.)

"He who calls those his own
Who are vexed and troubled,
He should be recognized as a saint,
God surely must dwell with him.
He that takes to his heart
One who has no protector,
And shows to his servants
The same kindness, which he shows to his sons,
Tuká says,—'Beyond all expression, he is the image of God.'"

The next is a declaration of indifference to worldly circumstances.

(23.)

"At one time one may carry water,
At another time one may repose on a couch.
As occasion comes, so must one be,
At one time many dishes,
At another time dry bread.
At one time riding in a carriage
At another time on bare feet.
At one time splendid robes,
At another time worn-out garment.
At one time all riches,
At another time the endurance of poverty.
At one time the companionship of the good,
At another time connection with the bad.
Tuká says,—'Know that happiness and misery are indifferent.'"

The next *Abhangas* express the poet's dependence on God.

(24.)

"No one speaks by his own strength;
Beloved Bhagavanta,—the voice is His.
The cuckoo utters a sweet note,
But he that teaches her is Another.
How should I, poor wretch, make answer?
The Lord of the world has given me the power of utterance.
Tuká says,—'Who knows His art who makes the lame to walk without feet?'"

(25.)

"I have seized the waste of the Powerful One.
Now how can I be harmed?
Make haste and come to me,—I will invoke you, O Viṭṭhala,
I need not look in all directions,
The instant I call you draw near.
Tuká says,—'I have no courage but through your pity have become firm.'"

(26.)

"God feels great love for him
Who has abandoned the world:
He constantly walks behind him
And himself feels his joys and sorrows.
Whoso takes God's name,
God does his work for him.
Tuká says,—'Viṭṭhala is simple and tender in showing compassion.'"

(27.)

"We servants of Vithobá are not such,
That any one else should pity us.
Before the power of our Master all bow,
Kali Yuga and Death are subjected to Him.
God feels pride in one who is stamped with His mark.
And who lays all his possession at His feet.
Tuká says,—'May Náráyana fulfil our longing prayer.'"

"Kali Yuga" is the present degenerate age of the world, in which, according to the Hindus, religion has fallen away from its original purity.

The following specimen expresses the worthlessness of the outward signs of asceticism and sanctity, as compared with internal graces.

(28.)

"Whoso is pure of heart and sweet of speech,
It matters not if he have a rosary on his neck or no.
Who has made clear the way of self-knowledge,
It matters not if he have clotted hair on his head or no.
Whoso is passionless towards his neighbour's wife,
It matters not if there be ashes on his body or no.
Whoso is blind to another's wealth and dumb in blaming,
You may point to him as a saint, says Tuká."

The following *Abhanga* has a certain interest as illustrating a point of philosophy. There are two schools among the Hindus with reference to the ultimate identity, or non-identity, of subject with object—of the soul with God. The *dvaita* doctrine is that the soul remains distinct from God, and contemplates Him as an object. The *advaita* doctrine is that the soul is ultimately made identical with God, and that the distinction of subject and object will cease. Tukáráma, by illustrations of the force of habit, sets forth the strong hold which he believes the *dvaita* doctrine to have upon the human mind. He says that praising God has become so much a part of his nature, that, even when he is identified with God, he will not be able to relinquish it.

(29.)

"At first he was one of Khandobá's mendicants,
By good luck he became a captain of horse;
But his beggar's cry would not stop,
His original nature would not depart.
At first he was a village astrologer,
Then a king's throne fell to his lot;
But his proclaiming of the almanac would not stop,
His original nature would not depart.
At first she was a servant,
Then she became chief queen;
But her running about would not stop,
Her original nature would not depart.
At first Tuká was the companion of saints,
Then he was identified with Pánduranga;
But his repetition of the name of God would not stop,
His original nature would not depart."

Many of Tukáráma's *Abhangas* are expressive of a strong sense of sin, as may be seen from the following specimens.

(30.)

"I am fallen and a sinner, to thee I am come for protection,
Save me from shame, O Pánduranga.
Your limits in saving the faithful are not known,
I am greatly fallen, O Pánduranga.
Draupadí, your sister, was tormented by her enemies,
Yet you made her like yourself, O Pánduranga.
For Pralháda's sake you became incarnate in the pillar.

Why have you forgotten me, O Pánduranga?
Sudáma, the Bráhmana, was plunged in poverty,
Yet you made him like yourself, O Pánduranga.
Tuká says—'With my whole heart I have come to you for protection,
Let my sin be destroyed, O Pánduranga.'"

(31.)

"My sin and my sorrow, my good and my bad qualities,
Remove, O Krishna, Vishnu, Hari, Náráyana.
Ejecting lust and wrath, which are my enemies,
Do you abide in my heart, O Pánduranga.
Is there anything impossible if you would wish to do it?
You created the three worlds in mere sport.
Why should I teach the all-powerful?
Tuká says—'Pánduranga, come.'"

On the other hand, it is a misrepresentation to say, as has sometimes been said, that the chief characteristic of Tukáráma's writings is a restless and unsatisfied religious craving, as if he were seeking for something which he could not find. Far more characteristic of him is the sense of peace and satisfaction which his *Abhangas* express, as may be seen above in specimen (8), and also in the following specimens.

(32.)

"Who regards this restless world?
My friends are the people of Hari;
My time passes in musing upon God,
Accumulated pleasure remains.
I have no trouble, even in dreams;
Night and day pass on,
Tuká says,—'The fruition of God is a feast of excellent flavour.'"

(33.)

"All evil passions are in this human life,
But by invocations we have made ourselves pure,
Now this universe has become holy,
We have washed away the sense of differences.
We dwell continually in the city of Brahma;
The face of pollution is not to be seen.
Tuká says,—'We shall for ever dwell in solitude,
And enjoy in Brahma the fruition of Brahma.'"

"The sense of differences" here introduced is one of those philosophical phrases which Tukáráma, in an electric sort of way, frequently avails himself of, without, however, logically holding to the idea. He here speaks of getting rid of the sense of difference (between subject and object, and the like), as if it were the great thing to aim at. In a former specimen (29) we have seen him express a clinging to the *dvaita* doctrine. Tukáráma, like the Hindus in general, is extremely wavering in his point of view. He uses, and impairs his poetry by the use of the metaphysical terms of Vedantism. But he is never really philosophical—only always moral and devout. The following specimens, with which we may conclude, are of a general human interest. They are written, or supposed to be written, at the close of the poet's life, when he is on the point of departing to Vaikuntha, the heaven of Vishnu.

(34.)

"I am going to my own village,
Accept my farewell.
Till this time I have lived in your village,
Continue to think kindly upon me.
Henceforth there will be no more going and coming.
All talk has come to its natural end.
Utter the names of Ráma, Krishna, and Vitthala;
Tuká is going to Vaikuntha."

(35.)

"Within and without my house may you live happily;
Give my humble salutation to the elders.
To the sweetness of the honey the bee flies.
When the fold of the garment is torn, it cannot be replaced;
When the stream of the river has reached the ocean,
It never goes back,
Receive this word carefully;
Tuká has gone; he will never return.' "

(35.)

"O my friends, O good people, take the name of Ráma.
Tell me truly, who is there beside?
'Although the gem of our village is lost,
Yet no one informed us,' so you will say;
Therefore I have made known to all my going.
One should not walk in the path of righteousness alone,
With loads of flags and the dinning of drums,
Go the servants of Hari to Pandharapura."

(37.)

"The Pandharí of the people is on the earth,
But I have to go afar to Vaikuntha.
Whatever you do, you will not be able to find the way,
Therefore I make this loud announcement.
Behind me you will keep and raise lamentations,
Tuká will never more return.
So difficult is my way.
There is no royal road on my path."

(38)

"Tuká has passed the test,
Wonder is felt in the three worlds.
Daily he utters praises;
This is his only act of service.
Tuká has sat in a heavenly car;
The saints see it with their eyes.
God was hungry for faith,
He has brought Tuká to Vaikuntha."

"The test" is in Maráthí *Tukí*. This is of course a play on the word 'Tuká." The idea is identical with that of St. Paul—"I have fought the good fight; I have finished my course." The whole *Abhanga* boldly represents Tukaráma as already taken up in a heavenly car to Vaikuntha; and it was doubtless the origin from which sprang the legends of Mahípati concerning Tukaráma's translation to heaven.

श्रीतुकारामबावाचें चरित्र.

आलीकडच्या संतमालिकेंत तुकारामाप्रमाणें निःसीम भगवद्भक्त व अत्यंत विख्यात असा पुरुष फारच विरळा झाला. पुण्यापासून सुमारें आठ कोसांवर देहू या नांवाचें एक मध्यम-प्रतीचें विस्तीर्ण असें गाव आहे, तेथें त्याचे पूर्वज रहात आले होते. ते जातीचे शूद्र ह्मणजे कुणबी असून धान्य, किराणा वगैरे जिन्नस इकडून तिकडे नेणें, खेपा करणें वगैरे हा वाणीपणाचा धंदा करीत असत. त्यांच्या कुलांत मुख्य आराध्य दैवत पंढरपुरचा विठोबा हेंच होय. तुकारामाच्या पूर्वीच्या सात पुरुषांपावेतों त्याच्या पूर्वजांची हकीकत महीपतीच्या भक्तलीलामृत वगैरे ग्रंथात आढळते, तिजवरून ते बहुतेक सर्व भगवद्भक्तच होते असें दिसतें. शालिवाहन शके १५३० या सालीं देहूमुक्कामीं तुकारामाचें जन्म झालें आणि शालिवाहन शके १५७१ विरोधिनामसंवत्सरीं फाल्गुन वद्य २ सोमवारीं सकाळीं प्रथम-प्रहरीं ह्मणजे त्याच्या वयाच्या ४२ व्या वर्षी तो गुप्त झाला.

तुकारामबावाचें खालील चरित्र त्यानें आपल्या गाथ्यांत ठिकाठिकाणीं आपणाविषयीं जे अभंग लिहिले आहेत त्यांवरून रचलें आहे व या अभंगांतील हकीकतीची जुळणी करण्यास

---

१ तुकाराम गुप्त झाल्याचें साल खेरीजकरून महीपतीनें शक, वर्ष वगैरे काल कोठेंच दाखविला नाहीं. १५३० हें साल, २१ व्या वर्षी तुकारामाच्या आयुष्याचें पूर्वार्ध संपलें अशा अर्थाची ओवी लिहिली आहे तिजवरून, तुकारामाचें वय गुप्त होण्याच्या कालीं ४२ वर्षांचें होतें असें सर्व संत मंडळांत व तुकारामाच्या वंशजांत सर्वत्र प्रसिद्ध आहे त्यावरून आणि गुप्त झाल्याच्या सालावरून काढले आहे.

२ देहू, तळेगांव व पंढरपूर येथील प्रतींवरून (अभंग १६०९ पहा) "गुप्त" असें लिहिलें आहे. परंतु जी प्रत तुकारामानें स्वतःच लिहिली असें ह्मणतात व जी डोहांत बुडविल्यापासून तेरादिवसांनीं वर तरून आल्याची प्रसिद्धि आहे व जिची देहूचे संस्थानी अद्यापि पूजा करित असतात त्या प्रतींत "तुकोबांनीं तीर्थास प्रयाण केलें" असें लिहिलें आहे त्याविषयीं या चरित्राच्या अखेरचा लेख पाहा.

महीपतीनें भक्तलीलामृतांत जें तुकारामबावाचें चरित्र लिहिलें आहे त्याचें व तुकारामबावाच्या वंशजांत व इतर संतमंडळींत ज्या दंतकथा परंपरेनें चालत आल्या आहेत त्यांचें साह्य घेतलें आहे. व कांहीं थोड्या गोष्टी भक्तलीलामृतांतूनही स्वतंत्र घेतल्या आहेत.

हें चरित्र लिहिण्यापूर्वी तुकारामाच्या पूर्वजांविषयीं थोडेंसें लिहिणें योग्य व आवश्यक आहे. तुकारामापासून त्याचा आठवा पूर्वज पुरुष विश्वंभर हा होय. याच्याही पूर्वीच याच्या कुलांत आराध्यदैवत विठोबा होता, आणि पंढरपुरची वारी करण्याचा संप्रदाय परंपरया चालत आला होता. तरी विश्वंभराच्या वेळेपासून त्या कुळांत विठोबाची भक्ति वाढली आणि हल्लीं देहूस जें विठोबाचें देऊळ आहे तेंही विश्वंभराच्याच वेळेस झालें, सबब त्यापासूनच ही पुढील हकीकत देतों.

विश्वंभराच्या जन्माविषयीं व बाल्याविषयीं कांहीं माहिती नाहीं. तो अल्पवयांत असतां त्याचा बाप मरून गेल्यामुळें त्याच्या कुटुंबांत तो व त्याची आई हीं दोनच माणसें होतीं. विश्वंभर हा परंपरया चालत आलेला व्यापार साकीनें करीत असून त्याची साधुसंतांवर व भगवद्भजनावर फार प्रीति असे. पुढें त्यानें लग्न करून संसार चालविला. तो साधुसंतांच्या सत्कारार्थ बरेंच द्रव्य वेची, आणि नित्य रात्रीं गांवांतील जन मिळवून मनापासून भजन करी.

आपला पुत्र स्वतंत्रपणें वारी करण्याजोगा झाला असें पाहून एकेवर्षीं कार्तिकशुद्ध एकादशीच्या सुमारास विश्वंभराच्या आईनें त्यास सुचविलें कीं, आपल्या कुळांत आपले वाडवडील पंढरपुरची वारी करीत आले आहेत ती तूं आतां अंतरूं नको. म्हणजे तुझा संसार सफळ होऊन तुला परमार्थही साधेल. विश्वंभर हा मूळचाच प्रेमळ भक्त होता; त्यास ती सूचना फार योग्य वाटून तो मोठ्या उत्सुकतेनें वारी करण्यास गेला.

तेथें गेल्यावर वारकऱ्यांचा मोठा मेळा, विठोबाचें व इतर देवतांचीं स्थानें, भीमा अथवा चंद्रभागा या पवित्र नदीचें विस्तीर्ण तीर, पुंडलीक, नामदेव इत्यादि विठोबाच्या अनेक निःसीम भक्तांविषयींच्या परंपरेनें चालत आलेल्या अद्भुत कथा, त्यांचीं तेथील परमरम्य स्थानें, देवालयांतील उत्साह, सर्व लोकांचें विठोबारखुमाईच्या ठिकाणीं अतिशयित प्रेम इत्यादि गोष्टींनीं विश्वंभराच्या कोमळ व प्रेमळ अंतःकरणावर भगवद्भक्तीचा पूर्ण व कायम असा ठसा बटला. या वेळेस पंढरपुरास पांच दिवस राहून विश्वंभर देहूस परत आला. घरीं आल्यावर मातोश्रीस सर्व वृत्तांत मोठ्या आनंदानें कळवून दर पंधरवड्याच्या एकादशीस पंढरपुरची वारी करण्याचा त्यानें निश्चय केला. आणि त्याप्रमाणें ज्येष्ठवद्य एकादशीपावेतों एकंदर त्यानें सोळा वाऱ्या म्हणजे बेरझारा केल्या.

विश्वंभराचें चित्त वारींत गुंतल्यामुळें त्याच्या प्रापंचिक व्यवसायांत पुष्कळच अंतर पडूं लागलें व त्यामुळें गांवचे लोक त्याविषयीं अनेक प्रकारें अनेक गोष्टी बोलूं लागले. कोणी त्यास निंदूं लागले व कोणी वाखाणूं लागले. परंतु त्यानें आपला क्रम सोडिला नाहीं. वर लिहिल्याप्रमाणें क्रम चालला असतां आषाढ महिन्यांतील वारीस पंढरपुरास जावयाचें तों, शुद्ध अष्टमीच्या दिवशीं रात्रीं विश्वंभरास पंढरीस न येण्याविषयीं दृष्टांत होऊन विठोबा रखुमाईची स्वयंभू मूर्ति देहू मुक्कामींच आंब्याच्या बनांत जमिनींत सांपडली असें म्हणतात. पुढें देहू मुक्कामींच इंद्रायणीच्या तीरीं देऊळ बांधून त्या मूर्तीची यथाविधि स्थापना केली. आणि त्या दिवसापासून पुढें पंढरीस न जातां तेथेंच भजनपूजनाचा क्रम चालविला. याप्रमाणें कांहीं वर्षें लोटल्यानंतर विश्वंभरबावाचा काळ झाला.

विश्वंभराच्या मागें त्याची बायको आमाबाई[१] आणि एक हरि व दुसरा मुकुंद हे त्याचे दोन मुलगे इतकीं माणसें होतीं. आमाबाईस नवऱ्याप्रमाणेंच विठोबाची भक्ति असून तिनें नवऱ्याच्या मागें त्याचा जो भजनपूजनाचा क्रम होता तो यथास्थित चालविला. पुढें मुलगे मोठे होऊन त्यांची घरची स्थिति चांगली असल्यामुळें त्यांचीं लग्नकार्येंही झालीं. त्या उभयतांहीं बंधूंचें मन विठोबाच्या भजनपूजनाकडे तादृश नसून ऐहिक विचारांतच फार होतें. त्यांनीं मातोश्रीची इच्छा बिलकुल नसतांही एका राजाच्या[२] फौजेमध्यें अधिकार संपादून आपली मातोश्री व बायका देहूहून तिकडे नेल्या. पुढें कांहीं काळानें त्या राजावर परचक्र येऊन मोठी लढाई झाली, तींत हरि व मुकुंद हे दोघेही पडले. आपण आपल्या मातोश्रीच्या इच्छेप्रमाणें न वागल्यामुळें येथें येऊन विठोबाच्या भक्तीस अंतरलों, असें अंतकाळीं त्या उभयतां बंधूंच्या मनांत येऊन त्यांस फार वाईट वाटलें. त्यांच्या मरणानंतर त्या राजधानीच्या नगरींत चोहोंकडे लुटालूट व पळापळ झाली. त्याच वेळेस धाकटा बंधू मुकुंद याच्या बायकोनें पतीच्या प्रेताबरोबर सहगमन केलें. वडील बंधू जो हरि त्याची बायको त्याकाळीं गर्भार असल्यामुळें मागें राहिली. याप्रमाणें सर्व संसाराची वाताहत झाल्यावर आमाबाई तेथें त्रासून सुनेसुद्धां देहूस निघून गेली आणि सुनेस बाळंतपणासाठीं तिच्या माहेरीं पाठविलें. ती तिकडे गेल्यावर योग्य काळीं बाळंतीण होऊन तीस पुत्र झाला, त्याचें नांव विठोबा असें ठेविलें. काळें करून तो चांगला बोलता चालता झाला. पुढें त्याच्या आईस सासूच्या अजारीपणाचें वर्तमान कळून ती मुलास घेऊन देहूस आली. परंतु हीं दोघें येऊन पोहोंचण्याच्या पूर्वीं नुकताच आमाबाईचा काळ झाला होता. विठोबा हा व-

---

१ हीस "आमाई" असेंही महीपतीनें कोठें कोठें म्हटलें आहे.

२ हा राजा कोण, याची राजधानी कोणती वगैरे महीपतीनें मुळींच कांहीं लिहिलें नाहीं.

वांत आल्यावर त्याला आईच्या मुखानें पूर्वजांचा इतिहास कळून तोही मातेसुद्धां मनापासून विठ्ठलाच्या भक्तीस लागला. त्यानें पंढरपुरची वारी पुनः सुरू केली. त्याचें लग्नकार्य होऊन संसार चांगला झाला. पुढे त्याचा पुत्र पदाजी नामें झाला तो ही भगवद्भक्तच होता. पदाजीचा पुत्र शंकर, शंकराचा पुत्र कान्होबा, कान्होबाचा पुत्र बोल्होबा आणि बोल्होबाचा पुत्र तुकारामबावा. तुकारामबावा पावेतों झालेले सर्व पूर्वज कमी जास्त भगवद्भक्तच होऊन आषाढी कार्त्तिकीस पंढरपुरची वारी करीतच आले होते. त्यांत ही बोल्होबाचें लक्ष भजनपूजनाकडे अधिक होतें. प्रतिवर्षी आषाढी कार्त्तिकीची पंढरपुरची वारी तो सतत चोवीस वर्षे करीत होता. त्याची पत्नी कनकाई ही नवऱ्याप्रमाणेंच भाविक असून चांगली साध्वी होती. हीं चोवीस वर्षें गेल्यानंतर मग भगवत्कृपेकरून त्या दंपत्यास निरनिराळ्या वेळीं तीन पुत्र झाले. त्यापैकीं एकाचें नांव सावजी, दुसऱ्याचें नांव तुकाराम, आणि तिसऱ्याचें नांव कान्होबा याप्रमाणें होतीं. हे तिघे पुत्र अनुक्रमें सांब, विष्णु व ब्रह्मा या तीन देवांच्या वरांपासून झाले, असें भाविक लोक मानितात; आणि त्यांतही तुकाराम हा नामदेवाचाच अवतार होय असेंही मानितात. याविषयीं महीपतीनें भक्तलीलामृतांत बहुत लिहिलें आहे. नामदेवाची शतकोटि अभंग करण्याची प्रतिज्ञा असून चौऱ्याण्णव कोटि एकुणवन्नास लक्ष अभंग करून तो निवर्तला; तेव्हां राहिलेले पांचें कोटि एकावन्न लक्ष अभंग करण्याकरितां पुनः तुकारामाच्या रूपानें त्यानें अवतार घेतला असें ते लोक ह्मणतात. याविषयींच एका विद्वान मित्राकडून एक स्फुट अभंगही सांपडला आहे तो खालीं दाखल करतों:—

> वेदाचे अंभग केले श्रुतिपर । द्वादशसहस्र संहितेचे ॥ १ ॥
> निरुक्त निघंट आणि ब्रह्मसूत्र । अवतार सहस्र उपग्रंथ ॥ २ ॥
> अभंग ते कोटी भक्तिपर केले । ज्ञानपर केले तितुके चि ॥ ३ ॥
> पंचाहत्तर लक्ष वैराग्य वर्णिलें । नाम तें गाइलें तितुकें चि ॥ ४ ॥
> साठीलक्ष केला बोधक जनासी । वर्णिलें रूपासी तितुकें चि ॥ ५ ॥
> द्वादशसहस्र आत्मबोध केला । अनुभव घेतला एकें सर्व ॥ ६ ॥
> चौतीस सहस्र लक्ष कोटि पांच । सांगोनियां साच तुका गेला ॥ ७ ॥

---

१ विठोबाचें तुकारामाशीं स्वमांत भाषण—ओवी—चाळीस लक्ष चौऱ्याण्णव कोटी । नव लक्ष लिखित आले शेवटीं । मग (नामदेव) आला वैकुंठीं । स्वइच्छा ॥ ३९ ॥ एकावन्नलक्ष पांच कोटी जाणें । शेष राहिले यांचें (नामदेवाचें) बोलणें । ते तूं वदें प्रसादवचनें । सप्रेम जीवन मी देतों ॥ ४० ॥ महीपति, अध्याय ९.

२ एक कोटि.

या अभंगांत दिलेल्या संख्यांची एकंदर बेरीज घेतां पांच कोटि, सत्तर लक्ष, चौवीस हजार (५७०२४०००) अभंग होतात; याच्याच सातव्या कडव्यांत पांच कोटि एक लक्ष (?) आणि चौतीस हजार ही एकंदर अभंगांची संख्या दिली आहे; आणि तुकारामाच्या सर्व गाथ्यांत जी अभंगाची संख्या अढळते ती सुमारें शेचाळीसशें (४६००) हून अधिक आढळत नाहीं. या परस्पर विरुद्ध संख्यांचा मेळ पाडण्याची कांहीं युक्ति दिसत नाहीं.

वर लिहिलेला अभंग तुकारामाच्या कोणी एखाद्या भक्ताने केला असावा. त्याच्या शेव-टल्या चरणांत "तुका" असें पद नेहमीच्या शैलीप्रमाणें आहे तरी तो आह्मी जमविलेल्या गाथ्याच्या कोणत्या ही प्रसिद्ध व अप्रसिद्ध पुस्तकांत आढळत नाहीं, यास्तव तो तुकारामाचा नव्हे असें दिसतें.

वर लिहिलेले बोल्होबाचे तिघे पुत्र मोठे झाल्यानंतर त्यांचीं लग्नकार्यें वगैरे झालीं. बो-ल्होबाचा वृद्धापकाळ झाला तसा त्यानें सावजीच्या गळ्यांत प्रपंचाची माळ घालण्याचा विचा-र केला व तो त्यास व्यापार व प्रपंच याजसंबंधी हकीकत सांगूं लागला परंतु सावजीचें चित्त संसारांत नसून वैराग्याकडेसच फार होतें म्हणून त्यानें बापास तशाच प्रकारचें स्पष्ट उत्तर सांगितलें. बोल्होबा हा स्वतःच भगवद्भक्त व कांहींसा विरक्त असल्यामुळें त्यास साव-जीच्या वृत्तीवरून फारसे वाईट वाटलें नाही. नंतर त्याने व्यापार व संसार यांजसंबंधी माहिती तुकाराम सुमारे १३ वर्षांचा असतां त्यास करून दिली व तुकारामानेंही चांगल्या प्रकारें परंपरागत व्यापार वगैरे चालविला व त्यामुळें त्याच्या मातापितरांस वगैरे अर्थात मोठा संतोष झाला. तुकारामाच्या पहिल्या बायकोस दम्याचा उपद्रव असल्यामुळें पुण्यांत अपाजी गुळव्या नांवाचा एक सधन व्यापारी होता त्याची कन्या तुकारामास दुसरी बायको केली. तुकारामाच्या लहानपणाच्या वर्तनाविषयीं व विद्याभ्यासाविषयी काहींच लेख कोठें आढ-ळत नाही.

पुढें चार वर्षें गेल्यानंतर ह्मणजे तुकारामाच्या १७ व्या वर्षीं त्याच्या आईबापांचा काळ झाला. तेणेंकरून त्या सर्व कुटुंबावर फार दुःख ओरसलें. त्यांत संसाराचें ओझें तुकारा-माच्या शिरीं असल्यामुळें व एकाएकी वडिलाचा आधार तुटल्यामुळें त्यास अतिशयच दुःख झालें. पुढें थोड्याच काळानें तुकारामाचा वडील बंधु सावजी याची पत्नी निवर्तली त्या-मुळें त्यास पुनः नवीन दुःख झालें. सावजी हा मुळींच भगवद्भक्त व विरक्त होता. आप-ण तीर्थाटनास जावें असें त्याच्या मनांत फार दिवसांपासून वागतच होतें. परंतु तीर्थरूप वृद्ध असल्यामुळें व गळ्यांत भार्येचा पाश असल्यामुळें तो अडकून राहिला होता. आईबाप मरून जाऊन भार्या निवर्ततांच तो उठून तीर्थयात्रेस चालता झाला. त्याच्या वियोगामुळें

तुकारामास आधींच पुष्कळ झालेलें दुःख फारच वृद्धिंगत झालें. या वेळेस त्याचें वय फक्त अठरा वर्षांचें होतें. त्याच्यापदरीं कुटुंब मोठें असल्यामुळें खर्च फार अफाट होता. वरील दुःखांच्या अनेक प्रसंगामुळें त्याचें चित्त संसारांतून उडून उदासीनता वाढली व कांहीं देवभोळेपणाही वाढला. देवभोळेपणामुळें लोकांकडील येणें थकत चाललें. त्याच्या बरोबरीचे लोक त्याच्या बेंगट व उदासीन स्वभावामुळें त्याचा फार कंटाळा करूं लागले. व्यापार बसला. नंतर द्रव्य मिळण्याकरितां अनेक प्रकारे उद्योग केला; परंतु महर्घता वगैरे असल्यानें त्याच्या संसारासच पुरवठा पडेना. त्यांतच दुष्काळ पडून एक शेराची धारण झाली. त्याच्या विसाव्या वर्षीं त्याची थोरली बायको अन्नावांचून मेली व दुसरी राहिली ती मोठी कर्कशा होती. नंतर संतु नांवाचा त्याचा वडील पुत्र होता तो त्याच वर्षीं वारला. त्यांतच पुढें एकावर्षानें ह्मणजे तुकारामाच्या एकविसाव्या वर्षीं त्याच्या पदरीं चार ढोर होतीं तीं मरून गेलीं व तुकारामाचें निखालस दिवाळें निघालें त्यामुळें लोकांत त्यास लज्जा वाटूं लागली. या सर्व गोष्टींमुळें अंतःकरणांत विरक्ति बाणून सर्व सोडून देऊंन तो ईश्वरभजनास लागला. याप्रमाणें तुकारामाच्या आयुष्याचें पूर्वार्ध संपलें. एकाप्रसंगीं तुह्मास वैराग्य कसें झालें असें तुकारामास कांहीं संतांनीं विचारलें असतां त्यानें उत्तर दिलें तें:—

॥ १३३३ ॥

यातीं शूद्र वंश केला वेवसाव । आदि तो हा देव कुळपूज्य ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नये बोलों परि पाळिलें वचन। केलियाचा प्रश्न तुह्मीं संतीं ॥ध्रु॥
संवसारें जालों अतिदुःखें दुःखी । मायबाप सेखीं क्रमिलिया ॥ २ ॥
दुष्काळें आटिलें द्रव्यें नेला मान। स्त्री एकी अन्न अन्न करितां मेली॥३॥
लज्जा वाटे जीवा त्रासलों या दुःखें। वेवसाय देखें तुटी येतां ॥ ४ ॥
देवाचें देऊळ होतें तें भंगलें । चित्तासी जें आलें करावेंसें ॥ ५ ॥
आरंभीं कीर्तन करीं एकादशी। नव्हतें अभ्यासीं चित्त आधीं ॥ ६ ॥
कांहीं पाठ केलीं संतांचीं उत्तरें । विश्वासें आदरें करोनियां ॥ ७ ॥
गातीं पुढें त्यांचें धरावें धृपद । मावें चित्त शुद्ध करोनियां ॥ ८ ॥
संतांचें सेविलें तीर्थ पायवणी । लाज नाहीं मनीं येऊं दिली ॥ ९ ॥
टाकला तो कांहीं केला उपकार । केलें हें शरीर कष्टवूनि ॥ १० ॥

वचन मानिलें नाहीं सुल्हदाचें । समूळ प्रपंचें वीट आला ॥ ११ ॥
सत्यअसत्यासी मन केलें ग्वाही । मानियेलें नाहीं बहुमतां ॥ १२ ॥
मानियेला स्वप्नीं गुरूचा उपदेश । धरिला विश्वास दृढ नामीं ॥ १३ ॥
यावरिया जाली कवित्वाची स्फूर्ति । पाय धरिले चित्तीं विठोबाचे ॥ १४ ॥
निषेधाचा कांहीं पडिला आघात । तेणें मध्यें चित्त दुखविलें ॥ १५ ॥
बुडविल्या वह्या बैसलों धरणें । केलें नारायणें समाधान ॥ १६ ॥
विस्तारीं सांगतां बहुत प्रकार । होईल उशीर आतां पुरे ॥ १७ ॥
आतां आहे तैसा दिसतो विचार । पुढील प्रकार देव जाणे ॥ १८ ॥
भक्ता नारायण नुपेक्षी सर्वथा । कृपावंत ऐसा कळों आलें ॥ १९ ॥
तुका ह्मणे माझें सर्व भांडवल । बोलविले बोल पांडुरंगें ॥ २० ॥

॥ १३३४ ॥

ऐका वचन हें संत । मी तों आगळा पतित ।
काय काजें प्रीत । करीतसां आदरें ॥ १ ॥
॥ धु. ॥ माझें चित्त मज ग्वाही । सत्य तरलों मी नाहीं ।
एकांचिये वांहीं । एक देखीं मानिती ॥ ध्रु ॥
बहु पीडिलों संसारें । मोडीं पुसें पिटीं ढोरें ।
न पडतां पुरें । या विचारें राहिलों ॥ २ ॥
सहज सरलें होतें कांहीं । द्रव्य थोडें बहु तें ही ।
त्याग केला नाहीं । दिलें द्विजां याचकां ॥ ३ ॥
प्रियापुत्रबंधु । यांचा तोडिला संबंधु ।
सहज जालों मंदु । भाग्यहीन करंटा ॥ ४ ॥
तोंड न दाखवे जना । शिरें सांदी भरें राणां ।

एकांत तो जाणां । तयासाटीं लागला ॥ ५ ॥
पोटें पिटिलीं काहारें । दया नाहीं या विचारें ।
बोलवितां बरें । सहज ह्मणें यासाटीं ॥ ६ ॥
सहज वडिलां होती सेवा । ह्मणोनि पूजितों या देवा ।
तुका ह्मणे भावा । साटीं झणी घ्या कोणी ॥ ७ ॥

॥ १३३५ ॥

बरें जालें देवा निघालें दिवाळें । बरी या दुष्काळें पीडा केली ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अनुतापें तुझें राहिलें चिंतन । जाला हा वमन संवसार ॥ ध्रु. ॥
बरें जालें देवा बाईल कर्कशा । बरी हे दुर्दशा जनामध्यें ॥ २ ॥
बरें जालें जगीं पावलों अपमान । बरें गेलें धन ढोरें गुरें ॥ ३ ॥
बरें जालें नाहीं धरिली लोकलाज । बरा आलों तुज शरण देवा ॥ ४ ॥
बरें जालें तुझें केलें देवाईल । लेंकरें बाईल उपेक्षिलीं ॥ ५ ॥
तुका ह्मणे बरें व्रत एकादशी । केलें उपवासीं जागरण ॥ ६ ॥

तुकारामाने संसाराविषयीं विरक्त होऊन केवळ भगवद्भजनाकडेसच न लागावें ह्मणून त्याच्या बायकोनें व आप्तइष्टांनीं त्यास बहुत प्रकारें सांगितलें व अनेक उपायही केले; परंतु त्याचा निश्चय फिरला नाही. तो एकांतीं बसून पुष्कळ विचार करीत असे. तो एक वेळ कोणास न कळवितां देहूपासून दोन कोसांवर भांबनाथ नांवाचा एक डोंगर आहे त्याजवर जाऊन भगवद्ध्यान करीत होता. त्याचा कनिष्ठबंधु कान्होबा मागून त्याच्या शोधार्थ फिरतां फिरतां सात दिवसांनी तेथें गेला तेथें त्यास तुकाराम भेटला. याच ठिकाणी तुकारामास साक्षात्कार झाला असें महीपति ह्मणतो. ज्या स्थळीं त्यास ईश्वरदर्शन झालें तेथें पादुका-स्थापिल्या आहेत त्या अद्यापि तेथें आहेत. तेथून कान्होबानें तुकारामास देहूस परत आणिल्या नंवर तुकारामानें कान्ह्याकडून सर्व खतेंपत्रें बाहेर काढविलीं. आणि ह्मणाला कीं, हीं खतें-पत्रें ह्मणजे केवळ कागदाचे घोडे आहेत. तीं असल्यापासून फक्त दुराशा मात्र वाढते. यास्तव हीं सर्व इंद्रायणींत बुडवून टाकावीं. कान्होबा ह्मणाला तुह्मी विरक्त झालां तरी आमच्या पोटीं पोरें बाळें आहेत तेव्हां असें करतां येत नाही. हा त्याचा अभिप्राय

पाहून तुकारामानें खतां पत्रांचे दोन विभाग केले व त्यांतील एक विभाग कान्होबास देऊन दुसरा इंद्रायणींत बुडविला. आणि सांगितलें कीं, आजपासून सर्व संसार तुह्मीं पाहावा, मला भगवद्भक्तिविरहित व्यापार करणें नाहीं. -उदरनिर्वाह जसा चालेल तसा चालो. यावर कान्ह्यानें वेगळा संसार थाटला! आणि तुकारामानें भगवद्भक्ति प्रधान करून आपला वर्तनक्रम चालू केला. तो नेहमी अल्पाहार करीत असे, व सर्वदा भगवद्भजनी तत्पर असून मुखानें नामस्मरण करीत असे. सकाळीं स्नान करून विटोबाच्या देवळांत त्याची पूजा करून मग वनांत जात असे. देहूच्या पश्चिमेस तीन कोसांवर भाडारी नांवाचा डोंगर आहे त्याजवर जाऊन तो एकांती बसत असे. संध्याकाळीं परत येऊन रात्री देवळांत भजन करीत असे. तो पोटाकरितां भिक्षा मागत असे असें महीपति ह्मणतो; परंतु भिक्षा मागण्याचा त्यास फारसा प्रसंग पडत नसे. आणि पोटाकरितां कांही उद्योग पडल्यास तो करावयाचा नाहीं असेंही त्याचें नव्हते. भिक्षेनें जीवन करणे याविषयी तो ह्मणतोः—

॥ १४१० ॥

भिक्षापात्र अवलंबणें । जळो जिणें लाजिरवाणें ।
ऐसियासी नारायणें । उपेक्षिजे सर्वथा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देवा पायीं नाहीं भाव । भक्ति वरी वरी वाव ।
समर्पिला जीव । नाहीं तो हा व्यभिचार ॥ ध्रु ॥
जगा घालावें सांकडें । दीन होऊनि बापुडें ।
हें चि अभाग्य रोकडें । मूळ आणि विश्वास ॥ २ ॥
काय न करी विश्वंभर । सत्य करितां निर्धार ।
तुका ह्मणे सार । दृढ पाय धरावे ॥ ३ ॥

यावरून तो पोटाकरितां जमल्यास कांहीं तरी व्यापार करीत असे. महीपतीनें सहाव्या अध्यायांत अदमण दाणे घेण्याची बोली करून तुकाराम शेतास राखण राहिला असें लिहिलें व त्यांतच तुकारामाची बायको त्याच्या अगोदर जेवीत नसे असेंही लिहिलें आहे त्यावरून तो बहुशः आपल्या घरीं जेवीत असे अथवा त्याची बायको त्यास कधीं कधीं वाढून ही नेत असे असें दिसतें.

तुकाराम शेतास राखण राहिला त्याची हकीकत अशी आहे कीं, तो एके दिवशीं इंद्राय-

णीच्या तीरीं भजन करीत बसला असतां त्याजकडे एक शेतकरी आला. त्याचें शेत तेथें जवळच उगवलें असून त्यास दाणा भरूं लागला होता. तो तुकारामास ह्मणाला, "तुकाराम शेट, उगीच रिकामे घरीं बसलां आहां ते माझें शेत राखाल तर तुह्मांस अदमण दाणे देईन, ह्मणजे ते तुमच्या कुटुंबाच्या उपयोगीं पडतील आणि तुह्मांला कोठें तरी हरि हरि ह्मणायाचें तें तेथेंच ह्मणा." ही गोष्ट पतकरून तुकाराम त्याजबरोबरच निघाला. शेतकऱ्यानें त्यास माळ्यावर नेऊन हातांत गोफण देऊन बसविलें आणि सांगितलें कीं "तुह्मी शेताची चांगली जतन करा. ह्मणजे राशीवर तुह्मांला अदमण दाणे देईन" अशी निरवानिरव करून शेतकरी खेप आणण्याकरितां दुसऱ्या गांवास गेला. तुकाराम शेत राखीत असतां पक्ष्यांचे थवे कणसांवर येऊन बसत; परंतु भुकेलेल्या प्राण्यांस हाकून द्यावें यांत दोष आहे असें वाटून तो त्यांस हाकीत नसे. तो शेत राखण्यास राहिल्याचें कळल्यावर त्याची बायको त्यास वाढून पाठवून मग आपण जेवीत असे. तुकारामानें माळ्यावर बसून सतत भजनाचा क्रम चालवावा. याप्रमाणें एक महिना लोटल्यावर शेतकरी खेप करून परत आला आणि मोठ्या उत्कंठेनें जाऊन शेत पाहतो तों तें पक्ष्यांनीं अगदीं भरून निघालेलें होतें. तेव्हां अर्थात शेतकरी तुकारामावर रागावून त्यास बहुत अपशब्दही बोलला. पुढें गांवकऱ्यां-पुढें पंचाईत होऊन त्यांनीं उभयतांचा मजकूर ऐकून घेतला. तुकारामानें सर्व खराच मजकूर सांगितला. पंचांनीं शेतकऱ्यास विचारलें कीं, "तुला दाणे किती उत्पन्न होत असतात?" त्यानें सांगितलें, "दोन खंडी" त्यावरून तेवढ्या गल्ल्याचा पैसा आकारून तुकारामापासून तेवढ्याबद्दल रोखा लिहून घेतला. आणि तो शेतकऱ्याच्या हातांत टाकला. नंतर शेताची वास्तविक स्थिति गांवकरी पहावयास जातात तों शेतांत अतोनात पीक लोटलें आहे. हें पाहून सर्वांस नवल वाटलें. शेतकऱ्याच्या तोंडास पाणी सुटून तो रोखा परत देण्यास कबूल झाला. परंतु गांवकऱ्यांनी झालेला न्याय फिरायाचा नाही, असें सांगितलें. पुढें शेताची तजवीज गांवकऱ्यांनीं ठेवून मळणी केली तीत १७ खंडी दाणा उतरला. रास होतांच दोन खंडी दाणे शेतकऱ्यास देऊन रोखा परत घेतला. बाकीचे दाणे तुकारामास ने ह्मणून सांगितलें असतां तो नेईना, सबब त्या गांवचा देशपांड्या महादाजीपंत ह्मणून भाविक ब्राह्मण होता त्याजकडे तो दाणा नेऊन सांठविला पुढें तुकारामानें देहू येथें पूर्वजांनीं बांधलेलें विठोबाचें देऊळ अगदीं मोडकळीस आलें होतें त्याचा जीर्णोद्धार केला. त्याकामीं त्या दाण्यांचा उपयोग पडला.

पुढें त्यास आपण स्वतः कथा करावी अशी इच्छा उपजून त्यानें तो गुणसंपादन करण्याची अनेक प्रकारें तजवीज चालविली. कोठें कथा झाली कीं तो नियमानें व भक्तीनें जात असे आणि कथेस उभा राहिला असेल त्याच्या मागें उभा राहून ध्रुपद म्हणजे अक्कड कडवें

ह्मणत असे, त्यायोगें त्यास श्रवण फार झालें. कथेंत जें जें कानीं पडे त्याचें तो घरीं येऊन मनन करीत असे. त्यानें नामदेवाचे पुष्कळ अभंग आणि कबीराची कविता हीं पाठ केली; ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, भावार्थ रामायण, योगवासिष्ठ, अमृतानुभव इत्यादि अध्यात्मक ग्रंथ वाचून त्यांचें चांगलें मनन केलें. याखेरीज श्रीमद्भागवत व दुसरीं कितीएक पुराणें व स्फुटकथा ह्या त्यानें चित्त देऊन ऐकिल्या. या ग्रंथांच्या अभ्यासाकरितां व मननाकरितां तो बहुत-करून भंडाऱ्या डोंगरावर एकांतीं जाऊन वसत असे. तो एकादशीचें व्रत नियमानें करीत असे.

याप्रमाणें क्रम कांहीं दिवस चालल्यानंतर तुकारामास एका माघ शुद्ध १० गुरुवारच्या-पाहटेस स्वप्न पडलें तें असें कीं, सकाळच्या प्रहरीं गंगास्नानास जात असतां एक ब्राह्मण भेटला त्यानें आपणास रामकृष्णनामरूप गुरुमंत्रोपदेश केला व आपली गुरुशिष्यपरंपरा अशी सांगितली कीं, मूळ राघवचैतन्य त्यांचे शिष्य केशव चैतन्य व त्यांचा शिष्य मी बाबा चैतन्य नामें होय. नंतर आपण त्यांस भोजनास घरीं आणिलें. परंतु जिजाबाईनें कांहीं अनिवार दुरुत्तरें बोलून त्रास दिला, त्यामुळें तो ब्राह्मण निघून गेला; इतकें पाहून तुकाराम जागा झाला. याविषयीं त्याचा अभंगः—

॥ ३६८ ॥

सद्गुरुरायें कृपा मज केली । परि नाहीं घडली सेवा कांहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सांपडविलें वाटे जातां गंगास्नाना । मस्तकीं तो जाणा ठेविला कर ॥ ध्रु ॥
भोजना मागती तूप पावशेर । पडिला विसर स्वप्नामाजी ॥ २ ॥
कांहीं कळे उपजला अंतराय । ह्मणोनियां काय त्वरा झाली ॥ ३ ॥
राघवचैतन्य केशवचैतन्य । सांगितली खुण माळिकेची ॥ ४ ॥
बाबाजी आपलें सांगितलें नाम । मंत्र दिला राम कृष्ण हरि ॥ ५ ॥
माघशुद्ध दशमी पाहुनि गुरुवार । केला अंगीकार तुका ह्मणे ॥ ६ ॥

॥ ३६९ ॥

माझिये मनींचा जाणोनियां भाव । तो करी उपाव गुरुराजा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आवडीचा मंत्र सांगितला सोपा । जेणें नव्हे गुंपा कांहीं कोठें ॥ ध्रु ॥

जाती पुढें एक उतरले पार । हा भवसागर साधुसंत ॥ २ ॥
जाणत्या नेणत्या ज्या जैसी आवडी । उतार सांगडी तापे पेटीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे मज दावियेला तारू । कृपेचा सागरू पांडुरंग ॥ ४ ॥

॥ ३७० ॥

घालुनियां भार राहिलों निश्चितीं । निरविलें संतीं विठोबासि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ लावूनियां हातें कुरवाळिला माथा । सांगितलें चिंता न करावी ॥ ध्रु ॥
कटीं कर सम चरण साजिरे । राहिला भीवरे तीरीं उभा ॥ २ ॥
खुंटले सायास आणिकि या जीवा । धरिले केशवा पाय तुझे ॥ ३ ॥
तुज वाटे आतां तें करीं अनंता । तुका ह्मणे संता लाज माझी ॥ ४ ॥

॥ ३७१ ॥

माझिये मनींचा जाणा हा निर्धार । जिवासि उदार जालों आतां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुजविण दुजें न धरीं आणिका । भय लज्जा शंका टाकियेली ॥ ध्रु ॥
ठायींचा संबंध तुज मज होता । विशेष अनंता केला संतीं ॥ २ ॥
जीवभाव तुझ्या ठेवियेला पायीं । हें चि आतां नाहीं लाज तुह्मां ॥ ३ ॥
तुका ह्मणे संतीं घातला हावाला । न सोडीं विठ्ठला पाय आतां ॥ ४ ॥

तुकाराम मोठा परोपकारी होता. त्यास कोणीं कोणतेंही काम सांगितलें असतां तो हौसेनें करीत असे. त्याची स्वार्थावर दृष्टि मुळींच नसे. तो नेहमी स्वतः नामस्मरण करीत असे व लोकांसही तें करण्याकरितां मनोभावानें उपदेश करीत असे. याप्रमाणे कांहीं काळ लोटल्या नंतर तुकारामास कवित्व करण्याविषयीं स्वप्न पडलें. त्याविषयी तो स्वतः असें ह्मणतोः—

॥ १३२० ॥

नामदेवें केलें स्वप्नामाजी जागें । सवें पांडुरंगें येऊनियां ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ सांगितलें काम करावें कवित्व । वाउगें निमित्य बोलों नको॥ ध्रु ॥
माप टाकी सळ धरिली विठ्ठलें । थापटोनि केलें सावधान ॥ २ ॥
प्रमाणाची संख्या सांगे शत कोटी । उरले शेवटीं लावी तुका ॥ ३ ॥

॥ १३२१ ॥

याल ठाव तरि राहेन संगती । संतांचे पंगती पायांपाशीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आवडीचा ठाव आलोंसें टाकून । आतां उदासीन न धरावें ॥ध्रु॥
सेवटील स्थळ नीच माझी वृत्ति । आधारें विश्रांती पावईन ॥ २ ॥
नामदेवापायीं तुक्या स्वप्नीं भेटी । प्रसाद हा पोटीं राहिलासे ॥ ३ ॥

॥ १३२२ ॥

त्रिपुटीच्या योगें । कांहीं नव्हे कोणां जोगें ।
एक जातां लागें । एक पाठी लागतें ॥ १ ।
॥ ध्रु. ॥ मागें पुढें अवघा काळ । पळों नये न चले बळ ।
करितां कोल्हाळ । कृपे खांदां हरि वाहे ॥ ध्रु ॥
पापपुण्यात्मयाच्या शक्ती । असती योजिल्या श्रीपती ।
यावें काकुलती । तेथें सत्तानायेका ॥ २ ॥
तुका उभा पैल थडी । तरी हे प्रकाश निवडी ।
घातल्या सांगडी । तापे पेटीं हाकारी ॥ ३ ॥

यापुढें तुकाराम कविता करूं लागला त्यांत आरंभी त्यानें बालक्रीडा (ओव्या ९००) केल्या असें महीपति ह्मणतो. तो खरा साधु असें समजून त्याच्या भजनाचा व कथेचा मोठा जम पडत चालला होता. याच समयास चिंचवडास मंबाजी नामें एक ब्राह्मण राहत होता तो कांहीं दिवसांपासून देहूस गोसावी होऊन राहिला होता. आपण साधु ब्राह्मण असतां आपणास कोणी मानीत नाहीं व तुकाराम जातीचा शूद्र असतां त्यास लोक फार मानतात हें पाहून व त्याच्या भजनाचा व कथेचा भरचक्क थाट पाहून तो मनांत फार हेवा करीत असे. तुकारामाचा दावा साधावा असें रात्रंदिवस त्याच्या मनांत वागत असे, तरी तो लौकिकार्थ

प्रत्यहीं तुकारामाच्या भजनास व कथेस येत असे. एका एकादशीस देहूस यात्रा भरली असतां मंबाजीनें विठोबाच्या प्रदक्षिणेच्या वाटेजवळ बाग केली होती, तिच्या रक्षणार्थ कांट्या लाविल्या होत्या त्या कांहींशा वाटेवर आल्या होत्या त्या तुकारामानें स्वहस्तें उपटून टाकिल्या. त्यावरून मंबाजीस अतिशय क्रोध आला व नेहमींचा हेवा मनांत होताच त्यामुळें त्यानें तुकारामास गुराप्रमाणें काठ्यांनीं मरेमरेतों झोडपलें. आणि ते दिवशीं कथेस न येतां घरींच राहिला. तुकारामानें मोठ्या शांततेनें तें सर्व सहन करून आपण त्याच्या घरीं जाऊन त्यास कथेंत आणून उत्तम रीतीनें बोध केला असें महीपति लिहितो याबद्दल तुकोबाचे अभंग आहेत तेः—

॥ ३५५ ॥

न सोडीं न सोडीं न सोडीं । विठोबा चरण न सोडीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भलतें जड पडो भारी । जीवावरी आगोज ॥ ध्रु ॥
शत खंड देह शस्त्रधारी । करितां परी न भीयें ॥ २ ॥
तुका ह्मणे केली आधीं । दृढ बुद्धी सावध ॥ ३ ॥

॥ ३५६ ॥

बरवें बरवें केलें विठोबा बरवें । पाहोनि आंत क्षमा अंगीं कांटीवरी मारविलें ॥ १ ॥
शिव्या गाळी नीत नाहीं । बहु फार विटंबिलें ॥ २ ॥
तुका ह्मणे क्रोधा हातीं । सोडवूनि घेतलें रे ॥ ३ ॥

॥ ३५७ ॥

पावलों पावलों । देवा पावलों रे ॥ १ ॥
बरवें संचित होतें तैसें जालें रे । आतां काय बोलों रे ॥ २ ॥
सोज्ज्वळ कंटकवाटा भावें करूं गेलों रे । तुका ह्मणे करूनि वेगळा केलों रे ॥ ३ ॥

॥ ३५८ ॥

कां होती कां होती । देवा एवढी फजीती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मुळीं वर्म नसतों चुकलों । तो मी ऐसें चित्तीं ॥ ध्रु ॥
होणार होऊनि गेलें । मिथ्या आतां खंती रे ॥ २ ॥
तुका ह्मणे पुरे आतां । दुर्जनाची संगती रे ॥ ३ ॥

॥ ३५९ ॥

सोडवा सोडवा । सोडवा हो अनंता ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुजविण ऐसा । कोण दुजा प्राणदाता ॥ ध्रु ॥
कोणा लाज नेणां ऐसें । आणिकां शरण आह्मी जातां ॥ २ ॥
तुका ह्मणे सखया । माझ्या रखुमाईच्या कांता ॥ ३ ॥

॥ ३६० ॥

पुत्राची वारता । शुभ ऐके जेवीं माता ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसें राहो माझें मन । गातां ऐकतां हरिगुण ॥ ध्रु ॥
नादें लुब्ध जाला मृग । देह विसरला अंग ॥ २ ॥
तुका ह्मणे पाहे । कासवीचें पिलें माये ॥ ३ ॥

या उपदेशापासून मंबाजी मनांत पराकाष्ठेचा लज्जित झाला.

तुकारामाचा प्रेमळ स्वभाव व शुद्धभाव पाहून वहुत लोक त्याचे शिष्य झाले. ते भजनास व कथेस नेहमी सादर सिद्ध असत. त्यांतही गंगाधर मवाळ ह्मणून एक कडूसकर देशस्थ ब्राह्मण होता तो व दुसरा संताजी ह्मणून एक चाकणकर तेली होता तो हे दोघे अष्टौप्रहर तुकारामाजवळ असून त्याची कविता लिहीत असत. ते दोघेही संसाराविषयीं विरक्त असून तुकारामाच्या पाठीमागें भजनास व कथेस उभे राहून ध्रुपद धरीत असत.

तुकारामाची पत्नी त्यास संसारसंबंधानें नेहमी फार दुरुत्तरें बोलत असे. कोणी अतिथि, अभ्यागत त्यानें घरीं आणिला असतां ती त्याजवर फारच संतापत असे. तुका तिचे बोल अभंगीं लिहितो—

॥ ५६६ ॥

मजचि भोंवता केला येणें जोग । काय याचा भोग अंतरला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ चालोनियां घरा सर्व सुखें येती । माझी तों फजीती चुके चि ना ॥ध्रु॥
कोणाची बाईल होऊनियां वोढूं । संवसारीं काढूं आपदा किती ॥ २ ॥
काय तरी देऊं तोडितील पोरें । मरतीं तरी बरें होतें आतां ॥ ३ ॥
कांहीं नेदी वांचों धोवियेलें घर । सारवावया ढोर शेण नाहीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे रांड न करितां विचार । वाहूनियां भार कुंथे माथां ॥ ५ ॥

॥ ५६७ ॥

काय नेणों होता दावेदार मेला । वैर तो साधिला होउनि गोहो ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ किती सर्वकाळ सोसावें हें दुःख । किती लोकां मुख वासूं तरीं ॥ ध्रु॥
झवे आपुली आई काय माझें केलें । धड या विठ्ठलें संसाराचें ॥ २ ॥
तुका ह्मणे येती बाइले असडे । फुंदोनियां रडे हांसे कांहीं ॥ ३ ॥

॥ ५६८ ॥

गोणी आली घरा । दाणे खाऊं नेदी पोरा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भरी लोकांची पांटोरी । मेला चोरटा खाणोरी ॥ ध्रु ॥
खवळली पिसी । हाता झोंबे जैसी लांसी ॥ २ ॥
तुका ह्मणे खोटा । रांडे संचिताचा सांटा ॥ ३ ॥

॥ ५६९ ॥

आतां पोरा काय खासी । गोहो जाला देवलसी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ डोचकें तिंबी घातल्या माळा । उदमाचा सांडी चाळा ॥ ध्रु ॥
आपल्या पोटा केली थार । आमचा नाहीं येसपार ॥ २ ॥
हातीं टाळ तोंड वासी । गाय देउळीं देवापासीं ॥ ३ ॥

आतां आह्मीं करूं काय । न बसे घरीं राणा जाय ॥ ४ ॥
तुका ह्मणे आतां धीरी । आझुनि नाहीं जालें तरी ॥ ५ ॥

॥ ५७० ॥

बरें जालें गेलें । आजी अवघें मिळालें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां खाइन पोटभरी । ओल्या कोरडया भाकरी ॥ ध्रु ॥
किती तरी तोंड । याशीं वाजवूं मी रांड ॥ २ ॥
तुका बाइले मानवला । चींथू करूनियां बोला ॥ ३ ॥

॥ ५७१ ॥

न करवे धंदा । आइता तोंडीं पडे लोंदा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उठिते तें कुटितें टाळ । अवघा मांडिला कोल्हाळ ॥ ध्रु ॥
जींवंत चि मेले । लाजा वाटुनियां प्याले ॥ २ ॥
संवसाराकडे । न पाहाती ओस पडे ॥ ३ ॥
तळमळती यांच्या रांडा । घालिती जीवा नावें धोंडा ॥ ४ ॥
तुका ह्मणे बरें जालें । घे गे बाइले लीहिलें ॥ ५ ॥

॥ ५७२ ॥

कोण घरा येतें आमुच्या काशाला । काय ज्याचा त्याला नाहीं धंदा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देवासाठीं जालें ब्रह्मांड सोइरें । कोमळया उत्तरें काय वेचे ॥ ध्रु ॥
मानें पाचारितां नव्हे आरागुक । ऐसे येती लोक प्रीतीसाठीं ॥ २ ॥
तुका ह्मणे रांडे नावडे भूषण । कांतेलेंसें श्वान लागे पाठीं ॥ ३ ॥

या स्थितीचा तुकारामास अतिशय कंटाळा येऊन तो एकदां अरण्यांत गेला व घरीं येणें वर्ज केलें. गांवांतून कोणी अन्न तेथें आणून दिल्यास खावें. रात्रीं भजनाकरितां देवळांत यावें. प्रातःकाळीं इंद्रायणीचें स्नान करून विठोबाची पूजा करून रानांत जावें, असा त्याचा क्रम दोन महिने चालला. नंतर एके दिवशीं एकादशीस तुकारामाची व जिजाबाईची अकस्मात [illegible]

गांठ पडली. तेथें त्या दोघांचें कांहीं बोलणें होऊन तुमचें वचन मी मानीन असें वचन जिजाबाईनें दिल्यानंतर तुकाराम घरास आला. त्याच दिवशीं रात्रीं तुळसीवृंदावनाजवळ तुकाराम बसला असतां त्यानें बायकोस तेथें बोलावून विरक्तीचा उपदेश केला व सर्वस्वदान करण्यास सांगितलें यावदल तो अभंगांत ह्मणतो कीः—

॥ १९८१ ॥

पिकल्या शेताचा आह्मां देतो वांटा । चौधरी गोमटा पांडुरंग ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सत्तर टक्के बाकी उरली मागे तो हा । मागें झडले दाहा आजिवरी ॥ ध्रु ॥
हांडा भांडीं गुरें दाखवीं ऐवज । माजघरीं बाजे बैसलासे ॥ २ ॥
मज यासी भांडतां जाब नेदी बळें । ह्मणे एकावेळे घ्याल वांटा ॥ ३ ॥
तुका ह्मणे स्त्रिये काय वो करावें । ने दितां लगावें काय कोठें ॥ ४ ॥

॥ १९८२ ॥

करितां विचार अवघें एक राज्य । दुजा कोण मज पाठी घाली ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कोण्या रीती जावें आह्मी वो पळोनि । मोकळे अंगणीं मागें पुढें ॥ ध्रु ॥
काय तें गव्हाणें हिंडावीं वो किती । दूत ते लागती याचे पाठीं ॥ २ ॥
कोठें याची करूं गेलों कुळवाडी । आतां हान सोडी जीवें आह्मां ॥ ३ ॥
होऊनि बेबाख येथें चि राहावें । देईल तें खावें तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ १९८३ ॥

नागवूनि एकें नागवीं च केलीं । फिरोनियां आलीं नाहीं येथें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भेणें सुती कोणी न घेती पालवीं । करूनियां गोवी निसंतान ॥ ध्रु ॥
एकें दीं गोविलीं घेऊनि जमान । हांसतील जन लोक तयां ॥ २ ॥

सरले तयांसी घाली वैकुंठीं । न सोडी हे साटी जीवें जाली ॥ ३ ॥
तुका ह्मणे जालों जाणोनि नेणतीं । सांपडलों हातीं याचे आह्मी ॥ ४ ॥

॥ १९८४ ॥

आतां तूं तयास होईं वो उदास । आरंभला नास माझ्या जीवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जरूर हें जालें मज कां नावडे । उपास रोकडे येती आतां ॥ध्रु॥
बरें म्या तुझिया जीवाचें तें काय । व्हावें तें हें पाहें विचारूनि ॥ २ ॥
तुज मज तुटी नव्हे या विचारें । सहित लेंकुरें राहों सुखें ॥ ३ ॥
तुका ह्मणे तरी तुझा माझा संग । घडेल वियोग कधीं नव्हे ॥ ४ ॥

॥ १९८५ ॥

काय करूं आतां माझिया संचिता । तेणें जीव चित्ता साटी केली ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न ह्मणावें कोणी माझें हें करणें । हुकुम तो येणें देवें केला ॥ध्रु॥
करूनि मोकळा सोडिलों भिकारी । पुरविली तरी पाठी माझी ॥ २ ॥
पाणिया भोंपळा जेवावया पानें । लाविलीं वो येणें देवें आह्मां ॥ ३ ॥
तुका ह्मणे यासी नाहीं वो करुणा । आहे नागवणा ठावा मज ॥ ४ ॥

॥ १९८६ ॥

नको धरूं आस व्हावें या बाळास । निर्माण तें त्यांस त्यांचें आहे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आपुला तूं गळा घेईं उगवूनि । चुकवीं जाचणी गर्भवास ॥ध्रु॥
ऐवज देखोनि बांधितील गळा । ह्मणोनि निराळा पळतसें ॥ २ ॥
देखोनियां त्यांचा अवघड मार । कांपे थरथर जीव माझा ॥ ३ ॥
तुका ह्मणे जरी आहे माझी चाड । तरी करीं वाड चित्त आतां ॥ ४ ॥

॥ १९८७ ॥

भले लोक तुज बहु मानवती । वाढेल या कीर्ति जगामाजी ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ ह्मणे मेलीं गुरें भांडीं नेलीं चोरें । नाहींत लेकुरें जालीं मज ॥ध्रु॥
आस निरसूनि कठिण हें मन । करीं वो समान वज्र तैसें ॥ २ ॥
किंचित हें सुख टाकीं वो थुंकोनि । पावसील धनी परमानंद ॥ ३ ॥
तुका ह्मणे थोर चुकती सायास । भवबंध पाश तुटोनियां ॥ ४ ॥

॥ १९८८ ॥

आईक हें सुख होईल दोघांसी । सोहळा हे ऋषि करिती देव ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जडितविमानें बैसविती मानें । गंधर्वांचें गाणें नामघोष ॥ ध्रु ॥
संत महंत सिद्ध येतील सामोरे । सर्वसुखा पुरे कोड तेथें ॥ २ ॥
आलिंगूनि लोळों त्यांच्या पायांवरी । जाऊं तेथवरी मायबापें ॥ ३ ॥
तुका ह्मणे तया सुखा वर्णूं काय । जेव्हां बापमाय देखें डोळां ॥ ४ ॥

॥ १९८९ ॥

देव पाहावया करीं वो सायास । न धरीं हे आस नाशिवंत ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ दिन शुद्ध सोम सकाळीं पातला । द्वादशी घडला पर्वकाळ ॥ ध्रु ॥
द्विजां पाचारूनि शुद्ध करीं मन । देईं वो हें दान यथाविध ॥ २ ॥
नको चिंता करूं वस्त्रा या पोटाची । माउली आमुची पांडुरंग ॥ ३ ॥
तुका ह्मणे दुरी सांगतों पाल्हाळीं । परी तो जवळी आहे आह्मां ॥ ४ ॥

॥ १९९० ॥

सुख हें नावडे आह्मां कोणा बळें । नेणसी अंधळे जालीशी तूं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भूक तान कैसी राहिली निश्चळ । खुंटलें चपळ मन ठायीं ॥ ध्रु ॥
द्रव्य जीवाहूनि आवडे या जना । आह्मांसी पाषाणाहूनि हीन ॥ २ ॥
सोइरे सज्जन जन आणि वन । अवघें समान काय गुणें ॥ ३ ॥
तुका ह्मणे आह्मां जवळी च आहे । सुख दुःख साहे पांडुरंग ॥ ४ ॥

॥ १९९१ ॥

गुरुरूपे मज बोलविलें देवें । होईल हें घ्यावें हित कांहीं ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ सत्य देवें माझा केला अंगीकार । आणीक विचार नाहीं आतां ॥ ध्रु. ॥

होई बळकट घालूनियां कास । हा चि उपदेश तुज आतां ॥ २ ॥

सदा संमार्जन तुळसीवृंदावन । अतीत पूजन ब्राह्मणाचें ॥ ३ ॥

वैष्णवांची दासी होई सर्वभावें । मुखीं नाम घ्यावें विठोबाचें ॥ ४ ॥

पूर्णबोध स्त्रीभ्रतारसंवाद । धन्य जींहीं वाद आइकिला ॥ ५ ॥

तुका ह्मणे आहे पांडुरंगकथा । तरेल जो चित्ता धरील कोणी ॥ ६ ॥

या अभंगापासून जिजाबाईस तात्काळ कांहीं विरक्ति झाली; परंतु ती सतत राहिली नाहीं.

तुकारामास महादेव ह्मणून जो वडील मुलगा होता तो लहान असतां त्याला मुतखडा होऊन त्या व्यथेनें तो अगदीं मरणोन्मुख झाला. जिजाबाई सर्व औषधें, मालदोऱ्या वगैरे सर्व प्रकारचे उपाय करून थकली. तुकाराम तिकडे लक्ष देईना. अखेरीस फार पोट फुगून तो मरतो असें झालें तेव्हां जिजाबाई काळ्यावर (ती विठोबास नेहमी काळ्या ह्मणत असे) रागावून पोरास घेऊन देवळांत गेली आणि आतां पोर मूर्तीवर आपटणार तो असा ध्वनि तिला ऐकूं आला कीं, तुझा मुलगा बरा झाला. या गोष्टीचा चमत्कार वाटून ती मुलाकडे पाहते तो त्याला लघ्वी मनस्वी चालू झाली. ह्मणून तिनें त्याला देवळाच्या बाहेर आणून बसविला. लघ्वीच्या द्वारें सर्व रोग निघून गेला. नंतर त्यानें खावयास मागितलें. आणि खाल्यानंतर झोप घेऊन उठला तो चांगला बरा झाला.

पुढें दिवसानुदिवस तुकारामाची कीर्ति लोकांत वाढली. विठोबा प्रत्यहीं तुकारामाबरोबर भोजन करावयास येतो असें वर्तमान चोहोंकडे प्रसिद्ध झालें. हें ऐकून पुण्याजवळ चिंचवड ह्मणून जें खेडें आहे तेथील महागणपतिभक्त चिंतामणिदेव यांनीं हा चमत्कार पाहण्यासाठीं तुकारामास निरोप पाठविला कीं, तुह्मीं एक वेळ येऊन आह्मांस भेटून जावें. त्यावरून तुकाराम चिंचवडास गेला. तेथें त्याच्या प्रथमच्या भाषणावरूनच चिंतामणिदेवांस त्याच्या खऱ्या भक्तीचा व त्याजवर भगवत्कृपा होती तिचा थोडासा चमत्कार समजला असें ह्मणतात. पुढें भोजनसमयीं तुकारामांनीं दोन पात्रें अधिक मांडवून चिंतामणिदेवांस प्रत्यक्ष गणपतीस भोजनास आणण्यास सांगितलें; परंतु देवांच्यानें तें झालें नाहीं. शेवटीं तुकारामानें गणपतीची व विठोबाची स्तुति व प्रार्थना करून त्यांस प्रत्यक्ष भोजनास आणिलें

व त्या वेळेस देवांस मात्र त्याचें प्रत्यक्ष दर्शन झालें. पंक्तींतील इतर लोकांस दर्शन झालें नाहीं तरी पात्रावरचें अन्न वगैरे सरलेलें त्यांनीं पाहिलें असें ह्मणतात. शेवटीं चिंतामणदेवांस अतिशय आनंद होऊन त्यांनीं तुकारामाचें मोठें गौरव केलें. भोजन झाल्यानंतर तुकाराम देहूस निघून गेला. याबद्दल तुकाराम आपल्या अभंगांत लिहितो कीं:—

॥ २८८० ॥

वांजा गाई दुभती । देवा ऐसी तुझी ख्याति ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें मागत नाहीं तुज । चरण दाखवावे मज ॥ ध्रु ॥
चातक पाखरूं । त्यासी वर्षे मेघ धारू ॥ २ ॥
पक्षी राजहंस । अमोलिक मोती त्यास ॥ ३ ॥
तुका ह्मणे देवा । कां गा खोचलासी जीवा ॥ ४ ॥

॥ २८८१ ॥

परतें मी आहे सहज चि दुरी । वेगळें भिकारी नामरूपा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न लगे हसावें धरावा संकोच । सहज तें नीच आलें भागा ॥ध्रु ॥
पडिलिये ठायीं उच्छिष्ट सेवावें । आर्थ तें चि देवें केलें ऐसें ॥ २ ॥
तुका ह्मणे तुह्मी आह्मां जी वेगळे । केलेती निराळे द्विज देवें ॥ ३ ॥

॥ २८८२ ॥

चिंतामणि देवा गणपतीशी आणा । करावें भोजना दुजे पात्रीं ॥ १ ॥
॥ध्रु.॥ देव ह्मणती तुक्या एवढी कैंची थोरी । अभिमानाभीतरी नागवलों ॥ध्रु॥
वाडवेळ जाला शिळें जालें अन्न । तटस्थ ब्राह्मण बैसलेती ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा तुमच्या सुकृतें । आणीन त्वरित मोरयासी ॥ ३ ॥

॥ २८८३ ॥

भोक्ता नारायण लक्ष्मीचा पति । ह्मणोनि प्राणाहुती घेतलिया ॥ १ ॥
॥ ध्रु.॥ भर्ता आणि भोक्ता कर्ता आणि करविता । आपण सहजता पूर्णकाम ॥ध्रु॥

विश्वंभर कृपादृष्टी सांभाळीत । प्रार्थना करीत ब्राह्मणांची ॥ २ ॥
कवळोकवळीं नाम घ्यावें गोविंदाचें । भोजन भक्तांचें तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ २८८४ ॥

माझा स्वामी तुझी वागवितो लात । तेथें मी पतित काय आलों ॥ १ ॥
तीर्थें तुमच्या चरणीं जाहालीं निर्मळ । तेथें मी दुर्बळ काय वागूं ॥ २ ॥
तुका ह्मणे तुह्मी देवा द्विजवंद्य । मी तों काय निंद्य हीनयाति ॥ ३ ॥

तुकारामास तिघी कन्या होत्या—एक काशी, दुसरी भागिरथी आणि तिसरी गंगा. या वयस्क झाल्या त्या वेळेस जिजाबाईने त्यांच्या लग्नाबद्दल तुकारामास निकड लाविली. तुकारामानें स्वजातीचे तीन मुलगे आणून तिघांसही हळदी लाविल्या. त्या मुलाच्या आईबापांसही त्या मुली मान्य होऊन त्यांनीं मोठ्या खुषीनें लग्नसमारंभ केले. गांवच्या लोकांनीं तुकारामाच्या घरी सर्व साहित्य करून रीतीप्रमाणें चार दिवस लग्नसमारंभ केला. या तीन सोयऱ्यांपैकीं एकाचें आडनांव मोझे, दुसऱ्याचे गाडे, आणि तिसऱ्याचें जांभुळकर अशीं होतीं.

पंढरपुरास एक ब्राह्मण आपणास शास्त्रव्युत्पत्ति व्हावी ह्मणून उपवास करीत बसला होता. त्यास तेथें आळंदीस जाण्याविषयी दृष्टांत झाला. तो आळंदीस येऊन उपोषणें करीत बसला. तेथे तुकारामाकडे जावें असें ज्ञानदेव यानें स्वप्नीं येऊन सांगितलें. तुकाराम जातीचा शूद्र यामुळें ब्राह्मणाची थोडीबहुत निराशा त्याच वेळीं झाली. तरी प्रत्यय पाहण्याकरिता तो तुकारामाकडे आला. ज्ञानेश्वरास पाहिजे तितकें सामर्थ्य असतां त्यानें आपणाकडे ब्राह्मण पाठविला याबद्दल मोठा विस्मय पावून तुकारामानें त्यास अकरा अभंग करून दिले व एक प्रसादाचा नारळ दिला ब्राह्मणास संस्कृत व्युत्पत्तिज्ञान पाहिजे होतें सबब प्राकृत आपल्या उपयोगी नाही असें समजून तो अभंग व नारळ दोन्ही टाकून आळंदीस गेला. त्यावर तुकारामानें १३ अभंगांचें ज्ञानेश्वरास पत्र लिहिलें. ते ११ व १३ अभंग येणेंप्रमाणें:—

॥ २३२४ ॥

नको कांहीं पडों ग्रंथाचिये भरीं । शीघ्र व्रत करीं हें चि एक ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देवाचिये चाडे आळवावें देवा । ओस देहभावा पाडोनियां ॥ध्रु॥
साधनें घालिती काळाचिये मुखीं । गर्भवास सेखीं न चुकती ॥ २ ॥
उधाराचा मोक्ष होय नव्हे ऐसा । पतनासी इच्छा आवश्यक ॥ ३ ॥

रोकडी पातली अंगसंगें जरा । आतां उजगरा कोठवरि ॥ ४ ॥
तुका ह्मणे घाली नामासाटीं उडी । पाडुरंग थडी पाववील ॥ ५ ॥

॥ २३२५ ॥

नाहीं देवापाशीं मोक्षाचें गाठोळें । आणूनि निराळें द्यावें हातीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ इंद्रियांचा जय साधुनियां मन । निर्विषय कारण असे तेथें ॥ ध्रु ॥
उपास पारणीं अक्षरांची आटी । सत्कर्मा शेवटीं असे फळ ॥ २ ॥
आदरें संकल्प वारीं अतिशय । सहज तें काय दुःख जाण ॥ ३ ॥
स्वर्मींच्या घायें विवळसी वांयां । रडे रडतियासवें मिथ्या ॥ ४ ॥
तुका ह्मणे फळ आहे मूळापाशीं । शरण देवासी जाय वेगीं ॥ ५ ॥

॥ २३२६ ॥

त्यजिलें भेटवी आणूनि वासना । दाविल्याचे जना काय काज ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आळवावें देवा भाकूनि करुणा । आपुलिया मना साक्ष करीं ॥ ध्रु ॥
नाहीं जावें यावें दूरूनि लागत । आहे साक्षभूत अंतरींचा ॥ २ ॥
तुका ह्मणे हा आहे कृपासिंधु । तोडी भवबंधु तात्काळिक ॥ ३ ॥

॥ २३२७ ॥

गोविंद गोविंद । मना लागलिया छंद ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मग गोविंद ते काया । भेद नाहीं देवा तया ॥ ध्रु ॥
आनंदलें मन । प्रेमें पाझरती लोचन ॥ २ ॥
तुका ह्मणे आळी । जेवीं नुरे चि वेगळी ॥ ३ ॥

॥ २३२८ ॥

ज्याचें जया ध्यान । तें चि होय त्याचें मन ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ ह्मणऊनि अवघें सारा । पांडुरंग दृढ धरा ॥ ध्रु ॥
सम खुण ज्याचे पाय । उभा व्यापक विटे ठाय ॥ २ ॥
तुका ह्मणे नभा । परता अनूचा ही गाभा ॥ ३ ॥

॥ २३२९ ॥

पाहुनियां ग्रंथ करावें कीर्तन । तेव्हां आलें जाण फळ त्याचें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं तरि वांयां केली तोंडपिटी । उरी ते शेवटीं उरलीसे ॥ ध्रु ॥
पढोनियां वेद हरिगुण गावे । ठावें तें जाणावें तेव्हां जालें ॥ २ ॥
तपतीर्थाटणें तेव्हां कार्यसिद्धि । स्थिर राहे बुद्धि हरिच्या नामीं ॥ ३ ॥
यागयज्ञादिक काय दानधर्म । तरि फळ नाम कंठीं राहे ॥ ४ ॥
तुका ह्मणे नको कावाडाचे भरी । पडों सार धरीं हें चि एक ॥ ५ ॥

॥ २३३० ॥

सुखें खावें अन्न । त्याचें करावें चिंतन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ त्याचें दिलें त्यासी । पावे फळ आपणासी ॥ ध्रु ॥
आहे हा आधार । नाम त्याचें विश्वंभर ॥ २ ॥
नाहीं रिता ठाव । तुका ह्मणे पसरीं भाव ॥ ३ ॥

॥ २३३१ ॥

संकोचोनि काय जालासी लहान । घेई अपोशण ब्रह्मांडाचें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करोनि पारणें आंचवें संसारा । उशीर उशिरा लावूं नको ॥ ध्रु ॥
घरकुलानें होता पडिला अंधार । तेणें केलें फार कासावीस ॥ २ ॥
झुगारूनि दुरी लपविलें काखे । तुका ह्मणे वाखे कौतुकाचे ॥ ३ ॥

॥ २३३२ ॥

माझ्या बापें मज दिधलें भातुकें । ह्मणोनि कौतुकें क्रीडा करीं ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ केली आळी पुढें बोलिलों वचन । उत्तम हें ज्ञान आलें त्याचें ॥ध्रु॥
घेऊनि विभाग जावें लवलाह्या । आलेति या ठाया आपुलिया ॥ २ ॥
तुका ह्मणे ज्ञानदेवीं समुदाय । करावा मी पाय येइन वंदूं ॥ ३ ॥

॥ २३३३ ॥

ज्ञानियांचा गुरू राजा महाराव । ह्मणती ज्ञानदेव ऐसें तुह्मां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मज पामरा हें काय थोरपण । पायींची वाहाण पायीं बरी ॥ध्रु॥
ब्रह्मादिक जेथें तुह्मां वोळगणे । इतर तुळणे काय पुरे ॥ २ ॥
तुका ह्मणे नेणें युक्तीची ते खोली । ह्मणोनि ठेविली पायीं डोई ॥ ३ ॥

॥ २३३४ ॥

बोलिलीं लेकुरें । वेडीं वाकुडीं उत्तरें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करा क्षमा अपराध । महाराज तुह्मी सिद्ध ॥ ध्रु ॥
नाहीं विचारिला । अधिकार म्यां आपुला ॥ २ ॥
तुका ह्मणे ज्ञानेश्वरा । राखा पायापें किंकरा ॥ ३ ॥

॥ २३३५ ॥

काय तुह्मी जाणां । करूं अव्हेर नारायणा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तरी या लटिक्याची गोष्टी । निवडली दुसरे ठायीं ॥ ध्रु ॥
कळों अंतरींचा गुण । नये फिटल्यावांचून ॥ २ ॥
आणिलें अनुभवा । जनाच्या हें ज्ञानदेवा ॥ ३ ॥
आणीक कोणी भिती । त्यांच्या चिंतनें विश्रांति ॥ ४ ॥
तुका ह्मणे बीज पोटीं । फळ तैसें चि सेवटीं ॥ ५ ॥

॥ २३३६ ॥

अविश्वासीयाचें शरीर सुतकी । विटाळ पातकी भेद वाही ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ काय त्याचा वेल जाईल मांडवा । होता तैसा ठेवा आला पुढें ॥ ध्रु ॥
मतिचा संकल्प व्हावा राजबिडा । कपाळींचा धोंडा उभा ठाके ॥ २ ॥
तुका ह्मणे जैसा कुचराचा दाणा । परिपाकीं अन्ना न मिळे जैसा ॥ ३ ॥

॥ २३३७ ॥

तामसाचीं तपें पापाची सिदोरी । तमोगुणें भरी घातले ते ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ राज्यमदा आड सुखाची संपत्ति । उलंघूनि जाती निरयगांवा ॥ ध्रु ॥
इंद्रियें दमिलीं इच्छा जीती जीवीं । नागविती ठावीं नाहीं पुढें ॥ २ ॥
तुका ह्मणे हरिभजनावांचून । करिती तो सीण पाहों नये ॥ ३ ॥

॥ २३३८ ॥

हरिकथेवांचून इच्छिती स्वहित । हरिजन चित्त न घला तेथे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जाईल भंगोन आपुला विश्वास । होईल या नास कारणांचा ॥ ध्रु ॥
ज्याचिया बैसावें भोजनपंगती । त्याचिया संगती तैसें खावें ॥ २ ॥
तुका ह्मणे काय जालेती जाणते । देवा ही परते थोर तुह्मी ॥ ३ ॥

॥ २३३९ ॥

सेवकें करावें स्वामीचें वचन । त्यासी हुंतूंपण कामा नये ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ घेईल जीव कां सारील परतें । भंगलिया चित्तें सांदी जेना ॥ ध्रु ॥
खद्योतें दावावी रवी केवीं वाट । आपुलें चि नीट उसंतावें ॥ २ ॥
तुका ह्मणे तो ज्ञानाचा सागर । परि नेंदी अगर भिजों भेदें ॥ ३ ॥

॥ २३४० ॥

जयाचिये द्वारीं सोन्याचा पिंपळ । अंगीं ऐसें बळ रेडा बोले ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करील तें काय नव्हे महाराज । परि पाहे बीज शुद्ध अंगीं ॥ ध्रु ॥
जेणें हे घातली मुक्तीची गवांदी । मेळविली मांदी वैष्णवांची ॥ २ ॥

तुका ह्मणे तेथें सुखा काय उणें । राहे समाधानें चित्ताचिया ॥ ३ ॥

॥ २३४१ ॥

बहुतां छंदाचें बहु दिसे जन । नये वांटूं मन त्यांच्या संगें ॥ १ ॥
॥ ध्रु.॥ करावा जतन आपुला विश्वास । अंगा आला रस आवडीचा ॥ध्रु॥
सुखाची समाधि हरिकथा माउली । विश्रांति साउली सिणलियांची ॥ २ ॥
तुका ह्मणे बुडे बांधोनि दगड । तेथें काय कोड धांवायाचें ॥ ३ ॥

॥ २३४२ ॥

हरिकथे नाहीं । विश्वास ज्याचे ठायीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ त्याची वाणी अमंगळ । कान उंदराचें बीळ ॥ ध्रु ॥
सांडुनि हा रस । करिती आणीक सायास ॥ २ ॥
तुका ह्मणे दिसीं । वांयां गेलीं किती ऐसीं ॥ ३ ॥

॥ २३४३ ॥

प्रेम अमृताची धार । वाहे देवा ही समोर ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऊर्ध्ववाहिनी हरिकथा । मुगुटमणि सकळां तीर्थां ॥ ध्रु ॥
शिवाचें जीवन । जाळी महादोष कीर्तन ॥ २ ॥
तुका ह्मणे हरि । इची स्तुति वाणी थोरी ॥ ३ ॥

॥ २३४४ ॥

आतां माझ्या मना । इची घडो उपासना ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें करीं पांडुरंगा । प्रेम वोसंडेसें अंगा ॥ ध्रु ॥
सर्व काळ नये । वाचे विट आड भये ॥ २ ॥
तुका वैष्णवांसंगती । हें चि भजन पंगती ॥ ३ ॥

॥ २३४५ ॥

उपास करावी । तिहीं करावीं बापुडीं ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ आह्मी विठोबाचे दास । चिंता झुगारिली आस ॥ ध्रु ॥
भक्तीच्या उत्कर्षें । नाहीं मुक्तीचें तें पिसें ॥ २ ॥
तुका ह्मणे बळ । अंगीं आमुच्या सकळ ॥ ३ ॥

॥ २३४६ ॥

करविली तैसी केली कटकट । वांकडें कीं नीट देव जाणे ॥ १ ॥
कोणांकारणें हें जालेंसे निर्माण । देवाचें कारण देव जाणे ॥ २ ॥
तुका ह्मणे मी या अभिमाना वेगळा । घालूनि गोपाळा भार असें ॥ ३ ॥

॥ २३४७ ॥

तुह्मी येथें पाठविला धरणेकरी । त्याची जाली परी आइका ते ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां काय पुढें वाढवूनि विस्तार । जाला समाचार आइका तो ॥ ध्रु ॥
देवाचे उचित एकादश अभंग । महाफळ त्याग करूनि गेला ॥ २ ॥
तुका ह्मणे सेवा समर्पूनि पायीं । जालों उतराई ठावें असो ॥ ३ ॥

नंतर त्या ब्राह्मणानें टाकलेले अकरा अभंग व नारळ कोंडोदा ह्मणून एक शिवाजी राजाच्या पुराणिकाचा ब्राह्मणजन होता त्यास पाहून तुकारामानें ते त्यास देऊन टाकले. पुढें त्यास ज्ञानप्राप्ति होऊन त्याचा मोटा लौकिक झाला असें ह्मणतात. तो नारळ फोडिला त्यांत फक्त उत्तम मोत्यें निघालीं. याचें कारण असें ह्मणतात कीं, अमदाबादेच्या कोणी एका सावकारानें ज्ञानेश्वरास एक लाख रुपयांचें जवाहिर देण्याचा नवस केला होता. तो फेडण्याकरितां तो सावकार एक नारळ कोरून तो मोत्यानें भरून आळंदीस घेऊन आला; तेव्हां तो नारळ देहूस तुकारामाला द्यावा असा त्यास दृष्टांत झाला होता, सबब त्या सावकारानें तो तुकारामास आणून दिला होता, तोच नारळ हा होता.

यानंतर एक वेळ लोहगांवचे कांहीं भाविक लोक देहूस आले होते त्यांस तुकारामास आपल्या गांवीं घेऊन जावेंसें वाटून त्यांनीं त्यास विनंती केली ती तुकारामानें मान्य केली. मग ते त्यास लोहगांवास घेऊन गेले व तेथें त्याच्या भजनाचा व कीर्तनाचा मोठा समारंभ केला. व त्याप्रमाणें त्या गांवीं कितीएक दिवसपावेतों एकसारखी कीर्तनांची माळच

लागली होती. गरीबगुरिबी तुकारामास शिधापाणी देऊन एक एक दिवस आपआपल्या घरीं कीर्तन करवीत. तेथें कांहीं अद्भुतचमत्कार झाले असेंही महीपति लिहितो. लोहगांवांत असल्या वेळीं तेथें परचक्राचा वेढा पडला होता त्याविषयीं तुकाराम आपल्या अभंगांत याप्रमाणें लिहितो—

॥ ५५७ ॥

न देखवे डोळां ऐसा हा आकांत । परपीडे चित्त दुःखी होतें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय तुह्मी येथें नसालसें जालें । आह्मीं न देखिलें पाहिजे हें ॥ध्रु॥
परचक्र कोठें हरिदासांच्या वासें । न देखिजेत देशें राहातिया ॥ २ ॥
तुका ह्मणे माझी लाजविली सेवा । हीनपणें देवा जिणें जालें ॥ ३ ॥

॥ ५५८ ॥

काय म्यां मानावें हरिकथेचें फळ । तारिजे सकळ जनीं ऐसें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उच्छेद तो असे हा गे आरंभला । रोकडें विठला परचक्र ॥ध्रु॥
पापाविण नाहीं पाप येत पुढें । साक्षीसी रोकडें साक्ष आलें ॥ २ ॥
तुका ह्मणे जेथें वसतील दास । तेथें तुझा वास कैसा आतां ॥ ३ ॥

॥ ५५९ ॥

भीत नाहीं आतां आपुल्या मरणा ।
दुःखी होतां जना न देखवे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आमची तो जाती ऐसी परंपरा ।
कां तुह्मी दातारा नेणां ऐसें ॥ ध्रु ॥
भजनीं विक्षेप तेंचो पैं मरण ।
न वजावा क्षण एक वांयां ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं आघाताचा वारा ।
ते स्थळीं दातारा ठाव मागें ॥ ३ ॥

॥ ५६० ॥

फिरंगी वाखर लोखंडाचे विळे । परि ते निराळे गुणमोल ॥ १ ॥

पाथरी प्रतिमा एक चि पाषाण । परि तें महिमान वेगळालें ॥ २ ॥

तुका ह्मणे तैशा नव्हतील परी । संतजना सरी सारिखिया ॥ ३ ॥

लोहगांवाहून तुकाराम परत देहूस आला. त्याची कीर्ति दिवसानुदिवस चोहोंकडे अतिशय पसरत चालली. कित्येक भाविक लोक त्याचा चमत्कार पाहण्याकरितां व दर्शन घेण्याकरितां दूरदूरच्या ठिकाणांहून येऊं लागले. कीर्तनाची व कवित्वाची मोठी झोड उठली. तो कथेंतल्या कथेंतच नवीन अभंग तात्कालिक करून कीर्तन करूं लागला. तो अगदीं निःस्पृह, निर्भिड व स्पष्टवक्ता असल्यामुळे, व त्याची वागणूक त्याच्या बोलण्याप्रमाणें असल्यामुळे व त्याचें कवन चित्तवेधक असल्यामुळें श्रोत्यांच्या अंतःकरणांत तें उत्तमप्रकारें बाणत असे. सामान्यतः ब्राह्मणांस व त्यांत विशेषतः भिक्षुक व शास्त्री यांस स्वकीयजातीच्या व विद्येच्या अभिमानामुळे तुकारामाचा उत्कर्ष अगदीं सहन होत नसे. ते त्याविषयीं अनेक प्रकारची अवाच्य बडबड करीत असत. पुण्याच्या ईशान्येस वाघोली ह्मणून एक खेडें आहे तेथें रामेश्वरभट्ट ह्मणून एक विद्वान् व राजमान्य ब्राह्मण होता त्यास तुकारामाचा उत्कर्ष अतिशय असह्य झाला. तो ह्मणे तुकाराम जातीचा कुळंबट व ज्ञानशून्य असतां त्यानें उगीच पाखंड माजविलें आहे. त्याचा चांगला बंदोबस्त केलाच पाहिजे. नंतर त्यानें ग्रामाधिकाऱ्याच्या मनांत तुकारामाविषयीं वक्रता व द्वेष उत्पन्न करून देऊन त्याजकडून देहूच्या पाटलास तुकारामाला गांवांतून हाकून देण्याविषयीं ताकीदचिठी पाठविली. पाटलानें ती चिठी तुकारामास दाखविली; तेव्हां त्यास मोठी काळजी पडली कीं, हें देवस्थान टाकून कोठे जावें. यावेळीं त्यानें अभंग केला आहे तोः—

॥ ६७६ ॥

काय खावें आतां कोणीकडे जावें ।
गांवांत राहावें कोण्या बळें ॥ १ ॥
॥ धु. ॥ कोपला पाटील गांवचे हे लोक ।
आतां घाली भीक कोण मज ॥ ध्रु ॥
आतां येणें चवी सांडिली ह्मणती ।

निवाडा करिती दिवाणांत ॥ २ ॥
भल्या लोकीं यास सांगितली मात ।
केला माझा घात दुर्बळाचा ॥ ३ ॥
तुका ह्मणे याचा संग नव्हे भला ।
शोधीत विठ्ठला जाऊं आतां ॥ ४ ॥

नंतर तुकाराम रामेश्वरभट्टास शरण गेला आणि तेथेंच त्यानें हरिकीर्तनास आरंभ केला. त्यामध्यें श्रुत्यर्थही येत आहेत असें पाहून रामेश्वरभट्ट ह्मणाला तूं जातीचा शूद्र आहेस यास्तव हा अर्थ बोलणें व ऐकणें हीं दोन्ही नरकप्रद आहेत; यास्तव तूं हें कवित्व करूं नको. तुकाराम ह्मणाला पांडुरंगानें आज्ञा केल्यावरून ही बडबड करीत आलों. आतां आपण अपरसूर्य ब्राह्मण आज्ञा करतां त्यापक्षीं पुढें करणें सोडून देतों; परंतु पूर्वीं केलेल्या कवित्वाचें काय करावें? रामेश्वरभट्ट ह्मणाला कीं, तें सर्व जळांत बुडवावें. हें एकून तो देहूस आला व झालेला वृत्तांत विठोबाच्या मूर्तीस विदित केला आणि कवित्वाच्या वह्या वरखालीं दगडी चिपा बांधून त्यांवरून घट्ट रुमाल बांधून त्या डोहांत टाकल्या. हें पाहून भाविकजनांस फार वाईट वाटलें व अभाविक जनास बरेंच वाटलें.

वह्या बुडवून पांच दिवस झाल्यानंतर कांहीं कुटिल लोक येऊन तुकारामास ह्मणाले कीं, डोहांत पूर्वीं खतें बुडवून संसार बुडविला व आतां कवित्व बुडवून परमार्थही बुडविला. याप्रमाणें दोहोंकडूनही त्वां आपला नाश करून घेतला. हें ऐकून तुकारामास फार वाईट वाटलें. त्यानें अन्नोदक घेणें सोडून देऊन विठोबाच्या देवळांत तुळसीवृंदावनाजवळ एका दगडावर शयन केलें. त्या वेळेस शोकपर असे २० अभंग केले आहेत. ते:—

॥ २२२२ ॥

भूत बाधा आह्मां घरीं । हें तों आश्चर्य गा हरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जाला भक्तीचा कळस । आले वसतीसी दोष ॥ ध्रु ॥
जागरणाचें फळ । दिली जोडोनी तळमळ ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । आहाच कळों आली सेवा ॥ ३ ॥

॥ २२२३ ॥

नाहीं जों वेचलों जिवाचिया त्यागें । तोंवरी वाउगें काय बोलों ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ जाणिवलें आतां करीं ये उदेश । जोडी किंवा नाश तुमची जीवें ॥ध्रु॥
ठायींचें चि आलें होतें ऐसें मना । जावें ऐसें वना दृढ जालें ॥ २ ॥
तुका ह्मणे मग वेचीन उत्तरें । उद्देशिलें खरें जाल्यावरी ॥ ३ ॥

॥ २२२४ ॥

करूं कवित्व काय नाहीं आतां लाज । मज भक्तराज हांसतील ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां आला एका निवाड्याचा दिस । सत्याविण रस विसरला ॥ ध्रु॥
अनुभवाविण कोण करी पाप । रिते चि संकल्प लाजलावे ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां न धरवे धीर । नव्हे जीव स्थिर माझा मज ॥ ३ ॥

॥ २२२५ ॥

नाहीं आइकत तुह्मी माझे बोल । कासया हें फोल उपणूं भूस ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येसी तें करीन बैसलिया ठायां । तूं चि बुझावया जवळी देवा ॥ ध्रु॥
करावे ते केले सकळ उपाय । आतां पाहों काय अझुनि वास ॥ २ ॥
तुका ह्मणे आला आह्मेसी सेवट । होऊनियां नीट पायां पडों ॥ ३ ॥

॥ २२२६ ॥

नव्हे तुह्मां सरी । येवढें कारण मुरारी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मग जैसा तैसा काळ । दाट सारावा पातळ ॥ ध्रु ॥
स्वामीचें तें सांडें । पुत्र होतां काळतोंडें ॥ २ ॥
शब्दा नाहीं रुची । मग कोठें तुका वेची ॥ ३ ॥

॥ २२२७ ॥

केल्या पुरती [illegible]ठी । कांहीं होत्ये टाळाटाळी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सत्यसंकल्पाचें फळ । होतां न दिसे चि बळ ॥ ध्रु ॥
दळणाच्या ओंकया । रित्या खरें मारें घ्याव्या ॥ २ ॥

जातीं उखळें चाटू । तुका ह्मणे राज्य घाटूं ॥ ३ ॥

॥ २२२८ ॥

आतां नेम जाला । याच कळसीं विठ्ठला ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ हातीं न धरीं लेखणी । काय भुसकट ते वाणी ॥ ध्रु ॥

जाणें तेणें काळ । उरला सारीन सकळ ॥ २ ॥

तुका ह्मणे घाटी । चाटू कोरडा शेवटीं ॥ ३ ॥

॥ २२२९ ॥

पावावे संतोष । तुह्मी यासाटीं सायास ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ करीं आवडी वचनें । पालटूनि क्षणक्षणें ॥ ध्रु ॥

द्यावें अभय दान । भूमी न पडावें वचन ॥ २ ॥

तुका ह्मणे परस्परें । कांहीं वाढवीं उत्तरें ॥ ३ ॥

॥ २२३० ॥

बोलतां वचन असा पाठमोरे । मज भाव बेरे कळों आले ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ मागितलें नये अरुचीनें हातां । नाहीं वरी सत्ता आदराची ॥ ध्रु ॥

समाधानासाठीं लाविलासे कान । चोरलें तें मन दिसतसां ॥ २ ॥

तुका ह्मणे आह्मां तुमचे चि फंद । वरदळ छंद कळों येती ॥ ३ ॥

॥ २२३१ ॥

काशासाटीं बैसों करूनियां हाट । वाउगा बोभाट डोंगोरा हा ॥ १ ॥

॥ध्रु.॥ काय आलें एका जिवाच्या उद्धारें । पावशी उच्चां काय हो तें ॥ध्रु॥

नेदी पट परी अन्नें तों न मारी । आपुलिये थोरीसाटीं ॥ २ ॥

तुका ह्मणे आतां अव्हेरिलें तरी । मग कोण करी [illegible] हा ॥ ३ ॥

॥ २२३२ ॥

माझा मज नाहीं । आला उबग तो कांहीं ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ तुमच्या नामाची जतन । नव्हतां थोर वाटे सीण ॥ ध्रु ॥

न पडावी निंदा । कानीं स्वामीची गोविंदा ॥ २ ॥

तुका ह्मणे लाज । आह्मां स्वामीचें तें काज ॥ ३ ॥

॥ २२३३ ॥

कांहीं मागणें हें आह्मां अनुचित । वडिलांची रीत जाणतसों ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ देह तुच्छ जालें सकळ उपाधी । सेवेपाशीं बुद्धि राहिलीसे ॥ध्रु॥

शब्द तो उपाधि अचळ निश्चय । अनुभव हा काय नाहीं अंगीं ॥ २॥

तुका ह्मणे देह फांकिला विभागीं । उपकार अंगीं उरविला ॥ ३ ॥

॥ २२३४ ॥

मागितल्यास कर पसरी । पळतां भरी वाखती ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ काय आह्मी नेणों वर्म । केला श्रम नेणतां ॥ ध्रु ॥

बोलतां बरें येतां रागा । कठीण लागा मागेंमागें ॥ २ ॥

तुका ह्मणे येथें बोली । असे चाली उफराटी ॥ ३ ॥

॥ २२३५ ॥

असो तुझें तुजपाशीं । आह्मां त्यासी काय चाड ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ निरोधें कां कोंडूं मन । समाधान असोनी ॥ ध्रु ॥

करावा तो उरे आट । खटपट वाढतसे ॥ २ ॥

तुका ह्मणे येउनि रागा । कां मी भागा मुकेन ॥ ३ ॥

॥ २२३६ ॥

आहे तें चि पुढें पाहों । बरे आहों येथें चि ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ काय वाढवूनि काम । उगा च श्रम तृष्णेचा ॥ ध्रु ॥

स्थिरावतां ओघीं बरें । चाली पुरें पडेना ॥ २ ॥

तुका ह्मणे वळितां मन । आह्मां क्षण न लगे ॥ ३ ॥

॥ २२३७ ॥

सांगा दास नव्हें तुमचा मी कैसा । ऐसें पंढरीशा विचारूनि ॥ १ ॥
॥ध्रु.॥ कोणासाटीं केली प्रपंचाची होळी । या पायां वेगळी मायबापा ॥ ध्रु॥
नसेल तो द्यावा सत्यत्वासी धीर । नये भाजूं हीर उफराटे ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मां आहिक्य परत्रीं । नाहीं कुळगोत्रीं दुजें कांहीं ॥ ३ ॥

॥ २२३८ ॥

अनन्यासी ठाव एक सर्वकाजे । एकाविण दुजें नेणे चित्त ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न पुरतां आळी देशधडी व्हावें । हें काय बरवें दिसतसे ॥ ध्रु ॥
लेंकराचा भार माउलीचे शिरीं । निढळ तें दुरी धरिलिया ॥ २ ॥
तुका ह्मणे किती घातली लांबणी । समर्थ होउनी केवढ्यासाटीं ॥ ३ ॥

॥ २२३९ ॥

स्तुती तरि करूं काय कोणापासीं ।
कीर्ती तरि कैसी वाखाणावी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ खोटया तंव नाहीं अनुवादाचें काम ।
उरला तों श्रम वरि बरा ॥ ध्रु ॥
ह्मणवावें त्याची खुण नाहीं हातीं ।
अवकळा फजिती सावकाशें ॥ २ ॥
तुका ह्मणे हेंगे तुमचें माझें तोंड ।
होऊनीयां लंड आळवितों ॥ ३ ॥

॥ २२४० ॥

कांहीं च न लगे आदि अवसान । वहुत कठीण दिसतसां ॥ १ ॥

॥ध्रु.॥ अवघ्या च माझ्या वेचविल्या शक्ती । न चलेसी युक्ति जाली पुढें ॥ध्रु॥
बोलिलें वचन हारपलें नभीं । उतरलों तों उभीं आहों तैसीं ॥ २ ॥
तुका ह्मणे कांहीं न करावेंसें जालें । थकित चि ठेलें चित्त उगें ॥ ३ ॥

॥ २२४१ ॥

रूपें गोविलें चित्त । पायीं राहिलें निश्चित ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुह्मीं देवा अवघे चि गोमटे । मुख देखतां दुःख न भेटे ॥ ध्रु ॥
जाली इंद्रियां विश्रांति । भ्रमतां पीडत तें होतीं ॥ २ ॥
तुका ह्मणे भेटी । सुटली भवबंदाची गांठी ॥ ३ ॥

इकडे पुण्यांत नागनाथ नामें एक जागृत दैवत होतें त्याजवर रामेश्वरभट्टाचा भाव असे. तो त्या देवाच्या दर्शनाकरितां गेला. तेथें एक अनघड नामें अवलिया फकीर आपल्या बागांत रहात होता. रामेश्वरभट्ट त्या बागांतील विहिरीत स्नानास गेला. स्नान करतांच त्याच्या अंगाचा दाह होऊं लागला. तेव्हां तेथील फकिराने कांहीं प्रयोग केला असें कोणी ह्मणूं लागले व तुकारामाचें कवित्व द्वेषानें बुडाविलें त्याचा परिणाम हा झाला असें ही कोणी ह्मणूं लागले. रामेश्वरभट्टाच्या अंगाचा दाह शमेना तेव्हां तो अलकापुरीस (अळंदीस) गेला व ज्ञानदेवाची आराधना करूं लागला.

तुकारामाने मागें लिहिल्याप्रमाणें दगडावर शयन केलें. वह्या बुडवून तेरा दिवस लोटल्यावर चवदाव्या दिवशीं सकाळीं त्या डोहांतून बाहेर निघाल्या व पाण्यावर तरूं लागल्या. त्या लोकांच्या दृष्टीस पडतांच त्यांनीं त्या बाहेर काढल्या व तुकारामास देवळांत येऊन तें वर्तमान कळविलें. असें महीपति ह्मणतो. त्यावरून आपण देवास कष्ट दिलेसे वाटून त्यानें पश्चात्तापप्रदर्शक असे सात अभंग केले तेः—

॥ २२४२ ॥

थोर अन्याय केला तुझा अंत म्यां पाहिला ।
जनाचिया बोलासाटीं चित्त क्षोभविलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भागविलासी केला सीण अधम मी यातिहीन ।
झांकूनि लोचन दिवस तेरा राहिलों ॥ ध्रु ॥

अवघें घालूनियां कोडें तानभुकेचें सांकडें ।
योगक्षेम पुढें तुज करणें लागेल ॥ २ ॥
उदकीं राखिले कागद चुकविला जनवाद ।
तुका ह्मणे ब्रीद साच केलें आपुलें ॥ ३ ॥

॥ २२४३ ॥

तूं कृपाळू माउली आह्मां दीनाची साउली ।
न संरित आली बाळवेशें जवळी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ माझें केलें समाधान रूप गोजिरें सगुण ।
निववीलें मन आलिंगन देऊनी ॥ ध्रु ॥
कृपा केली जना हातीं पायीं ठाव दिला संतीं ।
कळों नये चित्तीं दुःख कैसें आहे तें ॥ २ ॥
तुका ह्मणे मी अन्यायी क्षमा करीं वो माझे आई ।
आतां पुढें काई तुज घालूं सांकडें ॥ ३ ॥

॥ २२४४ ॥

कापो कोणीं माझी मान सुखें पीडोत दुर्जन ।
तुज होय सीण तें मी न करीं सर्वथा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ चुकी जाली एकवेळा मज पासूनि चांडाळा ।
उमें करोनियां जळा माजी वह्या राखील्या ॥ ध्रु ॥
नाहीं केला हा विचार माझा कोण अधिकार ।
समर्थासी भार न कळे कैसा घालावा ॥ २ ॥
गेलें होऊनियां मागें नये बोलों तें वाउगें ।
पुढिलिया प्रसंगें तुका ह्मणे जाणावें ॥ ३ ॥

॥ २२४५ ॥

काय जाणें मी पामर पांडुरंगा तुझा पार ।
धरिलिया धीर काय एक न करिसी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उतावीळ जालों आह्मीं मतिमंद हीनबुद्धि ।
परि तूं कृपानिधी नाहीं केला अव्हेर ॥ ध्रु ॥
तूं देवांचा ही देव अवघ्या ब्रह्मांडाचा जीव ।
आह्मां दासां कींव कां भाकणें लागली ॥ २ ॥
तुका ह्मणे विश्वंभरा मी तों पतित चि खरा ।
अन्याय दुसरा दारीं धरणें बैसलों ॥ ३ ॥

॥ २२४६ ॥

न्व्हती आली सीसा सुरी अथवा घाय पाठीवरी ।
तो म्यां केला हरी एवढा तुह्मां आकांत ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वांटिलासी दोहीं ठायीं मजपाशीं आणि डोहीं ।
लागों दिला नाहीं येथें तेथें आघात ॥ ध्रु ॥
जीव घेती मायबापें थोड्या अन्यायाच्या कोपें ।
हें तों नव्हे सोपें साहों तों चि जाणीतलें ॥ २ ॥
तुका ह्मणे कृपावंता तुज ऐसा नाहीं दाता ।
काय वाणूं आतां वाणी माझी कुंटली ॥ ३ ॥

॥ २२४७ ॥

तूं माउलीहून मयाळ चंद्राहूनि शीतळ ।
पाणियाहूनि पातळ कल्लोळ प्रेमाचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देऊं काशाची उपमा दुजी तुज पुरुषोत्तमा ।

ओंवाळूनि नामा तुझ्या वरूनि टाकिलों ॥ ध्रु ॥
तुवां केलें रे अमृता गोड त्या ही तूं परता ।
पांचा तत्त्वांचा जनिता सकळ सत्तानायका ॥ २ ॥
कांहीं न बोलोनि आतां उगा च चरणीं ठेवितों माथा ।
तुका ह्मणे पंढरिनाथा क्षमा करीं अपराध ॥ ३ ॥

॥ २२४८ ॥

मी अवगुणी अन्यायी किती ह्मणोन सांगों काई ।
आतां मज पायीं ठाव देईं विठ्ठले ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पुरे पुरे हा संसार कर्म बळिवंत दुस्तर ।
राहों नेदी स्थिर एके ठायीं निश्चळ ॥ ध्रु ॥
अनेक बुद्धीचे तरंग क्षणक्षणां पालटती रंग ।
धरूं जातां संग तंव तो होतो बाधक ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां अवघी तोडीं माझी चिंता ।
येऊनि पंढरिनाथा वास करीं ह्रदयीं ॥ ३ ॥

तुकारामाच्या अभंगाच्या वह्या पाण्यांतून निघाल्याची वार्ता चोहोंकडे पसरली. रामेश्वरभट्ट अळंदीस असतां त्यास तूं देहूस तुकारामाला शरण जा असा दृष्टांत झाला व तितक्यांत वह्या पाण्यांतून वर आल्याची वार्ताही त्यांच्या कानीं आली. तेणेंकरून तुकारामाशीं द्वेष केल्याचा त्यास मोठा पश्चात्ताप झाला. नंतर त्यानें तुकारामाच्या स्तुतीचा एक अभंग लिहून विद्यार्थ्याच्या हातीं तो तुकारामाकडे पाठविला. तुकारामानें तो वाचून त्यावर उत्तररूपानें एक अभंग लिहून दिला तो:—

॥ १७५१ ॥

चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती । व्याघ्र हे न खाती सर्प तया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ विष तें अमृत आघात तें हित । अकर्तव्य नीत होय त्यासी ॥ध्रु॥
दुःख तें देईल सर्व सुख फळ । होतील शीतळ अग्निज्वाळा ॥ २ ॥

आवडेल जीवां जीवाचिये परी । सकळां अंतरीं एक भाव ॥ ३ ॥
तुका ह्मणे कृपा केली नारायणें । जाणिजेते येणें अनुभवें ॥ ४ ॥

हा अभंग वाचतांच रामेश्वराच्या शरीराचा दाह शांत झाला असें ह्मणतात. नंतर रामेश्वर स्वतः तुकारामास भेटावयास आला तेव्हां अळंदीच्या वाटेवरच तुकारामाची व रामेश्वराची गांठ पडल्यानंतर रामेश्वरानें तुकारामाची फार स्तुति केली व तुकारामानें मोठ्या नम्रतेनें त्याशीं भाषण केलें. त्यापुढें रामेश्वर निरंतर तुकारामाजवळच भक्तीनें भजनपूजन करीत राहिला असें ह्मणतात. रामेश्वरभट्ट भेटल्यावर तुकाराम अळंदीस जाऊन पुनः देहूस परत आला.

रामेश्वरभट्टाच्या आंगाचा दाह तुकारामाच्या अभंगानें शांत झाल्याचें वर्तमान अनघड फकिरास समजल्यावर त्यास चमत्कार वाटून तो देहूस तुकारामाच्या दर्शनास्तव आला व तुकारामाची भेट होऊन त्यास मोटा संतोष झाला.

यानंतर एके दिवशीं एक स्त्री तुकारामापासून विषयसुख प्राप्त व्हावें या बुद्धीनें त्यास एकटा पाहून त्याजवळ गेली. तीस मातोश्री असें ह्मणून फार सदुपदेश करून तुकारामानें परतून लाविलें.

॥ ५२३ ॥

स्त्रियांचा तो संग नको नारायणा । काष्ठा या पाषाणामृत्तिकेच्या ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाठवे हा देव न घडे भजन । लांचावलें मन आवरे ना ॥ ध्रु ॥
दृष्टिमुखें मरण इंद्रियाच्या द्वारें । लावण्य तें खरें दुःखमूळ ॥ २ ॥
तुका ह्मणे जरी अग्नि जाला साधु । परी पावे बाधू संघट्टणें ॥ ३ ॥

॥ ५२४ ॥

पराविया नारी रखुमाई समान । हें गेलें नेमून ठायींचें चि ॥ १ ॥
॥ध्रु.॥ जाई वो तूं माते न करीं सायास । आह्मी विष्णुदास नव्हों तैसे॥ध्रु॥
न साहवे मज तुझें हें पतन । नको हें वचन दुष्ट वदों ॥ २ ॥
तुका ह्मणे तुज पाहिजे भ्रतार । तरी काय नर थोडे जाले ॥ ३ ॥

यानंतर पुनः तुकारामास एकवेळ लोहगांवचें बोलावणें आलें त्यावरून तो पुनः तेथें गेला. त्याजबरोबर नेहमी त्याचा भाऊ, कान्होबा, रामेश्वरभट्ट, गंगाजी मवाळ व संताजी तेली हे सर्वत्र असत व दुसरेही कितीएक लोक असत. भजनास सर्व मागें उभे राहून ध्रुपद धरीत असत. लोहगांवीं गेल्यावर भजनाची व कथेची माळ लागली. तेथें शिवाजी कासार या नामें एक रहवासी होता तो मोठा कृपण असून तुकारामाची निंदा करीत असे; परंतु कांहीं काळानें तोही तुकारामाचा खरा भाव पाहून त्याचा मोठा भाविक भक्त झाला. तो संसार सोडून अक्षय तुकारामाच्या संगतीस राहूं लागला. तेव्हां अर्थात त्याची बायको नवऱ्यास संसारांतून काढल्यामुळें तुकारामाचा द्वेष फार करूं लागली. तिनें एका प्रसंगीं तुकारामास आपल्या घरीं बोलावून आणून कपटानें फसवून त्याच्या अंगावर इतकें कढत पाणी ओतलें कीं, तेणेंकरून तुकारामाचें अंग भाजलें. त्या वेळेस त्यानें विठोबाचा धांवा केला तो अभंगः—

॥ १३१८ ॥

जळे माझी काया लागला वोणवा । धांव रे केशवा मायबापा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पेटली सकळ कांति रोमावळी । नावरे हे होळी दहन झालें ॥ध्रु.॥
फुटोनियां दोन्ही भाग होऊं पाहे । पाहातोसी काय हृदय माझें ॥ २ ॥
घेऊनि जिवन धांवें लवलाहीं । कवणाचें कांहीं न चले येथें ॥ ३ ॥
तुका ह्मणे माझी तूं होसी जननी । आणीक निर्वाणीं कोण राखे ॥ ४ ॥

पुढें कांहीं काळानें तीही तुकारामास फार मानूं लागली.

तुकारामाच्या साधुत्वाची ख्याति दिवसानुदिवस जास्तच वाढत चालली. त्यांतही अभंगांच्या वह्या पाण्यांतून कोरड्या निघाल्या व रामेश्वरभट्टाच्या अंगाचा दाह शमला इत्यादि गोष्टी ऐकून दूरदूरच्या लोकांसही मोठा अचंबा वाटला. त्या गोष्टी त्या काळचा मोठा धर्माभिमानी जो शिवाजी राजा त्याच्या कानीं गेल्या. त्यावरून तुकारामास आपल्यापाशीं बोलावून आणावें ह्मणून त्यानें कारकून, घोडे, अबदागिरी वगैरे मोठा लवाजमा देहूस पाठविला. तुकारामानें तो पाहून आह्मां भगवंताच्या दासांस यांचें कांहींच कारण नाहीं; यास्तव तुह्मीं आपला सरमजाम घेऊन आलां तसेच माघारे जा, असें कारकुनांस सांगितलें; त्याजबरोबर शिवाजीस व त्याच्या अष्टप्रधानांस उपदेशपर असे ७ अभंग लिहून पत्राच्या उत्तररूपानें दिले तेः—

॥ १८८४ ॥

दिवट्या छत्री घोडे । हें तों बऱ्यांत न पडे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां येथें पंढरिराया । मज गोविसी कासया ॥ ध्रु ॥
मान दंभ चेष्टा । हे तों शूकराची विष्ठा ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । माझे सोडवणें धांवा ॥ ३ ॥

॥ १८८५ ॥

नावडे जें चित्ता । तें चि होसी पुरविता ॥ १ ॥
॥ धु. ॥ कां रे पुरविली पाठी । माझी केली जीवेसाटीं ॥ ध्रु ॥
न करावा संग । वाटे दुरावावें जग ॥ २ ॥
सेवावा एकांत । वाटे न बोलावी मात ॥ ३ ॥
जन धन तन । वाटे लेखावें वमन ॥ ४ ॥
तुका ह्मणे सत्ता । हातीं तुझ्या पंढरिनाथा ॥ ५ ॥

॥ १८८६ ॥

विरंचीनें केलें ब्रह्मांड सकळ । तयामाजी खेळ नाना युक्ति ॥ १ ॥
॥ धु. ॥ युक्तीचा बाळक ब्रह्मनिष्ठ ज्ञानी । गुरुभक्ति मनीं विश्वासेंसी ॥ ध्रु ॥
ऐसा तुझा प्रेमा कळे कांहीं एक । पाहूनियां लेख पात्रिकींचे ॥ २ ॥
शिव तुझें नाम ठेविलें पवित्र । छत्रपति सूत्र विश्वाचें कीं ॥ ३ ॥
व्रत नेम तप ध्यानयोग कळा । करूनि मोकळा जालासी तूं ॥ ४ ॥
हेत हा लागला आमुचिये भेटी । पत्रामाजी गोष्टी हे चि थोर ॥ ५ ॥
याचें हें उत्तर ऐक गा भूपती । लिहिली विनंती हेतैंाची हे ॥ ६ ॥
अरण्यवासी आह्मी फिरों उदासीन । दर्शन ही हीन अमंगळ ॥ ७ ॥
वस्त्राविण काया जालीसे मळीन । अन्नरहित हीन फळाहारी ॥ ८ ॥

रोडके हात पाय दिसे अवकळा । काय तो सोहळा दर्शनाचा ॥ ९ ॥
तुका ह्मणे माझी विनंती सलगीची । वार्ता हे भेटीची करूं नका ॥ १० ॥

॥ १८८७ ॥

ऐसी माझी वाणी दीनरूप पाहे । हे त्या करुणा आहे ह्रदयस्थाची ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नव्हें की विलवाणें नाहीं आह्मी दीन । सर्वदा शरण पांडुरंगी ॥ ध्रु ॥
पांडुरंग आह्मां पाळिता पोसिता । आणिकांची कथा काय तेथें ॥ २ ॥
तुह्मी भेट घेणें काय हें मागणें । आशेचें हें शून्य केलें आह्मीं ॥ ३ ॥
निराशेचा गांव दिधला आह्मांसी । प्रवृत्तिभागासी सांडियेलें ॥ ४ ॥
पतिव्रतेचे हें मन पति भेटी । तैसे आह्मी विठोमाजी नांदों ॥ ५ ॥
विश्व हें विठ्ठल नाहीं दुजें कांहीं । देखणें तुझें ही तयामाजी ॥ ६ ॥
तुज ही विठ्ठल ऐसें चि वाटलें । परि एक आलें आडवें हें ॥ ७ ॥
सद्गुरुश्रीरामदासाचें भूषण । तेथें घालीं मन चळों नको ॥ ८ ॥
बहुतां ठाईं वृत्ति चावळली जेव्हां । रामदास्य तेव्हां घडे कैसें ॥ ९ ॥
तुका ह्मणे बापा चातुर्यसागरा । भक्तिभाव तारा भाविकांसी ॥ १० ॥

॥ १८८८ ॥

तुह्मांपाशीं आह्मीं येऊनियां काय । वृथा सीण आहे चालण्याचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मागावें हें अन्न तरी भिक्षा थोर । वस्त्रासी हे थार चिंध्यी बिंदी ॥ ध्रु ॥
निद्रेसी आसन उत्तम पाषाण । वरी आवरण आकाशाचें ॥ २ ॥
तेथें काय करणें कवणाची आस । वांयां होय नाश आयुष्याचा ॥ ३ ॥
राजगृहा यावें मानाचिये आसे । तेथें काय वसे समाधान ॥ ४ ॥
रायाचिये घरीं भाग्यवंता मान । इतरां सामान्यां मान नाहीं ॥ ५ ॥
देखोनियां वस्त्रें भूषणांचें जन । तात्काळ मरण येतें मज ॥ ६ ॥

ऐकोनियां मानाल उदासता जरी । तरी आह्मां हरि उपेक्षीना ॥ ७ ॥
आतां हें चि तुह्मां सांगणें कौतुक । भिक्षे ऐसें सुख नाहीं नाहीं ॥ ८ ॥
तपव्रतयाग मह्मां भले जन । आशाबद्ध हीन वर्त्तताती ॥ ९ ॥
तुका ह्मणे तुह्मी श्रीमंत मानाचे । पूर्वी च दैवांचे हरिभक्त ॥ १० ॥

॥ १८८९ ॥

आतां एक योग साधावा हा नीट । मल्याचा तो वीट मानूं नयें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जेणें योगें तुह्मां घडो पाहे दोष । ऐसा हा सायास करूं नये ॥ ध्रु. ॥
निंदक दुर्जन संग्रहीं असती । त्यांची युक्ती चित्तीं आणूं नका ॥ २ ॥
परीक्षावे कोण राज्याचे रक्षक । विवेकाविवेक पाहोनियां ॥ ३ ॥
सांगणें न लगे सर्वज्ञ तूं राजा । अनाथांच्या काजा साह्य व्हावें ॥ ४ ॥
हें चि ऐकोनियां चित्त समाधान । आणीक दर्शनें चाड नाहीं ॥ ५ ॥
घेऊनियां भेटी कोण हा संतोष । आयुष्याचे दिस गेले गेले ॥ ६ ॥
एक्दोनी कर्मे जाणोनियां वर्मे । आपुलिया धर्मे राहूं आतां ॥ ७ ॥
कल्याणकारक अर्थ याचा एक । सर्वां भूतीं देख एक आत्मा ॥ ८ ॥
आत्मारामीं मन ठेवूनियां राहें । रामदासीं पाहें आपणेयां ॥ ९ ॥
तुका ह्मणे राया धन्य जन्म क्षिती ॥ त्रैलोकीं हे ख्याति कीर्ति तुझी ॥ १० ॥

॥ १८९० ॥

आतां हे विनवणी प्रधानअष्टक । प्रभूसी विवेक समजावा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ प्रतिनिधि मानरक्षक चतुर । सात्विकाचें घर तुह्मांपाशीं ॥ ध्रु. ॥
मजुमुचे धणी लेखनकारक । पत्रींचा विवेक समजावा ॥ २ ॥
पेशवे सुरनिस चिटनिस डबीर । राजाज्ञा सुमंत सेनापति ॥ ३ ॥
भूषण पंडितराय विद्याधन । [illegible] नमन माझें असे ॥ ४ ॥

पत्राचा हा अर्थ अंतरीं जाणोनि । विवंचोनि श्रवणीं घाला तया ॥ ५ ॥

सात्विक प्रेमळ दृष्टांताच्या मतें। बोलिलों बहुत कळावया ॥ ६ ॥

यथास्थित निरोप सांगणें हा राया । अर्थ पाहा वांयां जाऊं नेदा ॥ ७ ॥

भिडेसाटीं बोला गाळूनि अर्थातें । अनर्थकारी तुमतें होइल तेणें ॥ ८ ॥

तुका ह्मणे तुह्मां नमन अधिकाऱ्यां । सांगणें तें राया पत्र माझें ॥ ९ ॥

कारकून हें उत्तर घेऊन परत गेल्यावर शिवाजी राजास तुकारामाची इतकी निस्पृहता पाहून विशेषच चमत्कार वाटला आणि तो स्वतः त्याच्या दर्शनास जाण्यास सिद्ध झाला. बरोबर कांहीं प्रमुख प्रमुख लोक घेतले व नजराण्याकरितां पुष्कळ जड जवाहिर घेतलें. लोहगांवीं आल्यावर तुकारामास प्रणत होऊन जवाहिरानें भरलेलें तबक त्याच्या पुढें ठेविलें. तें पाहून तुकारामानें त्याचा मनापासून अतिशय तिरस्कार केला. त्या प्रसंगिंचे अभंगः—

॥ १८९१ ॥

जाणोनि अंतर । टाळिसील करकर ॥ १ ॥

॥ धु. ॥ तुज लागली हे खोडी । पांडुरंगा बहु कुडी ॥ ध्रु ॥

उठविसी दारीं । धरणें एखादिया परी ॥ २ ॥

तुका ह्मणे पाये । कैसे सोडीन ते पाहें ॥ ३ ॥

॥ १८९२ ॥

नाहीं विचारीत । मेघ हागणदारी सेत ॥ १ ॥

॥ धु. ॥ नये पाहों त्याचा अंत । ठेवीं कारणापें चित्त ॥ ध्रु ॥

वर्जीत गंगा । नाहीं उत्तम अधम जगा ॥ २ ॥

तुका ह्मणे मळ । नाहीं अग्नीसी विटाळ ॥ ३ ॥

॥ १८९३ ॥

काय दिला ठेवा । आह्मां विठ्ठल चि व्हावा ॥ १ ॥

॥ धु. ॥ तुह्मी कळलेती उदार । साटीं परिसाची गार ॥ ध्रु ॥

जीव दिला तरी । वचना माझ्या नये सरी ॥ २ ॥
तुका ह्मणे धन । आह्मां गोमासा समान ॥ ३ ॥

॥ १८९४ ॥

पिकवावें धन । ज्याची आस करी जन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पुढें उरे खातां देतां । नव्हे खंडण मवितां ॥ ध्रु ॥
खोलीं पडे ओलीं बीज । तरी च हातीं लागे निज ॥ २ ॥
तुका ह्मणे धनी । विठ्ठल अक्षरें हीं तिन्ही ॥ ३ ॥

॥ १८९५ ॥

मुंगी आणि राव । आह्मां सारखाची जीव ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ गेला मोह आणि आशा । कळिकाळाचा हा फांसा ॥ ध्रु ॥
सोनें आणि माती । आह्मां समान हे चित्तीं ॥ २ ॥
तुका ह्मणे आलें । घरा वैकुंठ सगळें ॥ ३ ॥

॥ १८९६ ॥

तिहीं त्रिभुवनीं । आह्मी वैभवाचे धनी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हातां आले घाव डाव । आमचा मायबाप देव ॥ ध्रु ॥
काय त्रिभुवनीं बळ । अंगीं आमुच्या सकळ ॥ २ ॥
तुका ह्मणे सत्ता । अवघी आमुची च आतां ॥ ३ ॥

॥ १८९७ ॥

आह्मी तेणें सुखी । ह्मणा विठ्ठल विठ्ठल मुखीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुमचें येर वित्त धन । तें मज मृत्तिकेसमान ॥ ध्रु ॥
कंठीं मिरवा तुळसी । व्रत करा एकादशी ॥ २ ॥
ह्मणवा हरिचे दास । तुका ह्मणे मज हे आस ॥ ३ ॥

तुकारामानें शिवाजीस सांगितलें कीं, तुह्मी भगवद्भक्ति केली ह्मणजे तोच आह्मांस नजराणा आहे. शिवाजीस ही निष्काम व निर्लोभ वृत्ति पाहून मोठाच अचंबा वाटला. त्यानें नजराण्याकरितां आणिलेलें सर्व द्रव्य तेथें ब्राह्मणांस वांटून टाकलें. लोहगांवीं तुकारामाचा भजन, पूजन, कीर्तन, नामस्मरण इत्यादि गोष्टींत कालक्षेप होत आहे असें पाहून शिवाजीस राज्यभोगादिविषय तुच्छसे वाटूं लागले, आणि दुसऱ्याच दिवसापासून मोठ्या सकाळीं वनांत एकांतीं जाऊन बसावें व संध्याकाळीं तुकारामाच्या कथेस येऊन बसावें असा क्रम त्यानें सुरू केला. प्रधानादिकांस परत जाऊन राज्यकारभार चालविण्यास सांगितलें. त्यांनीं तें वर्तमान शिवाजीची मातोश्री जिजाबाई यांस साद्यंत लिहून पाठविलें, त्यावरून तीस वाईट वाटून ती तावडतोब तुकारामाजवळ स्वतः निघून गेली. आपला एकुलताएक पुत्र व तोही पुढें अपुत्रिक असतां राज्य टाकून विदेही झाला तर आतां राज्य कसें चालावें, असें बोलून शिवाजीस तुह्मी योग्य उपदेश करून पुनः संसारांत घाला ह्मणून जिजाबाईनें तुकारामाची मोठ्या नम्रतेनें व दीनवाणीनें प्रार्थना केली. तुकारामानें तीस आश्वासन दिलें कीं, शिवाजी रात्रीं कीर्तनास येईल त्यावेळीं त्यास दोन गोष्टी सांगूं, तुह्मी कांहीं काळजी न करितां देवाचें नांव घेत बसा. रात्रीं कीर्तनास आरंभ होतांच शिवाजी राजा तेथें आला. तुकारामानें तो समय साधून प्रथमतः कर्मकांडाचें निरूपण आरंभिलें. त्यांत त्यानें असें सांगितलें कीं, जो ज्याचा स्वधर्म तोच त्यानें आचरला पाहिजे; त्यावांचून त्यास दुसरा तरणोपाय नाहीं. दुसऱ्याचा धर्म चांगला दिसतो ह्मणून तो आपण केल्यास तो आपणास तरणोपाय होत नाहीं, असा शास्त्रांत निर्णय केला आहे. त्यानंतर त्यानें ब्राह्मण क्षत्रियादि चारी वर्णांचीं व चारी आश्रमांचीं कर्में सांगितलीं व त्यांत विशेषतः क्षत्रिय धर्माचें विशेष स्पष्टीकरण करून त्यांत प्रजापालन करणें हाच त्याचा मुख्य धर्म व यापासूनच त्यास परमार्गसाधन होतें असें श्रोत्यांच्या व विशेषतः शिवाजीच्या मनांत पूर्णपणें बिंबवून दिलें. यावरून पुनः राज्यकारभार करण्याविषयीं शिवाजीचा निश्चय झाला. त्यानंतर आणखी चार दिवस तेथें राहून तुकारामाचा प्रसाद व आशीर्वाद घेऊन तो मातोश्रीसहवर्तमान आपल्या राजधानीस परत गेला.

याच समयास नावजीमाळी ह्मणून कुणबी व कोंडभट पुराणिक ह्मणून एक ब्राह्मण हे तुकारामाचे निःसीम अनुयायी झाले. रामेश्वरभट्ट व कोंडभट्ट हे दोघेही चांगले ज्ञाते होते असें महिपती ह्मणतो. यांसुद्धां एकंदर चौदा असामी त्याचे ठरलेले अनुयायी होते. जेथे जेथ तुकाराम जाई तेथें तेथें हे लोक त्याजमागें जात.

तुकाराम चार महिने लोहगांवास राहून नंतर पुनः देहूस परत आला. यानंतर तुका-

रामाच्या हातून दरिद्र्यास चमत्कारिक रीतीनें लक्ष्मी प्राप्त होणें, मुक्यास वाचा फुटणें, एका मनुष्याचें अन्न हजारो जणांस पुरणें, इत्यादि अनेक अद्भुत चमत्कार घडल्याविषयीं महीपतीनें पुष्कळ लिहिलें आहे.

आषाढी व कार्तिकी या एकादशांस तुकाराम वारकऱ्यांच्या मोठ्या मेळ्या सहवर्त्तमान पंढरीच्या वारीस नेमानें जात असे. परंतु एके समयीं त्या सुमारास असें झालें कीं, तो अजारी होऊन पडला, त्यामुळें वारीस जाण्यास सामर्थ्य उरलें नाही. तेव्हां चोहोंकडून पंढरीस जाण्याकरितां देहू मुक्कामीं सुमारें चौदाशें वारकरी पताका घेऊन आले होते त्यांजबरोबर तुकारामानें छत्तीस अभंगाचें एक पत्र लिहून पाठविलें. त्यांत आपण अजारी असून येण्यास असमर्थ असल्याचा व आपणावर विठोबानें करुणा करावी अशा प्रकारचा मजकूर लिहिला ते अभंगः—

॥ १९०९ ॥

कोणा मुखें ऐसी ऐकेन मी मात । चाल तुज पंढरिनाथ बोलावितो ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मग मी न धरीं आस मागील बोभाट । वेगीं धरिन वाट माहेराची ॥ ध्रु ॥
निरांजलें चित्त करितें तळमळ । केधवां देखती मूळ आलें डोळे ॥ २ ॥
तुका ह्मणे कई भाग्याची उजरी । होईल पंढरी देखावया ॥ ३ ॥

॥ १९१० ॥

कां माझा विसर पाडिला मायबापा । सांडियेली कृपा कोण्या गुणें ॥ १ ॥
॥ धु. ॥ कैसा कंठूनियां राहों संवसार । कांग एक धीर देऊं मना ॥ ध्रु ॥
नाहीं निरोपाची पावली वारता । करावी ते चिंता ऐसी कांहीं ॥ २ ॥
तुका ह्मणे एक वेचूनि वचन । नाहीं समाधान केलें माझें ॥ ३ ॥

॥ १९११ ॥

कांहीं माझे कळों आले गुणदोष । ह्मणऊनि उदास धरिलें ऐसें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं तरी येथें न घडे अनुचित । नाहीं ऐसी रीत तया घरीं ॥ ध्रु ॥
कळावें तें मना आपलिया सवें । ठायींचें हें घ्यावें विचारूनि ॥ २ ॥

तुका ह्मणे मज अव्हेरिलें देवें । माझिया कर्तव्यें बुद्धीचिया ॥ ३ ॥

॥ १९१२ ॥

नव्हे धीर कांहीं पाठवूं निरोप । आला तरी कोप येऊ सुखें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कोपोनियां तरी देईल उत्तर । जैसें तैसें पर फिरावूनि ॥ ध्रु ॥
नाहीं तया तरी काय एक पोर । मज तों माहेर आणीक नाहीं ॥ २ ॥
तुका म्हणे असे तयामध्यें हित । आपण निवांत असों नये ॥ ३ ॥

॥ १९१३ ॥

आतां पाहों पंथ माहेराची वाट । कामाचा बोभाट पडो सुखें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय करूं आतां न गमेसें जालें । बहुत सोसिलें बहु दिस ॥ ध्रु ॥
घर लागे पाठी चित्ता उभे वारे । आपुलें तें झुरे पाहावया ॥ २ ॥
तुका ह्मणे जीव गेला तरी जाव । धरिला तो देव भाव सिद्धी ॥ ३ ॥

॥ १९१४ ॥

विनवीजे ऐसें भाग्य नाहीं देवा । पायांशीं केशवा सलगी केली ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धीटपणें पत्र लिहिलें आवडी । पार नेणे थोडी मति माझी ॥ ध्रु ॥
जेथें देवा तुझा न कळे चि पार । तेथें मी पामर काय वाणूं ॥ २ ॥
जैसे तैसे माझे बोल अंगीकारीं । बोबड्या उत्तरीं गौरवितों ॥ ३ ॥
तुका ह्मणे विटेवरि जीं पाउलें । तेथें म्यां ठेविलें मस्तक हें ॥ ४ ॥

॥ १९१५ ॥

देवांच्या ही देवा गोपिकांच्या पती । उदार हे ख्याती त्रिभुवनीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पातकांच्या राशी नासितोसी नामें । जळतील कर्में महादोष ॥ ध्रु ॥
सर्व सुखें तुझ्या वोळगती पायीं । ऋद्धि सिद्धि ठायीं मुक्तिचारी ॥ २ ॥
इंद्रासी दुर्लभ पाविजे तें पद । गीत गातां छंद वातां टाळी ॥ ३ ॥

तुका ह्मणे जड जीव शक्तिहीन । त्यांचें तूं जीवन पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ १९१६ ॥

काय जालें नेणों माझिया कपाळा । न देखिजे डोळां मूळ येतां ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ बहु दिस पाहें वचनाची वास । धरिलें उदास पांडुरंगा ॥ध्रु॥

नाहीं निरोपाचें पावलें उत्तर । ऐसें तों निष्ठुर न पाहिजे ॥ २ ॥

पडिला विसर किंवा कांहीं धंदा । त्याहूनि गोविंदा जरूरसा ॥ ३ ॥

तुका ह्मणे आलें वेचाचें सांकडें । देणें घेणें पुढें तो ही धाक ॥ ४ ॥

॥ १९१७ ॥

एवढा संकोच तरि कां व्यालासी । आह्मी कोणांपाशीं तोंड वासूं ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ कोण मज पुसे सिणलें भागलें । जरी मोकलिलें तुह्मीं देवा ॥ध्रु॥

कवणाची वाट पाहों कोणीकडे । कोण मज ओढे जीवलग ॥ २ ॥

कोण जाणे माझे जीवींचें सांकडें । उगवील कोडें संकटाचें ॥ ३ ॥

तुका ह्मणे तुह्मी देखिली निश्चिती । काय माझे चित्तीं पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ १९१८ ॥

देई डोळे भेटी न धरीं संकोच । न घलीं कांहीं वेच तुजवरी ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ तुज बुडवावें ऐसा कोण धर्म । अहर्निशीं नाम घेतां थोडें ॥ध्रु॥

फार थोडें कांहीं करूनि पातळ । त्याजमध्यें काळ कडे लावूं ॥ २ ॥

आहे माझी ते चि सारीन सिदोरी । भार तुजवरी नेदीं माझा ॥ ३ ॥

तुका ह्मणे आह्मां लेंकराची जाती । भेटावया खंती वाटतसे ॥ ४ ॥

॥ १९१९ ॥

सीण भाग हरे तेथींच्या निरोपें । देखिलिया रूप उरी नुरे ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ इंद्रियांची धांव होईल कुंटित । पावेल हें चित्त समाधान ॥ध्रु॥

माहेर आहेसें लौकिकीं कळावें । निढळ बरवें शोभा नेदी ॥ २ ॥
आस नाहीं परी उरी बरी वाटे । आपलें तें भेटे आपणासी ॥ ३ ॥
तुका ह्मणे माझी अविट आवडी । खंडण तांतडी होऊं नेदीं ॥ ४ ॥

॥ १९२० ॥

धरितों वासना परी नये फळ । प्राप्तीचा तो काळ नाहीं आला ॥१॥
॥ ध्रु. ॥ तळमळी चित्त घातलें खापरीं । फुटतसे परी लाहीचिया ॥ध्रु॥
प्रकार ते कांहीं नावडती जीवा । नाहीं पुढें ठावा काळ हार्ती ॥ २ ॥
जातों तळा येतों मागुताला वरीं । वोळशाचे फेरी सांपडलों ॥ ३ ॥
तुका ह्मणे बहु करितों विचार । उतरें डोंगर एक चढें ॥ ४ ॥

॥ १९२१ ॥

कां माझे पंढरी न देखती डोळे । काय हें न कळे पाप यांचें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पाय पंथें कां हे न चलती वाट । कोण हें अदृष्ट कर्म बळी ॥ध्रु॥
कां हें पायांवरी न पडे मस्तक । क्षेम कां हस्तक न पावती ॥ २ ॥
कां या इंद्रियांची न पुरे वासना । पवित्र होईना जिव्हा कीर्ती ॥ ३ ॥
तुका ह्मणे कई जाऊनि मोटळें । पडेन हा लोळें महाद्वारीं ॥ ४ ॥

॥ १९२२ ॥

काय पोरें जालीं फार । किंवा न साहे करकर ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणऊनि केली सांडी । घांस घेऊं न व्हां तोंडीं ॥ ध्रु ॥
करूं कलागती । तुज भांडणें भोंवतीं ॥ २ ॥
तुका ह्मणे टांचें । घरीं जालेंसेवरोचें ॥ ३ ॥

॥ १९२३ ॥

कांहीं चिंतेविण । नाहीं उपजत सीण ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ तरी हा पडिला विसर । माझा तुम्हां जाला भार ॥ ध्रु ॥
आली कांहीं तुटी । गेली सुटोनियां गांठी ॥ २ ॥
तुका ह्मणे घरीं । बहु बैसले रिणकरी ॥ ३ ॥

॥ १९२४ ॥

निरोपासी वेचे । काय बोलतां फुकाचें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ परी हें नेघेवे चि यश । भेओं नको सुखी आस ॥ ध्रु ॥
सुख समाधानें । कोण पाहे देणें घेणें ॥ २ ॥
न लगे निरोपासी मोल । तुका ह्मणे वेचे बोल ॥ ३ ॥

॥ १९२५ ॥

जोडीच्या हव्यासें । लागे धनाचें चि पिसें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मग आणिक दुसरें । लोभ्या नावडती पोरें ॥ ध्रु ॥
पाहे रुक्याकडे । मग अवघें ओस पडे ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । तुला बहुत चि हेवा ॥ ३ ॥

॥ १९२६ ॥

मांविलें मविती । नेणों रासी पडिल्या किती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ परि तूं घाला चि न घासी । आलें उभाउभीं घेसी ॥ ध्रु ॥
अवघ्या अवघा काळ । वाटा पाहाती सकळ ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं । अराणूक तुज कांहीं ॥ ३ ॥

॥ १९२७ ॥

न बैससी खालीं । सम उभा च पाउलीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसे जाले बहुत दिस । जालीं युगें अठ्ठाविस ॥ ध्रु ॥
नाहीं भाग सीण । अराणूक एक क्षण ॥ २ ॥

तुका ह्मणे किती । मापें केलीं देती घेती ॥ ३ ॥

॥ १९२८ ॥

जोडी कोणासाटीं । एवढी करितोसी आटी ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ जरी हें आह्मां नाहीं सुख । रडों पोरें पोटीं भूक ॥ ध्रु ॥

करूनि जतन । कोणा देसील हें धन ॥ २ ॥

आमचे तळमळे । तुझें होईल वाटोळें ॥ ३ ॥

घेसील हा श्राप । माझा होऊनियां बाप ॥ ४ ॥

तुका ह्मणे उरी । आतां न ठेवीं यावरी ॥ ५ ॥

॥ १९२९ ॥

करूनि चाहाडी । अवघी बुडवीन जोडी ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ जरि तूं होऊनि उदास । माझी बुडविसी आस ॥ ध्रु ॥

येथें न करीं काम । मुखें नेघे तुझें नाम ॥ २ ॥

तुका ह्मणे कुळ । तुझें बुडवीन समूळ ॥ ३ ॥

॥ १९३० ॥

समर्थाचे पोटीं । आह्मीं जन्मलों करंटीं ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ ऐसी जाली जगीं कीर्ति । तुझ्या मानाची फजिती ॥ ध्रु ॥

येथें नाहीं खाया । न ये कोणी मूळ न्याया ॥ २ ॥

तुका ह्मणे जिणें । आतां खोटें जीवपणें ॥ ३ ॥

॥ १९३१ ॥

पुढें तरी चित्ता । काय येईल तें आतां ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ मज सांगोनियां धाडीं । वाट पाहातों बराडी ॥ ध्रु ॥

कंठीं धरिला प्राण । पायांपाशीं आलें मन ॥ २ ॥

तुका ह्मणे चिंता । बहु वाटतसे आतां ॥ ३ ॥

॥ १९३२ ॥

कैंचा मज धीर । कोठें बुद्धि माझी स्थिर ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जें या मनासी आवरूं । आंत पोटीं वाव धरूं ॥ ध्रु ॥
कैंची शुद्ध मति । भांडवल ऐसें हातीं ॥ २ ॥
तुका ह्मणे अंगा । कोण दशा आली सांगा ॥ ३ ॥

॥ १९३३ ॥

समर्पक वाणी । नाहीं ऐकिजेसी कानीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां भावें करूनि साचा । पायां पडिलों विठोबाच्या ॥ ध्रु ॥
न कळे उचित । करूं समाधान चित्त ॥ २ ॥
तुका ह्मणे विनंती । विनविली धरा चित्तीं ॥ ३ ॥

॥ १९३४ ॥

येती वारकरी । वाट पाहातों तोंवरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ घालूनियां दंडवत । पुसेन निरोपाची मात ॥ ध्रु ॥
पत्र हातीं दिलें । जया जेयें पाठविलें ॥ २ ॥
तुका ह्मणे येती । जाइन सामोरा पुढती ॥ ३ ॥

॥ १९३५ ॥

रुळे महाद्वारीं । पायां खालील पायरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसें माझें दंडवत । निरोप सांगतील संत ॥ ध्रु ॥
पडे दंडकाठी । देह भलतीसवा लोटी ॥ २ ॥
तुका ह्मणे बाळ । लोळे न धरितां सांभाळ ॥ ३ ॥

॥ १९३६ ॥

तुह्मीं संतजनीं । माझी करावी विनवणी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय तुक्याचा अन्याय । त्यासी अंतरले पाय ॥ ध्रु ॥
भाका बहुतां रीती । माझी कीव काकुलती ॥ २ ॥
न देखे पंढरी । तुका चरण विटेवरी ॥ ३ ॥

॥ १९३७ ॥

होईल कृपादान । तरी मी येईन धांवोन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ होती संतांचिया भेटी । आनंदें नाचों वाळवंटीं ॥ ध्रु ॥
रिघेन मातेपुढें । स्तनपान करीन कोडें ॥ २ ॥
तुका ह्मणे ताप । हरती देखोनियां बाप ॥ ३ ॥

॥ १९३८ ॥

परिसोनि उत्तर । जाब देईजे सत्वर ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जरी तूं होसी कृपावंत । तरि हा बोलावीं पतित ॥ ध्रु ॥
नाणी कांहीं मना । करूनि पापाचा उगाणा ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं । काय शक्ति तुझे पायीं ॥ ३ ॥

॥ १९३९ ॥

ऐकोनियां कीर्ती । ऐसी वाटती विश्रांती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ माते सुख डोळां पडे । तेथें कोण लाभ जोडे ॥ ध्रु ॥
बोलतां ये वाचे । वीट नये जिव्हा नाचे ॥ २ ॥
तुका ह्मणे धांवे । वासना ते रस घ्यावे ॥ ३ ॥

॥ १९४० ॥

किती करूं शोक । पुढें वाढे दुःखें दुःख ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ आतां जाणसी तें करीं । माझें कोण मनीं धरी ॥ ध्रु ॥
पुण्य होतें गांठी । तरि कां लागती हे आटी ॥ २ ॥
तुका ह्मणे बळ । माझी राहिली तळमळ ॥ ३ ॥

॥ १९४१ ॥

करील आबाळी । माझ्या दांताची कसाळी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जासी एखादा मरोन । पाठी लागेल हें जन ॥ ध्रु ॥
घरीं लागे कळ्ह । नाहीं जात तो शीतळ ॥ २ ॥
तुका ह्मणे पोरवडे । मज येतील रोकडे ॥ ३ ॥

॥ १९४२ ॥

आतां आशीर्वाद । माझा असो सुखें नांद ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणसी कोणा तरी काळें । आहेतसीं माझीं बाळें ॥ ध्रु ॥
दुरी दूरांतर । तरी घेसी समाचार ॥ २ ॥
नेसी कधीं तरी । तुका ह्मणे लाज हरी ॥ ३ ॥

॥ १९४३ ॥

आतां हे सेवटीं । माझी आइकावी गोष्टी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां द्यावा वचनाचा । जाब कळे तैसा याचा ॥ ध्रु ॥
आतां करकर । पुढें न करीं उत्तर ॥ २ ॥
तुका ह्मणे ठसा । तुझा आहे राखें तैसा ॥ ३ ॥

॥ १९४४ ॥

बोलिलों तें आतां । कांहीं जागतां नेणतां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ क्षमा करावे अन्याय । पांडुरंगे माझे माय ॥ ध्रु ॥
स्तुती निंदा केली । लागे पाहिजे साहिली ॥ २ ॥
तुका ह्मणे लाड । दिला तैसें पुरवा कोड ॥ ३ ॥

वारकरी पंढरपुरास निघून गेल्यानंतर पांडुरंग आपणावर कृपा करील अगर नाहीं कोण जाणे, अशा संशयांत तुकाराम होता व वारकरी परत येण्याची मार्गप्रतीक्षा करीत होता. त्यांच्या येण्याच्या संधीस त्यांस मोठ्या उत्कंठेनें सामोरा जाऊन तुकारामानें त्यांचा फारच आदरसत्कार केला. व त्यांजपासून पंढरपुरच्या उत्साहासंबंधी सर्व हकीकत ऐकून तो संतोष पावला. तुकारामाने अभंग रूपानें पाठविलेलें पत्र वारकऱ्यांनीं दिल्यावर पांडुरंगाने स्वतः देहूस येऊन तुकारामास दर्शन दिले; व त्याच्या घरीं जाऊन भोजन केलें, अशी आख्यायिका आहे.

नेहमी मुकुंदराजकृत विवेकसिंधु वाचणारा एक वेदांती निर्गुणब्रह्मवादी ब्राह्मण होता, तो तुकारामाची बहुत हेळणा करीत असे. त्यानें एके प्रसंगीं आपणापासून तुकारामानें विवेकसिंधु ऐकावा असा योग आणिला. तुकाराम बाह्यात्कारें "हो" ह्मणून त्याच्यापुढें सर्वांगावरून घुंगट घेऊन श्रवणास बसला. कांहीं हुंकार वगैरे मुळीच न देतां एक प्रहर लोटला, तेव्हां ब्राह्मणानें तुकारामाचें घुंगट काढून पाहिलें तों त्यानें कानांत घट्ट बोटें घालून नामस्मरण चालविलें होतें. ब्राह्मणानें हे पाहून तुकारामाची उघडपणे हेळणा मांडिली. तेव्हा त्याने निर्गुणोपासनेपेक्षां सगुणोपासनेची योग्यता अधिक दाखवून निर्गुण विषयक वर्णन ऐकण्याची माझी इच्छा नाहीं असें सांगितलें व पुढें त्या ब्राह्मणासही आपल्या अनुयायिवर्गांत आणिलें.

एका प्रसंगीं लोहगांवास तुकाराम कीर्त्तन करीत असतां एका बाईनें आपल्या मुलाचें प्रेत आणून तेथें टाकलें आणि ह्मणाली की, "यास जर उठविशील तरच तूं विष्णुभक्त खरा." तुकारामाचे भजन चालतां चालतां ते मूल सजीव होऊन उठून बसलें असें महीपीत ह्मणतो. याबद्दल तुकाराम अभंगांत असें ह्मणतो:—

॥ २३१५ ॥

अशक्य तों तुह्मी नाहीं नारायणा । निर्जीवा चेतना आणावया ॥ १ ॥
॥ध्रु.॥ मागें काय जाणों स्वामीचे पवाडे । आतां कां रोकडे दावूं नये॥ ध्रु॥
थोर भाग्य आह्मी समर्थाचे कासे । ह्मणवितों दास काय थोडें ॥ २ ॥
तुका ह्मणे माझे निववावे डोळे । दावूनि सोहाळे सामर्थ्याचे ॥ ३ ॥

॥ २३१६ ॥

दाता तो एक जाणा । नारायणा स्मरवी ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ आणीक नासिवंतें काय । न सरे हाय ज्यांच्यानें ॥ ध्रु ॥
यावें तयां काकुलती । जे दाविती सुपंथ ॥ २ ॥
तुका ह्मणे उरी नुरे । त्याचे खरे उपकार ॥ ३ ॥

दुसऱ्या एका प्रसंगीं लोहगांवीं तुकारामाचें कीर्तन चाललें असतां तेथें दोन मोठे दुरभिमानी संन्यासी बसले होते. तुकारामानें नाममाहात्म्य चालविलें तेव्हां दोन्ही संन्याशांस तुकारामाचें वर्चस्व सहन न होऊन ते पुण्यांतील दादोजी कोंडदेव (शिवाजी राजाचा शिक्षक) मोकाशी याजकडे फिर्याद गेले कीं, तुकाराम जातीचा शूद्र असून वेदोक्त कर्ममार्गाच्या उच्छेदार्थ प्रवृत्त झाला आहे व भोळ्या भाविक जनांस नाममाहात्म्य सांगून त्यापासून भ्रष्ट करीत आहे व ते ब्राह्मण असतांही त्यास नमस्कार करितात त्यापक्षीं त्यास येथें आणून चांगली शिक्षा करावी. मोकाशी शाहणा व चतुर होता; त्यानें संन्याशांस सांगितलें कीं, तुकारामास बोलावून आणून त्याचा व तुमचा वादविवाद करवूं आणि जे हरतील त्यांस शिक्षा करूं असें सांगून तुकारामास बोलावणें पाठविलें. तुकाराम पुण्यास आला त्याजबरोबर सर्व लोहगांवकर ब्राह्मणादि मंडळ आलें. पुण्यांत संगमावर तुकाराम उतरला असतां तेथील भाविक लोकांनीं त्याचा मोठाच आदरसत्कार केला. दादोजी कोंडदेवही त्याच्या भेटीस निघाला. संन्यासी यांनीं दादोजीस निषेध केला तरी तो ह्मणाला मी त्यास येथें तुह्मांशीं वादविवादाकरितां घेऊन येतों. असें ह्मणून त्यानें तुकारामास मोठ्या आदरानें गांवांत आणिलें. नंतर तेथें कीर्तनास प्रारंभ झाल्यावर ते संन्यासी तेथें आले होते; त्यांसही तुकयाचा भाव वगैरे पाहून पश्चात्ताप झाला व ते त्यास प्रणत झाले. तेव्हां दादोजीस[१] मोठा क्रोध येऊन तो संन्याशांस ह्मणाला कीं, तुह्मी हरलां सबब मी तुह्मांस गाढवावर बसवून तुमची धिंड काढतों. परंतु शेवटीं तुकारामाच्या मध्यस्थीनेंच ती गोष्ट रहित झाली.

तुकारामाविषयीं झालेला वृत्तांत दादोजीनें शिवाजीस लिहून पाठविला, तेव्हां तो स्वतः त्याच्या दर्शनार्थ पुण्यांत आला. तेथें एकेदिवशीं शिवाजी तुकारामाच्या कथेंत

---

१ दादोजी हा खोट्याचा व अन्यायाचा अतिशय द्वेष्टा होता. तो एकवेळ, स्वतांच्या हातून झालेला लहानसा अन्याय वायकोनें विनोदानें दाखवल्यावरून आपलाच हात तोडण्यास सिद्ध झाला होता; परंतु तितक्यांत एका पंडितानें येऊन सांगितलें कीं, जो हात जितका तोडायाचा त्याची बाही नेहमीं तितकी कापली ह्मणजे तो हात तोडल्याप्रमाणें झालें. त्यांप्रमाणेंच दादोजीनें आमरणांत चालविलें होतें असें महीपतीनें लिहिलें आहे.

बसला असतां चाकणच्या किल्ल्यांत जो मुसलमान अधिकारी होता त्यास शिवाजी पुण्यांत आल्याचे वर्तमान कळून त्याने पठाण लोक त्यास पकडण्यासाठी पाठविले होते ते तेथे येऊन थडकले. ही गूल शिवाजीस कळताच त्याने तुकारामापाशी जावयास निरोप मागितला. तुकारामानें निरोप न देता आलेल्या परचक्रापासून सर्वांचें संरक्षण करण्याकरितां विठोबाचा धांवा केला. मुसलमान कथेत शिवाजीस धरण्याकरितां आले; परंतु शिवाजी कोणता हा त्यास उमजच पडला नाही; इतक्यांत त्या श्रोत्यांतून एक मनुष्य बाहेर पडून गेला व तो शिवाजीसा शत्रूंच्या कांही लोकांस भासला. ह्मणून आलेल्या सर्व पठाणांनी त्याचा दूरवर पाठलाग केला; परतु तो हाती लागला नाही. याप्रमाणे परचक्र निघून गेल्यावर शिवाजी सिंहगडास निघून गेला व तुकाराम सर्व अनुयायीलोकांसुद्धां लोहगांवास निघून गेला.

कांडोबा लोहोकरे ह्मणून एक ब्राह्मण होता तो तुकारामाच्या कथेत ध्रुवपद धरीत असे. त्याच्या मनांत महायात्रा करण्याचं येऊन त्यानं तुकारामास आपणास द्रव्यसामग्री करून देण्याविषयी प्रार्थना केली. ती त्याची तुकारामानं अद्भुत रीतीनं शेवटास नेली असं ह्मणतात. ह्मणजे त्याने त्यास एक होन दिला होता व तो मोडून त्यातला एक पैसा पदरी बांधून ठेवण्यास सांगितलं होतं. तसं केलं ह्मणजे पुनः त्याचा होन होत असे तो शेवटपर्यंत पुरून शेवटी तुकारामानं तो परत घेतला असं महीपति ह्मणतो. तुकारामानं या ब्राह्मणाबरोबर काशीविश्वेश्वरास, भागीरथीस व विष्णुपदास पत्ररूपानं पाठविले ते अभंग—

॥ १६५६ ॥

परिसें वो माते माझी विनवणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ॥ १ ॥
॥धु.॥ भागीरथी महादोष निवारणी । सकळा स्वामिणी तीर्थांचिये ॥धृ॥
जीतां भुक्ति मोक्ष मरणें तुझ्या तिरीं । अहिक्यपरत्रीं सुखरूप ॥ २ ॥
तुका विष्णुदास संतांचें पोसणें । वाक्पुष्प तेणें पाठविलें ॥ ३ ॥

॥ १६५७ ॥

तुह्मी विश्वनाथ । दीन रंक मी अनाथ ॥ १ ॥
॥ धु. ॥ कृपा कराल ते थोडी । पायां पडिलों बराडी ॥ धृ ॥
काय उणें तुह्मांपाशीं । मी तों अल्पें चि संतोषी ॥ २ ॥

तुका ह्मणे देवा । कांहीं भातुकें पाठवा ॥ ३ ॥

॥ १६५८ ॥

पिंड पदावरी । दिला आपुलिये करीं ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ माझें जालें गयावर्जन । फिटलें पितरांचें ऋण ॥ ध्रु ॥

केलें कर्मांतर । बोंब मारिली हरिहर ॥ २ ॥

तुका ह्मणे माझें । भार उतरलें ओझें ॥ ३ ॥

एका प्रसंगीं तुकाराम आळंदीस गेला असतां तेथें "आज्यान" वृक्षाखालीं पक्षी दाणे वेंचीत होते ते तुकाराम जवळ आलासा पाहून एकदम उडून गेले. हें पाहून तुकारामास फार खेद झाला. त्यास वाटलें कीं, सर्व ब्रह्मरूप असून व सर्वत्र माझी अभेदबुद्धि झाली असून ज्या अर्थीं मला पाहून हे पक्षी भितात त्याअर्थीं खरें वैराग्य व अभेदबुद्धि अजून मला झालीच नाहीं. याप्रमाणें वाटून तो तेथेंच पांडुरंगाची स्तुति करून अगदीं प्रेतवत् निश्चेष्ट उभा राहिला. असाच कांहीं वेळ उभा राहिल्यानंतर बहुत पक्षी त्याच्या अंगावर येऊन बसले असें ह्मणतात. तो तेथें उभा असून त्याच्या अंगावर पक्षी वसले होते तोंच त्याचे अनुयायी तेथें येऊन त्यांनी ती स्थिति पाहिली व पुढें तिची चोहोंकडे प्रसिद्धि झाली. याबद्दल तुकाराम अभंगीं लिहितोः—

॥ १५०८ ॥

अवघीं भूतें साम्या आलीं । देखिलीं म्यां कैं होतीं ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ विश्वास तो खरा मग । पांडुरंगकृपेचा ॥ ध्रु ॥

माझी कोणी न धरो शंका । हो कां लोकां निर्द्वंद्व ॥ २ ॥

तुका ह्मणे जें जें भेटे । तें तें वाटे मी ऐसें ॥ ३ ॥

वर लिहिलेली अनुयायी मंडळी आळंदीस येऊन पोहोंचल्यावर तुकाराम ज्ञानदेवापुढें रात्रीं कीर्तन करून दुसरे दिवशीं द्वादशीचें पारणें करून देहूस परत आला. तुकारामाच्या अंगावर पक्षी निर्भयपणीं बसल्याची कीर्ति चिंचवडच्या देवांच्या कानीं गेल्यावरून आपण त्याचा कांहीं चमत्कार पाहवा ह्मणून त्यांनीं तुकारामाची भेट घेतली. परस्परांस भेटी पासून आनंद होऊन देवांनीं तुकारामास "तूं मानव नसून कोणी तरी अद्भुत पुरुष आहेस असें वाटतें" ह्मणून सांगितलें; तेव्हां तुकारामानें आपल्या मांडीचें कातडें कापून देवांस दाखविलें तो

आंतून रक्त वगैरे न निघतां पिंजलेल्या कापसाप्रमाणें कापूस दृष्टीस पडला व त्यानें आपल्या स्वरूपाचें ज्ञान देवांस व्हावें ह्मणून एक अभंग केला तोः—

॥ ९९३ ॥

अणुरणियां थोकडा । तुका आकाशाएवढा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ गिळुनि सांडिलें कळिवर । भव भ्रमाचा आकार ॥ ध्रु ॥
सांडिली त्रिपुटी । दीप उजळला घटीं ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां । उरलों उपकारापुरता ॥ ३ ॥

या गोष्टीवरून देवांस त्याचा खरा साक्षात्कार आला व त्यांनीं उठून तुकारामास साष्टांग नमस्कार घातला. नंतर त्यांनीं त्यास चिंचवडास नेऊन तीन दिवस राहून घेतलें व मोठा ब्राह्मणभोजनाचा समारंभ केला. प्रत्यही रात्रीं कथेचाही मोठाच थाट जमत असे. याप्रमाणें देवांनी त्याचा मोठा आदर केला व त्यास पंक्तीस घेऊन भोजन केलें असें महीपति ह्मणतो व अखेरीस तुकाराम त्यांचा निरोप घेऊन देहूस परत आला.

परचक्राने लोह गांवच्या लोकांस लुटून नेल्यामुळें ते दुःखी झाले व त्यामुळें तुकारामास वाईट वाटलें व तो निघून देहूस आला. लोहगावकरांचे प्रेम तुकारामाचे ठिकाणी फारच जडलें होतें, त्याच्या शब्दावर त्यांचा अतिशय भरंवसा होता व त्यांस तुकारामाच्या नेहमींच्या उपदेशापासून बरीच विरक्तिही उत्पन्न झाली होती. त्यांतच त्यांच्यावर हा परचक्राचा घाला पडल्यामुळें ते संसाराविषयी जास्ती उदासीन झाले. आणि कितीएक तर देहूस येऊन राहून तुकारामाचें कीर्तन नेहमी ऐकूं लागले. याच प्रमाणें देहूच्या आसपासच्या गावचे हजारों लोक कोणी नेहमी परंतु वहुतेक दर एकादशीस येऊन कथा कीर्तन मनापासून ऐकत असत व कायावाचामनांनीं तुकारामावर विश्वास ठेवीत असत. असा क्रम चालला असतां पुढें कांहीं दिवसांनीं तुकारामानें "काया ब्रह्म केली" त्याविषयीं त्याचे अभंगः—

॥ १५८६ ॥

शोधितां चि नये । ह्मणोनि वोळगतों पाये ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां दिसों नये जना । ऐसें करा नारायणा ॥ ध्रु ॥
परतोनि मन । गेलें ठायीं चि मुरोन ॥ २ ॥
विसरला तुका । बोलों चालों जाला मुका ॥ ३ ॥

॥ १५८७ ॥

रज्जुसर्पाकार । भासयेलें जगडंबर ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणोनि आठवती पाय । घेतों आलाय बलाय ॥ ध्रु ॥
दृश्य द्रुमाकार लाणी । केलों सर्वस्वासी धणी ॥ २ ॥
तुकीं तुकला तुका । विश्वीं भरोनि उरला लोकां ॥ ३ ॥

॥ १५८८ ॥

ह्मणवितों दास । परि मी असें उदास ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हा चि निश्चय माझा । परि मी निश्चयाहुनि दुजा ॥ ध्रु ॥
सरतें कर्तृत्व माझ्यानें । परि मी त्याहीहून भिन्न ॥ २ ॥
तुका तुकासी तुकला । तुका तुकाहुनि निराळा ॥ ३ ॥

॥ १५८९ ॥

घोंटवीन लाळ ब्रह्मज्ञान्या हातीं । मुक्तां आत्मस्थिती सांडवीन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ब्रह्मभूत होते काया च कीर्तनीं । भाग्य तरी ऋणी देवा ऐसा ॥ ध्रु ॥
तीर्थभ्रामकासी आणीन आळस । कडु स्वर्गवास करिन भोग ॥ २ ॥
सांडवीन तपोनिधा अभिमान । यज्ञ आणि दान लाजवीन ॥ ३ ॥
भक्तिभाग्यप्रेमा साधीन पुरुषार्थ । ब्रह्मींचा जो अर्थ निजठेवा ॥ ४ ॥
धन्य ह्मणवीन येह लोकीं लोकां । भाग्य आह्मीं तुका देखियेला ॥ ५ ॥

॥ १५९० ॥

संसाराचें अंगीं अवघीं च व्यसनें । आह्मी या कीर्तनें शुद्ध जालों ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां हें सोंवळें जालें त्रिभुवन । विषम धोऊन सांडियेलें ॥ ध्रु ॥
ब्रह्मपुरीं वास करणें अखंड । न देखिजे तोंड विटाळाचें ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मां एकांताचा वास । ब्रह्मीं ब्रह्मरस सेवूं सदा ॥ ३ ॥

॥ १५९१ ॥

तुह्मी सनकादिक संत । ह्मणवितां कृपावंत ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ एवढा करा उपकार । देवा सांगा नमस्कार ॥ ध्रु ॥
भाकूनि करुणा । विनवा वैकुंठींचा राणा ॥ २ ॥
तुका ह्मणे मज आठवा । मूळ लवकरि पाठवा ॥ ३ ॥

॥ १५९२ ॥

आपुल्या माहेरा जाईन मी आतां । निरोप या संतां हातीं आला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सुख दुःख माझें आइकिलें कानीं । कळवळा मनीं करुणेचा ॥ ध्रु ॥
करुनी सिद्ध मूळ साउलें भातुकें । येती दिसें एकें न्यावयासी ॥ २ ॥
त्या चि पंथे माझें लागलेंसे चित । वाट पाहें नित्य माहेराची ॥ ३ ॥
तुका ह्मणे आतां येतील न्यावया । अंगें आपुलिया मायबाप ॥ ४ ॥

॥ १५९३ ॥

चिन्हें उमटती अंगीं । शकुना जोगीं उत्तम ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आठवला बापमाय । येईल काय मूळ नेणों ॥ ध्रु ॥
उत्कंठित जालें मन । ते चि खुण तेथींचि ॥ २ ॥
तुका ह्मणे काम वारीं । आळस घरीं करमेना ॥ ३ ॥

॥ १५९४ ॥

आरोनियां पाहे वाट । कटकट सोसेना ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आलियांस पुसें मात । तेथें चित्त लागलें ॥ ध्रु ॥
दळीं कांडीं लोकांऐसें । परि मी नसें ते ठायीं ॥ २ ॥
तुका ह्मणे येथें पिसें । तेथें तैसें असेल ॥ ३ ॥

॥ १५९५ ॥

येथीलिया अनुभवें । कळों जीवें हें येतसे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ दोहीं ठायीं एक जीव । माझी कींव त्या अंगीं ॥ ध्रु ॥
भूक भुके चि खाउनि धाय । नाहीं हाय अन्नाची ॥ २ ॥
तुका ह्मणे सुख जालें । अंतर धालें त्या गुणें ॥ ३ ॥

॥ १५९६ ॥

पैल आले हरि । शंख चक्र शोभे करीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ गरुड येतो फडत्कारें । ना भीं ना भीं ह्मणे त्वरें ॥ ध्रु ॥
मुगुट कुंडलांच्या दीप्ति । तेथें लोपला गभस्ति ॥ २ ॥
मेघश्यामवर्ण हरि । मूर्ति डोळस साजिरी ॥ ३ ॥
चतुर्भुज वैजयंती । गळां माळ हे रुळती ॥ ४ ॥
पीतांबर झळके कैसा । उजळल्या दाही दिशा ॥ ५ ॥
तुका जालासे संतुष्ट । घरा आलें वैकुंठपीठ ॥ ६ ॥

॥ १५९७ ॥

शंखचक्रगदापद्म । पैल आला पुरुषोत्तम ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ना भीं ना भीं भक्तराया । वेगीं पावलों सखया ॥ ध्रु ॥
दुरूनि येतां दिसे दृष्टी । धाकें दोष पळती सृष्टी ॥ २ ॥
तुका देखोनि एकला । वैकुंठींहूनि हरि आला ॥ ३ ॥

॥ १५९८ ॥

पैल दिसतील भार । दिंडी पताका अपार ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आला पंढरीचा राणा । दिसतील त्याच्या खुणा ।
सुख वाटे मना । डोळे बाह्या स्फुरती ॥ ध्रु ॥

उठिले गजर नामाचे । दळभार वैष्णवांचे ॥ २ ॥
तुका करी रिता ठाव । त्यांसी बैसावया वाव ॥ ३ ॥

॥ १५९९ ॥

चला जाऊं रे सामोरे । पुढें भेटों विठ्ठल धुरे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुका आनंदला मनीं । कैसा जातो लोटांगणीं ।
फेडावया धणी । प्रेमसुखाची आजि ॥ ध्रु ॥
पुढें आले कृपावंत । मायबाप साधुसंत ॥ २ ॥
तुका आळंगिला बाहीं । ठेविला विठोबाचे पायीं ॥ ३ ॥

॥ १६०० ॥

पाहुणे घरासी । आजि आले हृषीकेशी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय करूं उपचार । कोंप मोडकी जर्जर ।
कण्या दरदर । पाण्यामाजी रांधिल्या ॥ ध्रु ॥
घरीं मोडकिया बाजा । वरि वाकळांच्या शेजा ॥ २ ॥
मुखशुद्धि तुळसी दळ । तुका ह्मणे मी दुर्बळ ॥ ३ ॥

॥ १६०१ ॥

संतीं केला अंगीकार । त्यासीं अभिमान थोर ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कांहीं ठेविलें चरणीं । घेती तें चि पुरवूनि ।
तुका पायवणी । घेऊनियां निराळा ॥ ध्रु ॥
नसतां कांहीं संचित । भेटी जाली अवचित ॥ २ ॥
देव मिळोनियां भक्त । तुका केलासे सनाथ ॥ ३ ॥

॥ १६०२ ॥

अवघियांच्या आलों मुळें । एका वेळे न्यावया ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ सिद्ध व्हावें सिद्ध व्हावें । आधीं ठावें करितों ॥ ध्रु. ॥
जोंवरी ते घटिका दुरी । आहे उरी तो काळ ॥ २ ॥
मंगळाचे वेळे उभे । असों शोभे सावध ॥ ३ ॥
अवघियांचा योग घडे । तरी जोडे श्लाघ्यता ॥ ४ ॥
तुका ह्मणे पाहें वाट । बहु आट करूनि ॥ ५ ॥

॥ १६०३ ॥

सकळ ही माझी बोळवण करा । परतोनि घरा जावें तुह्मीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कर्मधर्में तुह्मां असावें कल्याण । घ्या माझें वचन आशीर्वाद ॥ ध्रु. ॥
वाढवूनि दिलों एकाचिये हातीं । सकळं निश्चिंती जाली तेथें ॥ २ ॥
आतां मज जाणें प्राणेश्वरासवें । मी माझिया भावें अनुसरलों ॥ ३ ॥
वाढवितां लोभ होईल उसीर । अवघींच स्थिर करा ठायीं ॥ ४ ॥
धर्म अर्थ काम जाला एके ठायीं । मेळविला जिहीं हाता हात ॥ ५ ॥
तुका ह्मणे आतां जाली हे चि भेटी । उरल्या त्या गोष्टी बोलावया ॥ ६ ॥

॥ १६०४ ॥

बोलिलों तें आतां पाळावें वचन । ऐसें पुण्य कोण माझे गांठी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जातों आतां आज्ञा घेऊनियां स्वामी । काळक्षेप आह्मी करूं कोठें ॥ ध्रु. ॥
न घडे यावरि न धरवे धीर । पीडतां राष्ट्र देखोनि जग ॥ २ ॥
तुका ह्मणे तुह्मीं दिसे मोकलिलें । काय आतां आलें जीवित्वाचें ॥ ३ ॥

॥ १६०५ ॥

करावें तें काम । उगाच वाढवावा श्रम ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अवघें ऐकमय । राज्य बोलों चालों नये ॥ ध्रु. ॥
दुजयाची सत्ता । न चलेसी जाली आतां ॥ २ ॥

आतां नाहीं तुका । पुन्हा हारपला लोकां ॥ ३ ॥

॥ १६०६ ॥

आह्मी जातों तुह्मी कृपा असों द्यावी । सकळां सांगावी विनंती माझी ॥१॥
वाडवेळ जाला उभा पांडुरंग । वैकुंठा श्रीरंग बोलावितो ॥ २ ॥
अंतकाळीं विठो आह्मांसी पावला । कुडीसहित जाला गुप्त तुका ॥३॥

॥ १६०७ ॥

तुका उतरला तुकीं । नवल जालें तिहीं लोकीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नित्य करितों कीर्तन । हें चि माझें अनुष्ठान ॥ ध्रु ॥
तुका बैसला विमानीं । संत पाहाती लोचनीं ॥ २ ॥
देव भावाचा भुकेला । तुका वैकुंठासी नेला ॥ ३ ॥

॥ १६०८ ॥

न देखिजे ऐसें केलें । या विठ्ठलें दुःखासी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कृपेचिये सिंहासनीं । अधिष्ठानीं बैसविलें ॥ ध्रु ॥
वाजता तो नलगे वारा । क्षीरसागरा शयनीं ॥ २ ॥
तुका ह्मणे अवघे ठायीं । मज पायीं राखिलें ॥ ३ ॥

॥ १६०९ ॥

वाराणसीपर्यंत असों सुखरूप । सांगावा निरोप संतांसी हा ॥ १ ॥
येथूनियां आह्मां जाणें निजधामा । सवें असे आह्मां गरुड हा ॥ २ ॥
कृपा असों द्यावी मज दीनावरी । जातसों माहेरीं तुका ह्मणे ॥ ३ ॥

तुकाराम भगवद्भजनांत अगदीं रंगून गेला असतां त्या वेळेस त्याच्या मनाची स्थिति कशी होत असे ती त्यानेंच एका अभंगांत वर्णिली आहे ती अशीः—

॥ २६०७ ॥

डोळां भरिलें रूप । चित्ता पायांपें संकल्प ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ अवघी घातली वांटणी । प्रेम राहिलें कीर्तनीं ॥ ध्रु ॥

वाचा केली माप । राशीं हरिनाम अमुप ॥ २ ॥

भरूनियां भाग । तुका बैसला पांडुरंग ॥ ३ ॥

या रीतीनें उत्तमप्रकारें कालक्षेप करीत असतां शाके १५७१ विरोधीनाम संवत्सराच्या फाल्गुनाचा पहिला पंधरवडा गेला आणि फाल्गुन वद्य द्वितीया सोमवारीं सकाळीं त्यानें आपल्या अनुयायिजनांस पुढील अभंगांत लिहिल्याप्रमाणें अखेरीचा उपदेश केलाः—

॥ २४६०. ॥

ऐका ऐका भाविकजन । कोण कोण व्हाल ते ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ तार्किकांचा टाका संग । पांडुरंग स्मरा हो ॥ ध्रु ॥

नका शोधूं मतांतरें । नुमगे खरें बुडाल ॥ २ ॥

कलिमध्यें दास तुका । जातो लोकां सांगत ॥ ३ ॥

याप्रमाणें उपदेश करून तुकारामानें आपल्या बायकोस निरोप पाठविला कीं, "आम्ही वैकुंठपुरास जातों, तर तुम्हीही बरोबर चलावें". तिनें उत्तर पाठविलें कीं, "मी पांचा महिन्यांची गरोदर आहें, मुलें लेंकरें लहान आहेत, घरीं गुरूंढोर आहे व प्रपंच सारा पसरला आहे तेव्हां येणें घडत नाहीं". तिच्या मनांत नेहमीच वैकुंठपुरास जातों असें ह्मणण्याचा त्याचा परिपाठ असून कोठें तरी आसपास महिना पंधरा दिवस जात असे तसाच कोठें तो जात असेल; परंतु या वेळेस तसें झालें नाहीं.

अशाप्रकारें अभंग करीतच देवास नमस्कार करून नामस्मरण करीतच तो देउळाबाहेर पडला. सर्व श्रोत्यांस अतिशय वाईट वाटलें. पुढें तुकाराम कोणीकडे जाणार वगैरे कोणासच कांहीं कळलें नाहीं; परंतु सामान्यतः कोठें तरी तीर्थाटणास व त्यांतही प्रायः हिमालयाकडे जाणार असा सर्वांचा ग्रह होता. देवळांतून निघाल्यावर चवदा शिष्यांसहवर्तमान इंद्रायणीच्या तीरीं येऊन तेथें कीर्तनास प्रारंभ केला. येथें विहारिणीचे (विराण्या) २५ अभंग केले तेः—

॥ ७ ॥

बाळी जन मज ह्मणोत शिंदळी । परि हा वनमाळी न विसंबें ॥ १ ॥
सांडूनि लौकिक जालियें उदास । नाहीं भय आस जीवित्वाची ॥ २ ॥
नाइकें वचन बोलतां या लोकां । ह्मणे जाली तुका हरिरता ॥ ३ ॥

॥ ८ ॥

आधिल्या भ्रतारें काम नव्हे पुरा । ह्मणोनि व्यभिचारा टेकलियें ॥ १ ॥
रात्रंदिस मज पाहिजे जवळी । क्षण त्यानिराळी न गमे घडी ॥ २ ॥
नाम गोष्टी माझी सोय सांडा आतां । रातलें अनंता तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ ९ ॥

हाचि नेम आतां न फिरें माघारी । बैसलें सेजारीं गोविंदाचे ॥ १ ॥
घररिघी जालें पट्टराणी बळें । वरिलें सांवळें परब्रह्म ॥ २ ॥
बळियाचा अंगसंग जाला आतां । नाहीं भय चिंता तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ १० ॥

नाहीं काम माझें काज तुह्मांसवें । होतें गुप्त ठावें केलें आतां ॥ १ ॥
व्यभिचार माझा पडिला ठाउका । न सरे ती लोकांमाजी जालें ॥ २ ॥
न धरावा लोभ कांहीं मजविशीं । जालें देवपिशी तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ ११ ॥

विसरलें कुळ आपुला आचार । पती भावे दीर घर सोय ॥ १ ॥
सांडिला लौकिक लाज भय चिंता । रातलें अनंता चित्त माझें ॥ २ ॥
मज आतां कोणी आळवाल झणी । तुका ह्मणे कानीं बहिरी जालें ॥ ३ ॥

॥ १२ ॥

न देखें न बोलें नाइकें आणीक । बैसला हा एक हरि चित्तीं ॥ १ ॥

सासुरें माहेर मज नाहीं कोणी । एक केलें दोन्ही मिळोनियां ॥ २ ॥
आळ आला होता आह्मी भांडखोरी । तुका ह्मणे खरी केली मात ॥ ३ ॥

॥ १३ ॥

दुजा ऐसा कोण बळी आहे आतां । हरि या अनंता पासूनिया ॥ १ ॥
बळियाच्या आह्मी जालों बळिवंता । करूं सर्व सत्ता सर्वांवरी ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मी जिवाच्या उदारा । जालों प्रीतिकरा गोविंदासी ॥ ३ ॥

॥ १४ ॥

क्षणभरी आह्मीं सोसिलें वाईट । साधिलें अवीट निजसुख ॥ १ ॥
सांडी मांडी मार्ग केल्या भरोवरी । अधिक चि परी दुःखाचिया ॥ २ ॥
तुका ह्मणे येणें जाणें नाहीं आतां । राहिलों अनंताचिये पायीं ॥ ३ ॥

॥ १५ ॥

आह्मां आह्मी आतां वडील धाकुटीं । नाहीं पाठी पोटीं कोणी दुजें ॥ १ ॥
फावला एकांत एकविध भाव । हरि आह्मांसवें सर्व भोगी ॥ २ ॥
तुका ह्मणे अंगसंग एके ठायीं । असो जेथें नाहीं दुजें कोणी ॥ ३ ॥

॥ १६ ॥

सर्व सुख आह्मी भोगूं सर्व काळ । तोडियेलें जाळ मोहपाश ॥ १ ॥
याचसाठीं सांडियेले भरतार । रातलों या परपुरुषाशीं ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां गर्भ नये धरूं । औषध जें करूं फळ नव्हे ॥ ३ ॥

॥ १७ ॥

एका जीवें आतां जिणें जालें दोहीं । वेगळिक कांहीं नव्हे आतां ॥ १ ॥
नारायणा आह्मां नाहीं वेगळिक । पुरविली हे भाक सांभाळिली ॥ २ ॥
तुका ह्मणे जालें सायासाचें फळ । सरली ते वेळ काळ दोन्ही ॥ ३ ॥

॥ १८ ॥

हासों रुसों आतां वाढवूं आवडी । अंतरींची गोडी अवीट ते ॥ १ ॥
सेवा सुखें करूं विनोदवचन । आह्मी नारायण एकाएकीं ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मी जालों उदासीन । आपुल्या आधीन केला पति ॥ ३ ॥

॥ १९ ॥

मजसवें आतां येऊं नका कोणी । सासुरवासिनी बाइयानो ॥ १ ॥
न साहवे तुह्मां या जनाची कूट । बोलती वाईट ओखटें तें ॥ २ ॥
तुका ह्मणे जालों उदास मोकळ्या । विचरों गोवळ्यासवें आह्मी ॥ ३ ॥

॥ २० ॥

शिकविलें तुह्मी तें राहे तोंवरी । मज आणि हरी वियोग तों ॥ १ ॥
प्रसंगीं या नाहीं देहाची भावना । तेथें या वचना कोण मानी ॥ २ ॥
तुका ह्मणे चित्तीं बैसला अनंत । दिसों नेदी नित्य अनित्य तें ॥ ३ ॥

॥ २१ ॥

सांगतों तें तुह्मीं आइकावें कानीं । आमुचे नाचणीं नाचूं नका ॥ १ ॥
जोंवरी या तुह्मां मागिलांची आस । तोंवरी उदास होऊं नका ॥ २ ॥
तुका ह्मणे काय वांयांविण विंद । पति ना गोविंद दोन्ही नाहीं ॥ ३ ॥

॥ २२ ॥

आजिवरी तुह्मां आह्मां नेणपण । कौतुकें खेळणें संग होता ॥ १ ॥
आतां अनावर जालें अगुणाची । करूं नये तें चि करीं सुखें ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां बुडविलीं दोन्ही । कुळें एक मनीं नारायण ॥ ३ ॥

॥ २३ ॥

सासुरियां वीट आला भरतारा । इकडे माहेरा स्वभावें चि ॥ १ ॥

सांडवर कोणीं न धरिती हातीं । प्रारब्धाची गति भोगूं आतां ॥ २ ॥
न व्हावी ते जाली आमची भंडाई । तुका ह्मणे काई लाजों आतां ॥३॥

॥ २४ ॥

मरणाही आधीं राहिलों मरोनी । मग केलें मनीं होतें तैसें ॥ १॥
आतां तुह्मी पाहा आमुचें नवल । नका वेचूं बोल वांयांविण ॥ २ ॥
तुका ह्मणे तुह्मी भयाभीत नारी । कैसी संग सरी तुह्मां आह्मां ॥ ३ ॥

॥ २५ ॥

परपुरुषाचें सुख भोगे तरी । उतरोनि करीं घ्यावें सीस ॥ १ ॥
संवसारा आगी आपुलेनि हातें । लावूनि मागुतें पाहूं नये ॥ २ ॥
तुका ह्मणे व्हावें तयापरी धीट । पतंग हा नीट दीपासोई ॥ ३ ॥

॥ २६ ॥

आइकाल परी ऐसें नव्हे बाई । न संडा या सोई भ्रताराची ॥ १ ॥
नव्हे आराणुक लौकिकापासून । आपुल्या आपण गोविलें तें ॥ २ ॥
तुका ह्मणे मन कराल कठीण । त्या या निवडोन मजपाशीं ॥ ३ ॥

॥ २७ ॥

आहांच वाहांच आंत वरी दोन्ही । न लगा गडणी आह्मां तैशा ॥१॥
भेऊं नये तेथें भेडसावूं कोणा । आवरूनि मना बंद द्यावा ॥ २ ॥
तुका ह्मणे कांहीं अभ्यासावांचुनी । नव्हे हे करणी भलतीची ॥ ३ ॥

॥ २८ ॥

बहुतांच्या आह्मी न मिळों मतासी । कोणी कैसी कैसी भावनेच्या ॥१॥
विचार करितां वांयां जाय काळ । लटिकें तें मूळ फजितीचें ॥ २ ॥
तुका ह्मणे तुह्मी करा घटापटा । नका जाऊं वांटा आमुचिया ॥ ३ ॥

॥ २९ ॥

त्याचें सुख नाहीं आलें अनुभवा। कठिण हें जिवा तोंवरी ॥ १ ॥
मागिलांचें दुःख लागों नेदी अंगा। अंतर हें संगा नेदी पुढें ॥ २ ॥
तुका ह्मणे सर्वविशीं हा संपन्न। जाणती महिमान श्रुति ऐसें ॥ ३ ॥

॥ ३० ॥

न राहे रसना बोलतां आवडी। पायीं दिली बुडी माझ्या मनें ॥ १ ॥
मानेल त्या तुह्मी आइका स्वभावें। मी तों माझ्याभावें अनुसरलें ॥ २ ॥
तुका ह्मणे तुह्मी फिरावें बहुतीं। माझी तों हे गती जाली आतां ॥३॥

॥ ३१ ॥

न बोलतां तुह्मां कळों न ये गुज। ह्मणउनी लाज सांडियेली ॥ १ ॥
आतां तुह्मां पुढें जोडितसें हात। नका कोणी अंत पाहों माझा ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मी बैसलों शेजारीं। करील तें हरी पाहों आतां ॥ ३ ॥

हे अभंग सरतात तों असा चमत्कार झाला कीं, पुष्पक नांवाच्या विमानांत बसून ब्रह्मा, विष्णु, महेश्वर प्रभृति सर्व देव, यक्ष, गंधर्व, किन्नर, अप्सरा वगैरे तेथें आल्या. तुकारामाचें शरीर दिव्य व तेजःपुंज ह्मणजे केवळ "ब्रह्मरूप" झालें. तुकारामाच्या अनुयायिजनांमध्यें व विमानांतल्या सुरलोकांमध्यें भगवन्नामस्मरणाचा व जयजयकाराचा एकसारखा मोठा घोष चालला होता. त्या देदीप्यमान विमान वगैरेच्या अद्भुत तेजानें तुकारामाच्या अनुयायिजनांचे नेत्र दिपून झांकून गेले. इतक्यांत देवांनीं तुकारामास सदेह विमानांत बसविलें, आणि विमान चालू झालें. विष्णूनें तुकारामास आपलें क्षीराब्धींतील निवासस्थान व तेथील सर्व ऐश्वर्य दाखवून मग वैकुंठास जाऊं असें सांगितलें. हें ऐकून सर्व देवांनीं जयजयकार केला. विमानाच्या घंटांच्या नादानें सर्व आकाश भरून गेलें होतें. कांहीं वेळानें पुष्पकाचा प्रकाश गेल्यावर लोकांनीं नेत्र उघडून पाहिलें तों तुकाराम कोठेंच दिसत नाहीं असें पाहून सर्वजन शोकनिमग्न होऊन त्यांनीं व तें वर्तमान कळल्यावर तुकारामाची पत्नी जिजाबाई इनेंही नाना प्रकारें बहुतच विलाप केला तो ग्रंथीं लिहितां पुरवत नाहीं, असें महीपति ह्मणतो. याप्रमाणें तुकाराम गुप्त होण्याची हकीकत शके

१५७१ विरोधिनाम संवत्सरीं फाल्गुन वद्य द्वितीयेस सकाळीं चार घटिका दिवसास घडून आली. तुकारामास महादेव व विठोबा या नांवानें दोन मुलगे होते, तेही अतिशय शोक करूं लागले. तुकाराम कदाचित् परत येईल ह्मणून लोक इंद्रायणीच्या तीरीं संध्याकाळपावेतों बसले, नंतर उठून आपआपल्या घरीं चालते झाले. तुकारामाच्या दर्शनार्थ पुष्काळ दुरून यात्रा आली होती, तीही परतून जिकडच्या तिकडे माघारी गेली व देशांत चोहोंकडे पसरली. तेणेंकरून तुकारामाची वर लिहिलेली शेवटील हकीकत सर्व देशांत तावडतोब पसरली. त्याचवेळेस तुकाराम सदेह वैकुंटास गेला हें कितीएकांनीं खरें व कितीएकांनीं खोटें मानिलें. देहू मुक्कामीं विठोबाचा एक अत्यंत प्रेमळ, निःसीम, व लोकोपदेशक असा बाणेदार भक्त होऊन तो वर लिहिल्याप्रमाणें गुप्त झाला. तुकारामाच्या वंशांत जें डोहांतून निघालेलें पुस्तक आहे व ज्याची त्या कुळांत पूजा करीत असतात त्यांत "तुकोबांनीं तीर्थास प्रयाण केलें" असें साफ लिहिलें आहे. सदेह वैकुंठास गेल्याचें लिहिलें नाहीं. तुकाराम गेल्यानंतर त्याचे निःसीम चवदा भक्त निश्चयानें तेथें बसून राहिले. त्यांत रामेश्वरभट्ट, तुकारामाचा सख्खा बंधु कान्हया, गंगाजीमवाळकडुसकर, कोंडोबा विप्र लोहकऱ्या, संताजी तेली जगनाड्या, व दुसरे ९ असामी इतके होते. हे एकवेळ आपणास तुकारामाचें दर्शन होईल तरच आपण प्राण राखूं, अशा निश्चयानें बसले. कान्हयानें त्या वेळेस शोकपर असे बहुत अभंग केले.

तुकारामाच्या नेहमींच्या वर्तनक्रमांत मित आहार, सर्वदा नामस्मरण, संसाराविषयीं व इतर ऐहिक गोष्टींविषयीं औदासीन्य, परोपकाराविषयीं तत्परता, द्रव्य, मान इत्यादिकांविषयीं निःस्पृहता, निरभिमानपणा, निश्चय, एकांतवासाची आवड, कथेची व भजनाची अतिशय प्रीति, उपदेश करण्याविषयीं सिद्धता, मुख्यत्वें सगुणरूपावर दृढतमभाव, स्पष्टवक्तृत्व या गोष्टी ढळटळीत दिसून येतात. त्याचे परमभक्त असे एकंदर चौदा असामी होते ते कथेंत नेहमीं त्याच्या मागें उभे राहून ध्रुवपद धरीत असत.

तुकाराम गुप्त होण्याच्या अगोदर त्यानें कांहीं दिवस असें आरंभिलें होतें कीं, या चौदाही असामींतून कोणास न पुसतां एकाएकीं उठून कोठें तरी चालतें व्हावें आणि कोणी विचारल्यास "आह्मी वैकुंठपुरास जातों" असें सांगावें. आणि कोणी कांहीं विचारलें तरी त्यानें अभंगरूप कवितेवांचून उत्तर देऊं नये.

या प्रसंगीं त्या चौदा भक्तांचीं मनें अगदीं उद्विग्न होऊन ते सारखे तीन दिवस तेथें बसले होते.

---

१ "सकें १५७१ वीरोधीनां संवछरेः सीमगा वद्य द्वीतीयाः वार सोमवारः ते दीवसींः प्राःथ काळींः तुकोबानीः तीर्थास प्रयाणं केलें शुभ भवतुः मंगळं" ॥ ॥ ॥ ॥ ॥

तीं चवथ्या दिवशीं म्हणजे पंचमीच्या दिवशीं सकाळीं तुकारामाच्या हातचा नेहमींचा टाळ व त्याच्या अंगावरील गोदडी हीं दोन्हींवरून खालीं पडलीं. याखेरीज तुकारामाकडून कांहीं अभंगही लिहून आले ते वाचून सर्व भक्तलोक आनंद पावले. गोदडी व टाळ पाहण्याकरितां दूरदूरचे लोक बहुत आले होते ते तीं पाहून फार समाधान पावले आणि "हेंच तुकारामबावांचें दर्शन" असें ह्मणाले व त्यांस अद्भुत चमत्कार वाटला. कान्हयानें रामेश्वरभट्ट यास विचारिलें कीं, "तुकारामबावांची पुण्यतिथि कोणती धरावी?" रामेश्वरभट्ट ह्मणाला कीं, तुकाराम हा क्रियाकर्मविरहित होता आणि त्याच्या देहाचें येथें पतन नव्हतां तो "तुका श्रीविष्णुलोकाप्रत गेला." तो जरी वैकुंठवासास फाल्गुन वद्य द्वितीयेस गेला तरी टाळ, गोदडी व निरोप हीं फाल्गुन वद्य पंचमीस परत आलीं; यास्तव ती पंचमीच पुण्यतिथि मानून त्या दिवशीं साधुसंत जमवून हरिकीर्तन करावें व ब्राह्मणसंतर्पण करावें. त्याचा देहपातच झाला नाहीं त्यापक्षीं त्याचें क्रियाकर्मांतर वगैरे कांहीं एक करण्यास अधिकार नाहीं. ही रामेश्वर भट्टाची योजना ऐकून सर्व संतमंडळीनें मोठा जयजयकार केला. त्यानंतर त्या पंचमीपासूनच मोठा उत्साह व ब्राह्मणभोजन चालू केलें. पंचमी व षष्ठी या दोन दिवशीं कीर्तनें झालीं आणि सप्तमीस ललित झालें. जिकडे तिकडे आनंद झाला. तुकारामाच्या पुण्यतिथीचा त्या वेळेस जो क्रम जसा चालू झाला तो क्रम तसा आजपर्यंत देहूस चालू आहे.

तुकारामास महादेव व विठोबा हे दोघे पुत्र होते हें पूर्वीं लिहिलेंच आहे. आणि त्याशिवाय तुकारामाची पत्नी जिजाबाई गर्भिणी होती ती पूर्णकाळ गेल्या नंतर प्रसूत होऊन पुत्र झाला त्याचें नांव नारायण असें ठेविलें. हा पुत्र दिसेंमासें मोठा झाला. पुढें राजा शिवाजी त्याच्या दर्शनार्थ येऊन त्यानें त्यास चार गांव इनाम दिले व विठोबाच्या देवळास शिखर बांधिलें. नारायणबावा हाही वयांत आल्यावर मोठा भगवद्भक्त निघाला. त्यास वैराग्य उपजलें त्याकाळीं त्यानें सर्वस्व दान करून बहुत दूरदूरच्या यात्रा केल्या. भागीरथीच्या अकरा कावडी रामेश्वरास नेऊन घातल्या. त्याच्या पाठांत तुकारामाचे बहुत अभंग असून तो कीर्तन करणारा फार चांगला होता.

तुकाराम गुप्त झाल्यानंतरही त्याच्या कितीएक परम भक्तांस त्याचें साक्षात् किंवा स्वप्नांत दर्शन झालें असें महीपति ह्मणतो. त्यांत त्याची येलवाडी येथील कन्या, एक संन्यासी, बहिणाबाई नांवाची एक ब्राह्मणी, सुदुंबऱ्यास राहणारा एक लिंगायत वाणी, निळोबा गोसावी पिंपळनेरकर यांस अशीं दर्शनें झाल्याचें महीपतीनें लिहिलें आहे.

॥ तुकारामाचे अभंग ॥

॥ श्रीविठ्ठलाय नमः ॥

[illegible] निवृत्तिनाथाय नमः ॥ श्रीज्ञानेश्वराय नमः ॥

[illegible] श्रीराघवचैतन्यश्रीकेशवचैतन्य--॥

[illegible] बाबाचैतन्यसद्गुरुभ्यो नमः ॥

[illegible] रण--अभंग ६.

॥ १ ॥

समचरणदृष्टि विटेवरी साजिरी । तेथें माझी हरी वृत्ति राहो ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आणीक न लगे मायिक पदार्थ । तेथें माझें आर्त नको देवा ॥ध्रु॥
ब्रह्मादिक पदें दुःखाची शिराणी । तेथें दुश्चित झणी जडों देसी ॥ २ ॥
तुका ह्मणे त्याचें कळलें आम्हां वर्म । जे जे कर्मधर्म नाशवंत ॥ ३ ॥

॥ २ ॥

सुंदर तें ध्यान उभें[2] विटेवरी । कर कटावरी ठेवूनियां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुळसीहार[3] गळां कासे पीतांबर । आवडे निरंतर[4] तें चि रूप ॥ध्रु॥
मकरकुंडलें तळपती श्रवणीं । कंठीं कौस्तुभमणि विराजित ॥ २ ॥
तुका ह्मणे माझें हें चि सर्व सुख । पाहीन श्रीमुख आवडीनें ॥ ३ ॥

---

१ पं. तेथें चित्त झणी–२ उभा विटेवरी असें बहुतांच्या ह्मणण्यांत आहे, परंतु तसें कोणत्याही पुस्तकांत आढळत नाहीं.–३ दे. त. तुळसीचे हार.–गळां तुळसीहार हाही पाठ ऐकण्यांत आहे.–४ पं. आवडे निरंतर हेंचि ध्यान.

॥ ३ ॥

सदा माझे डोळे जडो तुझे मूर्ती । रखुमाईच्या पती सोयरिया ॥ १ ॥
॥धु.॥ गोड तुझें रूप गोड तुझें नाम । देईं मज प्रेम सर्व काळ ॥ ध्रु ॥
विठो माउलिये हा चि वर देईं । संचरोनि राहीं त्हदयामाजी ॥ २ ॥
तुका ह्मणे कांहीं न मागें आणीक । तुझे पायीं सुख सर्व आहे ॥ ३ ॥

॥ ४ ॥

राजस सुकुमार मदनाचा पुतळा । रविशशिकळा लोपलिया ॥ १ ॥
॥धु.॥ कस्तुरीमळवट चंदनाची उटी । रुळे माळ कंठीं वैजयंती ॥ ध्रु ॥
मुगुट कुंडलें श्रीमुख शोभलें । सुखाचें ओतलें सकळ ही ॥ २ ॥
कासे सोनसळा पांघरे पाटोळा । घननीळ सांवळा बाइयानो ॥ ३ ॥
सकळ ही तुह्मी व्हा गे एकीसवा । तुका ह्मणे जीवा धीर नाहीं ॥ ४ ॥

॥ ५ ॥

कर कटावरी तुळसीच्या माळा । ऐसें रूप डोळां दावीं हरी ॥ १ ॥
॥धु.॥ ठेविले चरण दोन्ही विटेवरी । ऐसें रूप हरी दावीं डोळां ॥ ध्रु ॥
कटीं पीतांबर कास मिरवली । दाखवीं वहिली ऐसी मूर्ती ॥ २ ॥
गरुडपारावरी उभा राहिलासी । आठवे मानसीं तें चि रूप ॥ ३ ॥
झुरोनि पांजरा होऊं पाहें आतां । येईं पंढरिनाथा भेटावया ॥ ४ ॥
तुका ह्मणे माझी पुरवावी आस । विनंती उदास करूं नये ॥ ५ ॥

॥ ६ ॥

गरुडाचें वारिकें कासे पीतांबर । सांवळें मनोहर कैं देखेन ॥ १ ॥
॥धु.॥ बरवया बरवंटा घनमेघ सांवळा । वैजयंतीमाळा गळां शोभे ॥ध्रु॥

---

१ पं. येऊनियां.

मुगुट माथां कोटि सूर्यांचा झळाळ। कौस्तुभ निर्मळ शोभे कंठीं ॥ २ ॥
ओतींव श्रीमुख सुखाचें सकळ। वामांगीं वेल्हाळ रखुमादेवी ॥ ३ ॥
उद्धव अक्रूर उभे दोहींकडे। वर्णिती पवाडे सनकादिक ॥ ४ ॥
तुका ह्मणे नव्हे आणिकांसारिखा। तो चि माझा सखा पांडुरंग ॥ ५ ॥
॥ ६ ॥

विराण्या—अभंग २५.

॥ ७ ॥

वाळो जन मज ह्मणोत शिंदळी। परि हा वनमाळी न विसंबें ॥ १ ॥
सांडूनि लौकिक जालियें उदास। नाहीं भय आस जीवित्वाची ॥ २ ॥
ऐसें वचन बोलतां या लोकां। ह्मणे जालों तुका हरिरता ॥ ३ ॥

॥ ८ ॥

आधिल्या भ्रतारें काम नव्हे पुरा। ह्मणोनि व्यभिचारा टेकलियें ॥ १ ॥
रात्रंदिस मज पाहिजे जवळी। क्षण त्यांनिराळी न गमे घडी ॥ २ ॥
नाम गोष्टी माझी सोय सांडा आतां। रातलें अनंता तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ ९ ॥

हाचि नेम आतां न फिरें माघारी। बैसलें शेजारीं गोविंदाचे ॥ १ ॥
घररिघी जालें पट्टराणी बळें। वरिलें सांवळें परब्रह्म ॥ २ ॥
बळियाचा अंगसंग जाला आतां। नाहीं भय चिंता तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ १० ॥

नाहीं काम माझें काज तुह्मांसवें। होतें गुप्त ठावें केलें आतां ॥ १ ॥
व्यभिचार माझा पडिला ठाउका। न सरे ती लोकांमाजी जालें ॥ २ ॥
न धरावा लोभ कांहीं मजविशीं। जालें देवपिशी तुका ह्मणे ॥ ३ ॥

---

१ पं. क्षण एक निराळी.

॥ ११ ॥

विसरलें कुळ आपुला आचार । पती भावे दीर घर सोय ॥ १ ॥

सांडिला लौकिक लाज भय चिंता । रातलें अनंता चित्त माझें ॥२॥

मज आतां कोणी आळवाल झणी । तुका ह्मणे कानीं बहिरी जालें ॥३॥

॥ १२ ॥

न देखें न बोलें नाइकें आणीक । बैसला हा एक हरि चित्तीं ॥ १ ॥

सासुरें माहेर मज नाहीं कोणी । एक केलें दोन्ही मिळोनियां ॥ २॥

आळ आला होता आह्मी भांडखोरी । तुका ह्मणे खरी केली मात ॥३॥

॥ १३ ॥

दुजा ऐसा कोण बळी आहे आतां । हरि या अनंता पासूनिया ॥१॥

बळियाच्या आह्मी जालों बळिवंता । करूं सर्व सत्ता सर्वांवरी ॥ २ ॥

तुका ह्मणे आह्मी जिवाच्या उदारा । जालों प्रीतिकरा गोविंदासी ॥३॥

॥ १४ ॥

क्षणभरी आह्मीं सोसिलें वाईट । साधिलें अवीट निजसुख ॥ १ ॥

सांडी मांडी मागें केल्या भरोवरी । अधिक चि परी दुःखाचिया ॥२॥

तुका ह्मणे येणें जाणें नाहीं आतां । राहिलों अनंताचिये पायीं ॥ ३ ॥

॥ १५ ॥

आह्मां आह्मी आतां वडील धाकुटीं । नाहीं पाठीं पोटीं कोणी दुजें ॥१॥

फावला एकांत एकविध भाव । हरि आह्मांसवें सर्व भोगी ॥ २ ॥

तुका ह्मणे अंगसंग एके ठायीं । असों जेथें नाहीं दुजें कोणी ॥ ३ ॥

॥ १६ ॥

सर्व सुख आह्मी भोगूं सर्व काळ । तोडियेलें जाळ मोहपाश ॥ १ ॥

याचसाठीं सांडियेले भरतार । रातलों या परपुषारूशीं ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां गर्भ नये धरूं । औषत्र जें करूं फळ नव्हे ॥ ३ ॥

॥ १७ ॥

एका जिवें आतां जिणें जालें दोहीं । वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥ १ ॥
नारायणा आह्मां नाहीं वेगळीक । पुरविली हे भाक सांभाळिली ॥ २ ॥
तुका ह्मणे जालें सायासाचें फळ । सरली ते वेळ काळ दोन्ही ॥ ३ ॥

॥ १८ ॥

हासों रुसों आतां वाढवूं आवडी । अंतरींची गोडी अवीट ते ॥ १ ॥
सेवासुखें करूं विनोदवचन । आह्मी नारायण एकाएकीं ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मी जालों उदासीन । आपुल्या आधीन केला पति ॥ ३ ॥

॥ १९ ॥

मजसवें आतां येऊं नका कोणी । सासुरवासिनी बाइयानो ॥ १ ॥
न साहवें तुह्मां या जनाची कूट । बोलती वाईट ओखटें तें ॥ २ ॥
तुका ह्मणे जालों उदास मोकळ्या । विचरों गोवळ्यासवें आह्मी ॥ ३ ॥

॥ २० ॥

शिकविलें तुह्मीं. तें राहे तोंवरी । मज आणि हरी वियोग तों ॥ १ ॥
प्रसंगीं या नाहीं देहाची भावना । तेथें या वचना कोण मानी ॥ २ ॥
तुका ह्मणे चित्तीं बैसला अनंत । दिसों नेदी नित्य अनित्य तें ॥ ३ ॥

॥ २१ ॥

सांगतों तें तुह्मीं अइकावें कानीं । आमुचे नाचणीं नाचूं नका ॥ १ ॥

---

१ त. आपुलें.—२ पं. माजी.

जोंवरी या तुह्मां मागिलांची आस । तोंवरी उदास होऊं नका ॥ २
तुका ह्मणे काय वांयांविण धिंद । पति ना गोविंद दोन्ही नाहीं ॥ ३

॥ २२ ॥

आजिवरी तुह्मां आह्मां नेणपण । कौतुकें खेळणें संग होता ॥ १ ॥
आतां अनावर जालें अगुणाची । करूं नये तें चि करीं सुखें ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां बुडविलीं दोन्ही । कुळें एक मनीं नारायण ॥ ३ ॥

॥ २३ ॥

सासुरियां वीट आला भरतारा । इकडे माहेरा स्वभावें चि ॥ १ ॥
सांडवर कोणी न धरिती हातीं । प्रारब्धाची गति भोगूं आतां ॥ २ ॥
न व्हावी ते जाली आमुची भंडाई । तुका ह्मणे काई लाजों आतां ॥ ३

॥ २४ ॥

मरणाही आधीं राहिलों मरोनी । मग केलें मनीं होतें तैसें ॥ १ ॥
आतां तुह्मी पाहा आमुचें नवल । नका वेचूं बोल वांयांविण ॥ २ ॥
तुका ह्मणे तुह्मी भयाभीत नारी । कैसी संग सरी तुह्मां आह्मां ॥ ३ ॥

॥ २५ ॥

परपुरुषाचें सुख भोगे तरी । उतरोनि करीं घ्यावें सीस ॥ १ ॥
संवसारा आगी आपुलेनि हातें । लावूनि मागुतें पाहूं नये ॥ २ ॥
तुका ह्मणे व्हावें तयापरी धीट । पतंग हा नीट दीपा[1]सोई ॥ ३ ॥

॥ २६ ॥

अइकाल परी ऐसें नव्हे बाई । न संडा या सोई भ्रताराची ॥ १ ॥
नव्हे आराणुक लौकिकापासून । आपुल्या आपण गोविलें तें ॥ २

---

१ प. दीपावरी.

तुका ह्मणे मन कराल कठीण । त्या या निवडोन मजपाशीं ॥ ३ ॥

॥ २७ ॥

आह्मांच वाह्मांच आंत वरी दोन्ही । न लगा गडणी आह्मां तैशा ॥ १ ॥

भेऊं नये तेथें भेडसावूं कोणा । आवरूनि मना बंद द्यावा ॥ २ ॥

तुका ह्मणे कांहीं अभ्यासावांचुनी । नव्हे हे करणी भलतीची ॥ ३ ॥

॥ २८ ॥

बहुतांच्या आह्मी न मिळों मतासी । कोणी कैसी कैसी भावनेच्या ॥ १ ॥

विचार करितां वांयां जाय काळ । लटिकें तें मूळ फजितीचें ॥ २ ॥

तुका ह्मणे तुह्मी करा घटापटा । नका जाऊं वाटा आमुचिया ॥ ३ ॥

॥ २९ ॥

त्याचें सुख नाहीं आलें अनुभवा । कठिण हें जिवा तोंचिवरी ॥ १ ॥

मागिलांचें दुःख लागों नेदी अंगा । अंतर हें संगा नेदी पुढें ॥ २ ॥

तुका ह्मणे सर्वविशीं हा संपन्न । जाणती महिमान श्रुति ऐसें ॥ ३ ॥

॥ ३० ॥

न राहे रसना बोलतां आवडी । पायीं दिली बुडी माझ्या मनें ॥ १ ॥

मानेल त्या तुह्मी अइका स्वभावें । मी तों माझ्याभावें अनुसरलें ॥ २ ॥

तुका ह्मणे तुह्मीं फिरावें बहुतीं । माझी तों हे गती जाली आतां ॥ ३ ॥

॥ ३१ ॥

न बोलतां तुह्मां कळों न ये गुज । ह्मणउनी लाज सांडियेली ॥ १ ॥

आतां तुह्मां पुढें जोडीतसें हात । नका कोणी अंत पाहों माझा ॥ २ ॥

तुका ह्मणे आह्मी बैसलों शेजारीं । करील तें हरी पाहों आतां ॥ ३ ॥

॥ २५ ॥

॥ ३२ ॥

नये जरी तुज मधुर उत्तर । दिधला सुस्वर नाहीं देवें ॥ १ ॥
॥ध्रु.॥ नाहीं तयाविण भुकेला विठ्ठल । येइल तैसा बोल रामकृष्ण ॥ध्रु॥
देवापाशीं मागें आवडीची भक्ति । विश्वासेंशीं प्रीति भावबळें ॥ २ ॥
तुका ह्मणे मना सांगतों विचार । धरावा निर्धार दिसेंदिस ॥ ३ ॥

॥ ३३ ॥

सावध जालों सावध जालों । हरिच्या आलों जागरणा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तेथें वैष्णवांचे भार । जयजयकार गर्जतसे ॥ ध्रु ॥
पळोनियां गेली झोप । होतें पाप आड तें ॥ २ ॥
तुका ह्मणे तया ठाया । ओल छाया कृपेची ॥ ३ ॥

॥ ३४ ॥

आपुलिया हिता जो असे जागता । धन्य माता पिता तयाचिया ॥ १ ॥
॥ध्रु.॥ कुळीं कन्यापुत्र होतीं जीं सात्विक । तयाचा हरिख वाटे देवा ॥ध्रु॥
गीता भागवत करिती श्रवण । आणीक चिंतन विठोबाचें ॥ २ ॥
तुका ह्मणे मज घडो त्याची सेवा । तरी माझ्या दैवा पार नाहीं ॥ ३ ॥

॥ ३५ ॥

अंतरींची घेतो गोडी । पाहे जोडी भावाची ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देव सोयरा देव सोयरा । देव सोयरा दीनाचा ॥ ध्रु ॥
आपुल्या वैभवें । शृंगारावें निर्मळ ॥ २ ॥
तुका ह्मणे जेवी सवें । प्रेम द्यावें प्रीतीचें ॥ ३ ॥

---

१ पं. अखंड.

॥ ३६ ॥

सुखें वोळंब दावी गोहा । माझें दुःख नेणा पाहा ॥ १ ॥
॥ध्रु.॥ आवडीचा मारिला वेडा । होय होय कैसा ह्मणे भिडा ॥छ॥
निपट मज न चले अन्न । पायली गहूं सांजा तीन ॥ २ ॥
गेले वारीं तुह्मीं आणिली साकर । सातदी गेली साडेदहा शेर ॥ ३ ॥
अखंड मज पोटाची व्यथा । दुधभात साकर तूप पथ्या ॥ ४ ॥
दो पाहरा मज लहरी येती । शुद्ध नाहीं पडे सुपती ॥ ५ ॥
नीज नये घाली फुलें । जवळीं न साहती मुलें ॥ ६ ॥
अंगीं चंदन लावितें भाळीं । सदा शूळ माझे कपाळीं ॥ ७ ॥
हाड गळोनि आलें मास । माझें दुःख तुह्मां नेणवे कैसें ॥ ८ ॥
तुका ह्मणे जिता गाढव केला । मेलियावरि नरका नेला ॥ ९ ॥

॥ ३७ ॥

पावलें पावलें तुझें आह्मां सर्व । दुजा नको भाव होऊं देऊं ॥ १ ॥
॥ध्रु.॥ जेथें तेथें देखें तुझीं च पाउलें । त्रिभुवन संचलें विठ्ठला गा ॥छ॥
भेदाभेदमतें भ्रमाचे संवाद । आह्मां नको वाद त्यांशीं देऊं ॥ २ ॥
तुका ह्मणे अणु तुजविण नाहीं । नभाहूनि पाहीं वाढ आहे ॥ ३ ॥

॥ ३८ ॥

वंदूं चरणरज सेवूं उष्टावळी । पूर्वकर्मा होळी करुनी सांडूं ॥ १ ॥
॥ध्रु.॥ अमुप हें गांठीं बांधूं भांडवल । अनाथा विठ्ठल आह्मां जोगा ॥छ॥
अवघे होती लाभ एका या चिंतनें । नामसंकीर्तनें गोविंदाच्या ॥ २ ॥
जन्ममरणाच्या खुंटतील खेपा । होईल हा सोपा सिद्ध पंथ ॥ ३ ॥

---

१ पं. साकर पथ्या.—२ पं. सात दिवसा दाहा शेर.

गेले पुढें त्यांचा शोधीत मारग । चला जाऊं माग घेत आह्मी ॥ ४ ॥
तुका ह्मणे घालूं जीवपणा चिरा । जाऊं त्या माहेरा निजाचिया ॥ ५ ॥

॥ ३९ ॥

जेविले ते संत मागें उष्टावळी । अवघ्या पत्रावळी करुनी झाडा ॥१॥
॥ ध्रु. ॥ सोवळ्या ओंवळ्या राहिलों निराळा ॥ पासूनि सकळां अवघ्यां दुरीं ॥ध्रु॥
परें परतें मज न लगे सांगावें । हें तों देवें बरें शिकविलें ॥ २ ॥
दुसऱ्यातें आह्मी नाहीं आतळत । जाणोनि संकेत उभा असे ॥ ३ ॥
येथें कोणीं कांहीं न धरावी शंका । मज चाड एका भोजनाची ॥ ४ ॥
लांचावला तुका मारितसे झड । पुरविलें कोड नारायणें ॥ ५ ॥

॥ ४० ॥

देवाच्या प्रसादें करा रे भोजन । व्हाल कोण कोण अधिकारी ते ॥१॥
॥ध्रु.॥ ब्रह्मादिकांसि हें दुर्लभ उच्छिष्ट । नका मानूं वीट ब्रह्मरसीं ॥ध्रु॥
अवघियां पुरतें वोसंडलें पात्र । अधिकार सर्वत्र आहे येथें ॥ २ ॥
इच्छादानी येथें वळला समर्थ । अवघें चि आर्त पुरवितो ॥ ३ ॥
सरे येथें ऐसें नाहीं कदाकाळीं । पुढती वाटे कवळीं घ्यावें ऐसें ॥ ४ ॥
तुका ह्मणे पाक लक्षुमीच्या हातें । कामारीसांगातें निरुपम ॥ ५ ॥

॥ ४१ ॥

अवगुणांचे हातीं । आहे अवघी फजीती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं पात्रासवें चाड । प्रमाण तें फिकें गोड ॥ ध्रु ॥
विष तांब्या वाटी । भरली लावूं नये होटीं ॥ २ ॥
तुका ह्मणे भाव । शुद्ध बरा सोंग वाव ॥ ३ ॥

---

१ पं. पुढें गेले.

॥ ४२ ॥

हरीच्या जागरणा । जातां कां रे नये मना ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ कोठें पाहासील तुटी । आयुष्य वेचे फुकासाटीं ॥ ध्रु ॥

ज्यांची तुज गुंती । ते तों मोकलिती अंतीं ॥ २ ॥

तुका ह्मणे बरा । लाभ काय तो विचारा ॥ ३ ॥

॥ ४३ ॥

धर्माची तूं मूर्ती । पाप पुण्य तुझे हातीं ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ मज सोडवीं दातारा । कर्मापासूनि दुस्तरा ॥ ध्रु ॥

करिसी अंगीकार । तरी काय माझा भार ॥ २ ॥

जिवींच्या जीवना । तुका ह्मणे नारायणा ॥ ३ ॥

॥ ४४ ॥

ब्रह्मादिक जया लाभासि ठेंगणे । बळिये आह्मी भले शरणागत ॥ १ ॥

॥ध्रु.॥ कामनेच्या त्यागें भजनाचा लाभ। जाला पद्मनाभ सेवाऋणी ॥ध्रु॥

कामधेनूचिया क्षीरा पार नाहीं । इच्छेचिये वाही वरुषावें ॥ २ ॥

बैसलिये ठायीं लागलें भरतें । त्रिपुटीवरतें भेदी ऐसें ॥ ३ ॥

हरि नाहीं आह्मा विष्णुदासां जगीं । नारायण अंगीं विसावला ॥ ४ ॥

तुका ह्मणे .बहु लाटे हें भोजन । नाहीं रिता कोण राहत राहीं ॥ ५ ॥

॥ ४५ ॥

दुजें खंडे तरी । उरला तो अवघा हरि ॥

आपणाबाहेरी । न लगे ठाव धुंडावा ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ इतुलें जाणावया जाणा । कोंडे तरी मनें मना ॥

१ पं. केला.

पारधीच्या खुणा । जाणतें चि साधावें ॥ ध्रु ॥
देह आधीं काय खरा । देहसंबंधपसारा ॥
बुजगावणें चोरा । रक्षणसें भासतें ॥ २ ॥
तुका करी जागा । नको वोसपूं वाउगा ॥
आहेसि तूं आगा । अंगीं डोळे उघडी ॥ ३ ॥

॥ ४६ ॥

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेदभ्रमें अमंगळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अइका जी तुह्मी भक्त भागवत । कराल तें हित सत्य करा ॥ ध्रु ॥
कोणा ही जिवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वरपूजनाचें ॥ २ ॥
तुका ह्मणे एका देहाचे अवयव । सुख दुःख जीव भोग पावे ॥ ३ ॥

॥ ४७ ॥

आह्मी तरी आस । जालों टाकोनि उदास ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां कोण भय धरी । पुढें मरणाचें हरी ॥ ध्रु ॥
भलते ठायीं पडों । देह तुरंगीं हा चढो ॥ २ ॥
तुमचें तुह्मांपासीं । आह्मी आहों जैसीं तैसीं ॥ ३ ॥
गेले मानामान । सुखदुःखाचें खंडन ॥ ४ ॥
तुका ह्मणे चित्तीं । नाहीं वागवीत खंती ॥ ५ ॥

॥ ४८ ॥

निंदी कोणी मारी । वंदी कोणी पूजा करी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मज हें ही नाहीं तें ही नाहीं । वेगळा दोहीं पासुनी ॥ ध्रु ॥
देहभोग भोगें घडे । जें जें जोडे तें बरें ॥ २ ॥

---

१ पं. जाणे तेणेंचि साधाव्या.–२. दे. त. चाचपूं.–३ त. भेदाभेदश्रम.

अवघें पावे नारायणीं ॥ जना[illegible]

॥ ४९ ॥

जन विजन जालें आह्मां । विठ्ठलनामा प्रमाणें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पाहें तिकडे बापमाय । विठ्ठल आहे रखुमाई ॥ध्र॥
वन पट्टण एकभाव । अवघा ठाव सरता जाला ॥ २ ॥
आठव नाहीं सुखदुःखा । नाचे तुका कौतुकें ॥ ३ ॥

॥ ५० ॥

हिरा ठेवितां ऐरणीं । वांचे मारितां जो घणीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥तोचि मोल पावे खरा । कारणीचा होय चुरा ॥ध्र॥
मोहरा होय तोचि अंगें । सूत न जळे ज्याचे संगें ॥ २ ॥
तुका ह्मणे तोचि संत । सोसी जगाचे आघात ॥ ३ ॥

॥ ५१ ॥

आलिंगनें घडे । मोक्ष सायुज्यता जोडे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसा संताचा महिमा । जाली बोलायाची सीमा ॥ध्र॥
तीर्थें पर्वकाळ । अवघीं पायांपें सकळ ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । त्यांची केली पावे सेवा ॥ ३ ॥

॥ ५२ ॥

माझिया मीपणा । जाला यावरी उगाणा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भोगी त्यागी पांडुरंग । त्यानें वसविलें अंग ॥ध्र॥
टाळिलें निमित्त । फार थोडें घात हित ॥ २ ॥
यावें कामावरी । तुका ह्मणे नाहीं उरी ॥ ३ ॥

॥ ५३ ॥

सकळ चिंतामणी शरीर । जरी जाय अहंकार आशा समूळ ॥

निंदा हिंसा नाहीं कपट देहबुद्धि । निर्मळ स्फटिक जैसा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मोक्षाचें तीर्थ न लगे वाराणसी । येती तयापासीं अवघीं जनें ॥
तीर्थांसी तीर्थ जाला तो चि एक । मोक्ष तेणें दर्शनें ॥ध्रु॥
मन शुद्ध तया काय करिसी माळा । मंडित सकळा भूषणांसी ॥
हरिच्या गुणें गर्जताती सदा । आनंद तया मानसीं ॥ २ ॥
तन मन धन दिलें पुरुषोत्तमा । आशा नाहीं कवणाची ॥
तुका ह्मणे तो परिसाहूनि आगळा । काय महिमा वर्णूं त्याची ॥ ३ ॥

॥ ५४ ॥

आहे तें सकळ कृष्णा चि अर्पण । न कळतां मन दुजें भावी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणउनी पाठी लागतील भूतें । येती गवसीत पांचजणें ॥ध्रु॥
ज्याचें त्या वंचलें आठव न होतां । दंड या निमित्ताकारणें हा ॥ २ ॥
तुका ह्मणे काळें चेंपियेला गळा । मी मी वेळोवेळा करीतसे ॥ ३ ॥

॥ ५५ ॥

महारासि सिवे । कोपें ब्राह्मण तो नव्हे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तया प्रायश्चित्त कांहीं । देहत्याग करितां नाहीं ॥ध्रु॥
नातळे चांडाळ । त्याचा अंतरीं विटाळ ॥ २ ॥
ज्याचा संग चित्तीं । तुका ह्मणे तो त्या याती ॥ ३ ॥

॥ ५६ ॥

तेलनीशीं रुसला वेडा । रागें कोरडें खातो भिडा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आपुलें हित आपण पाही । संकोच तो न धरी कांहीं ॥ध्रु॥
नेवडे लोकां टाकिला गोहो । बोडिले डोकें सांडिला मोहो ॥ २ ॥

---

१. त. त्याचा.–२. पं. नाडिलें.

शेजारणीच्या गेली रागें । कुतऱ्यांनीं घर भरिलें मागें ॥ ३ ॥
पिसाररागें भाजिलें घर । नागविलें तें नेणे फार ॥ ४ ॥
तुका ह्मणे वांच्या रागें । फेडिलें सावलें देखिलें जगें ॥ ५ ॥

॥ ५७ ॥

मज दास करी त्यांचा । संतदासांच्या दासांचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मग होत कल्पवरी । सुखें गर्भवास हरी ॥ ध्रु ॥
नीचवृत्तिकाम । परी मुखीं तुझें नाम ॥ २ ॥
तुका ह्मणे सेवे । माझे संकल्प वेचावे ॥ ३ ॥

॥ ५८ ॥

सदा तळमळ । चित्ताचिये हळहळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ त्याचें दर्शन न व्हावें । शव असतां तो जिवे ॥ ध्रु ॥
कुशब्दाची घाणी । अमंगळविली वाणी ॥ २ ॥
नेणे शब्द पर । तुका ह्मणे परउपकार ॥ ३ ॥

॥ ५९ ॥

जया नाहीं नेम एकादशीव्रत । जाणावें तें प्रेत शव लोकीं ॥ १ ॥
॥ध्रु.॥ त्याचें वय नित्य काळ लेखीताहे । रागें दात खाय करकरा ॥ध्रु॥
जयाचिये द्वारीं तुळसीवृंदावन । नाहीं तें स्मशान गृह जाणां ॥ २ ॥
जये कुळीं नाहीं एक ही वैष्णव । त्याचा बुडे भवनदीतापा ॥ ३ ॥
विठोबाचें नाम नुच्चारी जें तोंड । प्रत्यक्ष तें कुंड रजकाचें[३] ॥ ४ ॥
तुका ह्मणे त्याचे काष्ठ हातपाय । कीर्तना नव जाय हरीचिया[४] ॥ ५ ॥

---

१ पं. पिसाभेणें.– २ पं. त्याचे दिवस.– ३ पं. चर्मकाचें.– ४ पं. हरीच्या जो.

॥ ६० ॥

आह्मी सर्वैच सुडके । जवळीं येतां चोर धाके ॥
जाऊं पुढी भिकें । कुतरीं घर राखती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नांदणूक ऐसी सांगा । नाहीं तरी वांयां भागा ॥
थोरपण अंगा । तरी ऐसें आणावें ॥ ध्रु ॥
अक्षय साचार । केलें सायासांनीं घर ॥
एरंडासिंवार । दुजा भार न साहती ॥ २ ॥
धन कण घरोघरीं । पोट भरे भिकेवरी ॥
जतन तीं करी । कोण गुरें वासरें ॥ ३ ॥
जाली सकळ निश्चिंती । भांडवल शेण माती ॥
झळझळीत भिंती । वृंदावनें तुळसीचीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे देवा । अवघा निरविला हेवा ॥
कुटुंबाची सेवा । तो चि करी आमुच्या ॥ ५ ॥

॥ ६१ ॥

पराविया नारी माउलीसमान । मानिलिया धन काय वेचे ॥ १ ॥
॥ध्रु.॥ न करितां परनिंदा परद्रव्य अभिलाष। काय तुमचें यास वेचे सांगा ॥ध्रु॥
बैसलिये ठायीं ह्मणतां रामराम । काय होय श्रम ऐसें सांगा ॥ २ ॥
संताचे वचनीं मानितां विश्वास । काय तुमचें यास वेचे सांगा ॥ ३ ॥
खरें बोलतां कोण लागती सायास । काय वेचे यास ऐसें सांगा ॥४॥
तुका ह्मणे देव जोडे याचसाटीं। आणीक ते आटी न लगे कांहीं ॥ ६ ॥

---

१ पं. निरसला.— २ पं. द्रव्य.— ३ पं. तुमचें.

॥ ६२ ॥

शुद्धबीजा पोटीं । फळें रसाळ गोमटीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मुखीं अमृताची वाणी । देह वेचावा कारणीं ॥ ध्रु ॥
सर्वांगीं निर्मळ । चित्त जैसें गंगाजळ ॥ २ ॥
तुका ह्मणे जाती । ताप दर्शनें विश्रांती ॥ ३ ॥

॥ ६३ ॥

चित्त समाधानें । तरी विष वाटे सोनें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बहु खोटा अतिशय । जाणां भले सांगों काय ॥ ध्रु ॥
मनाच्या तळमळें । चंदनें ही अंग पोळे ॥ २ ॥
तुका ह्मणे दुजा । उपचार पीडा पूजा ॥ ३ ॥

॥ ६४ ॥

परिमळ ह्मण चोळूं नये फूल । खाऊं नये मूळ आवडतें ॥ १ ॥+
मोतियाचें पाणी चाखूं नये स्वाद । यंत्र भेदुनि नाद पाहूं नये ॥ २ ॥
कर्मफळ ह्मणुनी इच्छूं नये काम । तुका ह्मणे वर्म दावूं लोकां ॥ ३ ॥

॥ ६५ ॥

माया तें चि ब्रह्म ब्रह्म तेंचि माया । अंग आणि छाया तया परी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तोडितां न तुटे सारितां निराळी । लोटांगणांतळीं हारपते ॥ ध्रु ॥
दुजें नाहीं तेथें बळ कोणासाठीं । आणीक ते आटी विचाराची ॥ २ ॥
तुका ह्मणे उंच वाढे उंचपणें । ठेंगणीं लवणें जैसीं तैसीं ॥ ३ ॥

॥ ६६ ॥

दुर्जनांसि करी साहे । तो ही लोंहे दंड हे ॥ १ ॥

---

१ पं. देवाचे.--२ त. तीच्या.--३ दे. दंड हे लाहे.

+ "काय एक नव्हे धरितां अंतरीं । कासवीचे परी वेळोवेळां" ॥ हें कडवें पंढरपूरच्या प्रतींत अधिक आहे.

॥ ध्रु. ॥ शिंदळीच्या कुंटणी वाटा । संग खोटा खोट्याचा ॥ ध्रु ॥
येर येरा कांचणी भेटे । आगी उठे तेथूनी ॥ २ ॥
तुका ह्मणे कापूं नाकें । पुढें आणिकें शिकविती ॥ ३ ॥

॥ ६७ ॥

वृत्ति भूमि राज्य द्रव्य उपार्जिती । जाणा त्या निश्चितीं देव नाहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भाडेकरी वाहे पाठीवरी भार । अंतरींचें सार लाभ नाहीं ॥ध्रु॥
देवपूजेवरी ठेवूनियां मन । पाषाण पाषाण पूजी लोभें ॥ २ ॥
तुका ह्मणे फळ चिंतिती आदरें । लाघव हे चार शिंदळीचे ॥ ३ ॥

॥ ६८ ॥

पवित्र सोंवळीं । एक तीं च भूमंडळीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ज्यांचा आवडता देव । अखंडित प्रेमभाव ॥ ध्रु ॥
तीं च भाग्यवंतें । सरतीं पुरतीं धनवित्तें ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । त्यांची केल्या पावे सेवा ॥ ३ ॥

॥ ६९ ॥

आशाबद्ध जन । काय जाणे नारायण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करी इंद्रियांची सेवा । पाहे आवडीचा हेवा ॥ ध्रु ॥
भ्रमलें चावळे । तैसें उचित न कळे ॥ २ ॥
तुका ह्मणे विषें । अन्न नाशियेलें जैसें ॥ ३ ॥

॥ ७० ॥

ढेकरें जेवण दिसे साचें । नाहीं तरि काचें कुंथाकुंथी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हे ही बोल ते ही बोल । कोरडे फोल रुचीविण ॥ ध्रु ॥
गव्हांचिया होती परी । फके वरी खाऊं नये ॥ २ ॥
तुका ह्मणे असे हातींचें कांकण । तयासी दर्पण विल्हाळक ॥ ३ ॥

॥ ७१ ॥

करावी ते पूजा मनें चि उत्तम । लौकिकाचें काम काय असे ॥ १ ॥
॥ध्रु.॥ कळावें तयासि कळे अंतरींचें । कारण तें साचें साचा अंगीं ॥ध्रु॥
अतिशया अंतीं लाभ किंवा घात । फळ देतें चित्त बीजा ऐसें ॥ २ ॥
तुका ह्मणे जेणें राहे समाधान । ऐसें तें भजन पार पावी ॥ ३ ॥

॥ ७२ ॥

एकादशीव्रत सोमवार न करिती । कोण त्यांची गति होइल नेणों ॥ १ ॥
॥ध्रु.॥ काय करूं बहु वाटे तळमळ । आंधळीं सकळ बहिर्मुख ॥ ध्रु॥
हरिहरां नाहीं बोटभरी वाती । कोण त्यांची गति होइल नेणों ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं नारायणीं प्रीति । कोण त्यांची गति होइल नेणों ॥ ३ ॥

॥ ७३ ॥

नव्हे आराणूक संवसारा हातीं । सर्वकाळ चित्तीं हा चि धंदा ॥ १ ॥
॥ध्रु.॥ देवधर्म सांदीं पडिला सकळ । विषयीं गोंधळ गाजतसे ॥ ध्रु ॥
रात्रि दीस न पुरे कुटुंबाचें समाधान । दुर्लभ दर्शन ईश्वराचें ॥ २ ॥
तुका ह्मणे आत्महत्या रे घातकी । थोर होते चुकी नारायणीं ॥ ३ ॥

॥ ७४ ॥

स्मशान ते भूमि प्रेतरूप जन । सेवाभक्तिहीन ग्रामवासी ॥ १ ॥
॥ध्रु.॥ भरतील पोट श्वानाचिया परी । वस्ति दिली घरीं यमदूतां ॥ध्रु॥
अपूज्य लिंग तेथें अतित न घे थारा । ऐसी वस्ती चोरां कंटकांची ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं ठावी स्थिति मती । यमाची निश्चिती कुळवाडी ॥ ३ ॥

॥ ७५ ॥

आहाकट त्याचे करिती पितर । वंशीं दुराचार पुत्र जाला ॥ १ ॥

॥ध्रु.॥ गळे चि ना गर्भ नव्हे चि कां वांज । माता त्याची लाजलावा पापी ॥ध्रु॥
परपीडे परद्वारीं सावधान । सादर चि मन अभाग्याचें ॥ २ ॥
न मिळतां निंदा चाहडी उपवास । संग्रहावे दोष सकळ ही ॥ ३ ॥
परउपकार पुण्य त्या वावडें । विषाचें तें कीडें दुग्धीं मरे ॥ ४ ॥
तुका ह्मणे विटाळाची च तो मूर्ति । दया क्षमा शांति नातळे त्या ॥ ५ ॥

॥ ७६ ॥

श्वान शीघ्रकोपी । आपणा घातकर पापी ॥ १ ॥
॥ध्रु.॥ नाहीं भीड आणि धीर । उपदेश न जिरे क्षीर ॥ ध्रु ॥
माणसांसि भुंके । विजातीनें द्यावें थुंके ॥ २ ॥
तुका ह्मणे चित्त । मळिण करा तें फजित ॥ ३ ॥

॥ ७७ ॥

देखोनि हरखली अंड । पुत्र जाला ह्मणे रांड ॥
तंव तो जाला भांड । चाहाड चोर शिंदळ ॥ १ ॥
॥ध्रु.॥ जाय तिकडे पीडी लोकां । जोडी भांडवल थुंका ॥
थोर जाला चुका । वर कां नाहीं घातली ॥ ध्रु ॥
भूमि कांपे त्याच्या भारें । कुंभपाकाचीं शरीरें ॥
निष्ठुर उत्तरें । पापदृष्टी मळिणचित्त ॥ २ ॥
दुराचारी तो चांडाळ । पाप सांगातें विटाळ ॥
तुका ह्मणे खळ । ह्मणोनियां निषिद्ध तो ॥ ३ ॥

॥ ७८ ॥

नेणें गाणें कंठ नाहीं हा सुस्वर । घालूं तुज भार पांडुरंगा ॥ १ ॥

---

१. प. बोले निष्ठुर उत्तरें.

नेणें राग वेळ काळ घात मात ॥ तुझे पायीं चित्त ठेवीं देवा ॥
तुका ह्मणे मज चाड नाहीं जना ॥ तुज नारायणा वांचूनिया ॥ २ ॥

॥ ७९ ॥

माझी पाठ करा कवी । उट लावी दारोदार ॥ १ ॥
॥ध्रु.॥ तंव तया पारखी सिव । लाजे ठाव सांडितां ॥ ध्रु ॥
उष्टावळी करूनि जमा । कुंथुनि प्रेमा आणितसे ॥ २ ॥
तुका ह्मणे बाहेरमुदी । आहा च गोविंदीं न सरती ॥ ३ ॥

॥ ८० ॥

उपाधीच्या नांवें घेतला सिंतोडा । नेदूं आतां पीडा आतळों ते ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काशासाठीं हात भरूनि धुवावे । चालतिया गोवि मारगासि ॥ध्रु॥
काय नाहीं देवें करूनि ठेविलें । असे तें आपुलें ते ते ठायीं ॥ २ ॥
तुका ह्मणे जेव्हां गेला अहंकार । तेव्हां आपपर बोळविलें ॥ ३ ॥

॥ ८१ ॥

थोंगाचें तें भाग्य क्षमा । आधीं दमा इंद्रियें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अवघीं भाग्यें येती घरा । देव सोयरा जालिया ॥ ध्रु ॥
मिरासीचें ह्मूण सेत । नाहीं देत पीक उगें ॥ २ ॥
तुका ह्मणे उचित जाणां । उगीं सिणा काशाला ॥ ३ ॥

॥ ८२ ॥

न ये नेत्रां जळ । नाहीं अंतरीं कळवळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तों हे चावटीचे बोल । जन रंजवणें फोल ॥ ध्रु ॥
न फळे उत्तर । नाहीं स्वामी जों सादर ॥ २ ॥
तुका ह्मणे भेटी । जंव नाहीं दृष्टादृष्टी ॥ ३ ॥

---

१ प्र. आणितो.—२ त. आप आणि पर.

॥ ८३ ॥

बाईल सवासिण आई ॥ आपण पितरांचे ठायीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ थोर वेच जाला नष्टा। अवघ्या अपसव्य चेष्टा ॥ ध्रु ॥
विषयांचे चरवणीं[1] । केली आयुष्याची गाळणी ॥ २ ॥
तुका ह्मणे लंडा। नाहीं दया देव धोंडा ॥ ३ ॥

॥ ८४ ॥

दानें कांपे हात । नावडे तेविशीं मात ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कथी चावटीचे बोल । हिंग क्षीरीं मिथ्या फोल ॥ ध्रु ॥
न वजती पाय । तीर्था ह्मणे वेचूं काय ॥ २ ॥
तुका ह्मणे मनीं नाहीं । न ये आकारातें कांहीं ॥ ३ ॥

॥ ८५ ॥

वळितें जें गाई । त्यासि फार लागे काई ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ निवे भावाच्या उत्तरीं । भलते एके धणी वरी ॥ ध्रु ॥
न लगती प्रकार । कांहीं मानाचा आदर ॥ २ ॥
सांडी थोरपणा । तुका ह्मणे सर्वे दीना ॥ ३ ॥

॥ ८६ ॥

मैत्र केले महा बळी । कामा न येती[2] अंतकाळीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आधीं घे रे रामनाम । सामा भरीं हा उत्तम ॥ ध्रु ॥
नाहीं तरी यम । दांत खातो करकरा ॥ २ ॥
धन मेळविलें कोडी । काळ घेतल्या न सोडी ॥ ३ ॥
कामा न ये हा परिवार । सैन्य लोक बहु फार ॥ ४ ॥
तंववरि मिरविसी बळ । जंव आला नाहीं काळ ॥ ५ ॥

---

१ त. चरणीं.–२त. ये.

तुका ह्मणे बापा । चुकवीं चौऱ्याशींच्या खेपा ॥ ६ ॥

॥ ८७ ॥

कानडीनें केला मऱ्हाटा भ्रतार । एकाचें उत्तर एका न ये ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसें मज नको करूं कमळापति । देईं या संगति सज्जनांची ॥ ध्रु॥
तिनें पाचारिलें इल बा ह्मणोन । येरु पळे आण जाली आतां ॥ २ ॥
तुका ह्मणे येर येरा जें विच्छिन्न । तेथें वाढे सीण सुखा पोटीं ॥ ३ ॥

॥ ८८ ॥

सुख पाहतां जवापाडें । दुःख पर्वता एवढें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धरीं धरीं आठवण । मानीं संताचें वचन ॥ ध्रु ॥
नेलें रात्रीनें तें अर्धें । बाळपण जराव्याधि ॥ २ ॥
तुका ह्मणे पुढा । घाणा जुंती जसी मूढा ॥ ३ ॥

। ८९ ॥

बोलायाचा त्यासीं । नको संबंध मानसीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जया घडली संतनिंदा । तुज विसरूनि गोविंदा ॥ ध्रु ॥
जळो त्याचें तोंड । नको दृष्टीपुढें भांड ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । तया दुरी मज ठेवा ॥ ३ ॥

॥ ९० ॥

तीळ जाळिले तांदुळ । काम क्रोध तैसे चि खळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कां रे सिणलासी वाउगा । न भजतां पांडुरंगा ॥ ध्रु ॥
मानदंभासाठीं । केली अक्षरांची आटी ॥ २ ॥
तप करूनि तीर्थाटन । वाढविला अभिमान ॥ ३ ॥

---

१ तु. जाच चुकवीं या खेपा–२ पं. मान दंभ पोटासाठीं.

वांटिलें तें धन । केली अहंता जतन ॥ ४ ॥
तुका ह्मणे चुकलें वर्म । केला अवघा चि अधर्म ॥ ५ ॥

॥ ९१ ॥

संवसारतापें तापलों मी देवा । करितां या सेवा कुटुंबाची ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणऊनी तुझे आठविले पाय । ये वो माझे माय पांडुरंगे ॥ध्रु॥
बहुतां जन्मींचा जालों भारवाही । सुटिजे हें नाहीं वर्म ठावें ॥ २ ॥
वेढियेलों चोरीं अंतर्बाह्यात्कारीं । कणव न करी कोणी माझी ॥ ३ ॥
बहु पांगविलों बहु नागविलों । बहु दिवस जालों कासाविस ॥ ४ ॥
तुका ह्मणे आतां धांव घालीं वेगीं । ब्रीद तुझें जगीं दीननाथा ॥ ५ ॥

॥ ९२ ॥

भक्तऋणी देव बोलती पुराणें । निर्धार वचनें साच करीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मागें काय जाणों अइकिली वार्त्ता । कबिर सातें जातां घडिया वांटी ध्रु.
माघारिया धन आणिलें घरासि । नेघे केला त्यासि त्याग तेणें ॥ २ ॥
नामदेवाचिया घरासि आणिलें । तेणें लुटविलें द्विजां हातीं ॥ ३ ॥
प्रत्यक्षासि काय द्यावें हें प्रमाण । व्यंकोबाचें ऋण फेडियेलें ॥ ४ ॥
बीज दळोनियां केली आराधना । लागे नारायणा पेरणें तें ॥ ५ ॥
तुका ह्मणे नाहीं जयासि निर्धार । नाडला साचार तो चि एक ॥ ६ ॥

॥ ९३ ॥

भोगें घडे त्याग । त्यागें अंगा येती भोग ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें उफराटें वर्म । धर्मा अंगीं च अधर्म ॥ ध्रु ॥
देव अंतरे तें पाप । खोटे उगवा संकल्प ॥ २ ॥

---

१ त. पं. खरीं—२ पं. एकोबाचें.

तुका ह्मणे भीड खोटी । लाभ विचारांवा पोटीं ॥ ३ ॥

॥ ९४ ॥

भोरप्यानें सोंग पालटिलें वरी । बक ध्यान धरी मत्स्या जैसें ॥ १ ॥
॥ध्रु.॥ टिळे माळा मैंद मुद्रा लावी अंगीं । देखों नेदि जगीं फांसे जैसे ॥ ध्रु ॥
ढीवर या मत्स्या चारा घाली जैसा । भीतरील फांसा कळों नेदी ॥ २ ॥
खाटिक हा स्नेहवादें पशु पाळी । कापावया नळी तया साठीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे तैसा भला मी लोकांत । परी.तूं कृपावंत पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ ९५ ॥

गेली वीरसरी । मग त्यासि रांड भारी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मग नये तैसी सत्ता । गेली मागील आणितां ॥ ध्रु ॥
भंगलिया चित्ता । न ये काशानें सांदि[२]तां ॥ २ ॥
तुका ह्मणे धीर । भंगलिया पाठीं कीर[३] ॥ ३ ॥

॥ ९६ ॥

युक्ताहार न लगे आणिक साधनें । अल्प नारायणें दाखविलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कलियुगामाजी करावें कीर्तन । तेणें नारायण देईल भेटी ॥ ध्रु ॥
न लगे हा लौकिक सांडावा वेव्हार । घ्यावें वनांतर भस्म दंड ॥२ ॥
तुका ह्मणे मज आणिक उपाव । दिसती ते वाव नामाविण ॥ ३ ॥

॥ ९७ ॥

कंठीं कृष्णमणी । नाहीं अशुभ ते वाणी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हो का न[४]र अथवा नारी । रांड तयें नावें खरी ॥ ध्रु ॥
नाहीं हातीं दान । शूरपणाचें कांकण ॥ २ ॥

---

१ प्र. विचाराच्या पोटीं.–२ पं. सांधितां.–३ पं. (छापी प्रतींत) कर.–४ पं. पुरुष.

बाळियेली संतीं । केली बोडोनि फजिती ॥ ३ ॥
तुका ह्मणे ताळा । नाहीं त्याची अवकळा ॥ ४ ॥

॥ ९८ ॥

माया ब्रह्म ऐसें ह्मणती धर्मठक । आपणासरिसे लोक नागविले ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ विषयीं लंपट शिकवी कुविद्या । मनामागें नांद्या होऊनि फिरे ॥ ध्रु
करूनी खातां पाक जिरे सुरण राई । करितां अतित्याई दुःख पावे ॥२॥
औषध द्यावया चाळविलें बाळा । दावूनियां गुळा दृष्टीपुढें ॥ ३ ॥
तरावया आधीं शोधा वेदवाणी । वांजट बोलणीं वारा त्यांचीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे जयां पिंडाचें पाळण । न घडे नारायणभेट तयां ॥ ५ ॥

॥ ९९ ॥

मृगजळ दिसे साचपणा ऐसें । खोटियाचें पिसें ऊर फोडी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जाणोनि कां करा आपुलाले घात । विचारा रे हित लवलाहीं ॥ध्रु॥
संचित सांगातीं बोळवणें सवें । आचरलें द्यावें फळ तेणें ॥ २ ॥
तुका ह्मणे शेखी श्मशान तोंवरी । संबंध गोवरी अंगीं सवें ॥ ३ ॥

॥ १०० ॥

गौळीयाची ताकपिरें । कोण पोरें चांगलीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येवढा त्यांचा छंद देवा । काय सेवा भक्ती ते ॥ ध्रु ॥
काय उपास पडिले होते । कण्याभोंवते विदुराच्या ॥ २ ॥
तुका ह्मणे कुब्जा दासी । रूपरासी हीनकळा ॥ ३ ॥

॥ १०१ ॥

आतां तरी पुढें हा चि उपदेश । नका करूं नाश आयुष्याचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सकळांच्या पायां माझें दंडवत । आपुलालें चित्त शुद्ध करा ॥ध्रु॥

---
१ पं. काय

हित तें करावें देवाचें चिंतन । करूनियां मन एकविध ॥ २ ॥
तुका ह्मणे लाभें होय तो व्यापार । करा काय फार शिकवावें ॥ ३ ॥

॥ १०२ ॥

भक्ताविण देवा । कैंचें रूप घडे सेवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ शोभविलें येर येरां । सोनें एके ठायीं हिरा ॥ ध्रु ॥
देवाविण भक्ता । कोण देता निष्कामता ॥ २ ॥
तुका ह्मणे बाळ । माता जैसें स्नेहजाळ. ॥ ३ ॥

॥ १०३ ॥

विश्वाचा जनिता । ह्मणे यशोदेसि माता ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसा भक्तांचा अंकित । लागे तैसी लावी प्रीत ॥ ध्रु ॥
निष्काम निराळा । गोपी लावियेल्या चाळा ॥ २ ॥
तुका ह्मणे आलें । रूपा अव्यक्त चांगलें ॥ ३ ॥

॥ १०४ ॥

काय दिनकरा । केला कोंबड्यानें खरा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कां हो ऐसा संत ठेवा । भार माझे माथां देवा ॥ ध्रु ॥
आडविलें दासीं । तरि कां मरती उपवासी ॥ २ ॥
तुका ह्मणे हातीं । कळा सकळ अनंतीं ॥ ३ ॥

॥ १०५ ॥

जेवितां ही धरी । नाक हागतिया परी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसियाचा करीं चाळा । आपुली च अवकळा ॥ ध्रु ॥
सांडावें मांडावें । काय ऐसें नाहीं ठावें ॥ २ ॥

१ पं. शुद्धभावें.–२ पं. हित.–३ पं. करितां.

तुका ह्मणे करी । ताका दुधा एक सरी ॥ ३ ॥

॥ १०६ ॥

हो का पुत्र पत्नी बंधु । त्यांचा तोडावा संबंधु ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कळों आलें खटचाळसें । शिवों नये लिंपों दोषें ॥ ध्रु ॥
फोडावें मडकें । मेलें लेखीं घायें एकें ॥ २ ॥
तुका ह्मणे त्यागें । विण चुकीजेना भोगें ॥ ३ ॥

॥ १०७ ॥

व्याल्याविण करी शोभनतांतडी । चार ते गधडी करीतसे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कासया पाल्हाळ आणिकांचें देखी । सांगतां नव्हे सुखी साखरेसि ध्रु
कुंथाच्या ढेकरें न देवेल पुष्टी । रूप दावी कष्टी मळिण वरी ॥ २ ॥
तुका ह्मणे अरे वाचाळ हो ऐका । अनुभवेंविण नका वाव घेऊं ॥ ३ ॥

॥ १०८ ॥

जेणें घडे नारायणीं अंतराय । होत बाप माय वर्जावीं तीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येर प्रिया पुत्र धना कोण लेखा । करिती तीं दुःखा पात्र शत्रु ध्रु
प्रल्हादें जनक बिभीषणें बंधु । राज्य माता निंदु भरतें केली ॥ २ ॥
तुका ह्मणे सर्व धर्म हरिचे पाय । आणीक उपाय दुःखमूळ ॥ ३ ॥

॥ १०९ ॥

मान अपमान गोवे । अवघे गुंडूनी ठेवावे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हें चि देवाचें दर्शन । सदा राहे समाधान ॥ ध्रु ॥
शांतीची वसती । तेथें खुंटे काळगती ॥ २ ॥
आली ऊर्मी साहे । तुका ह्मणे थोडें आहे ॥ ३ ॥

---

१ पं. कुष्टी.

॥ ११० ॥

थोडें आहे थोडें आहे । चित्त साहे जालिया ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ हर्षामर्ष नाहीं अंगीं । पांडुरंगीं सरलें तें ॥ ध्रु ॥

अवघ्या साधनांचें सार । न लगे फार शोधावें ॥ २ ॥

तुका ह्मणे लटिकें पाहें । सांडीं देह अभिमान ॥ ३ ॥

॥ १११ ॥

आतां उघडीं डोळे । जरी अद्यापि न कळे ॥

तरी मातिचिये खोळे । दगड आला पोटासि ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ मनुष्यदेहा ऐसा निध । साधिली ते साधे सिद्ध ॥

करूनि प्रबोध । संत पार उतरले ॥ ध्रु ॥

नाव चंद्रभागे तीरीं । उभी पुंडलीकाचे द्वारीं ॥

कट धरूनियां करीं । उभाउभी पालवी ॥ २ ॥

तुका ह्मणे फुकासाठीं । पायीं घातली या मिठी ॥

होतो उठाउठी । लवकरी च उतार ॥ ३ ॥

॥ ११२ ॥

न करीं संग राहें रे निश्चळ । लागों नेदीं मळ ममतेचा ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ या नांवें अद्वैत खरें ब्रह्मज्ञान । अनुभवावांचून बडबड ते ॥ ध्रु ॥

इंद्रियांचा जय वासनेचा क्षय । संकल्पों ही न ये वरी मन ॥ २ ॥

तुका ह्मणे न ये जाणीव अंतरा । अंतरीं या थारा आनंदाचा ॥ ३ ॥

॥ ११३ ॥

पंढरीचा महिमा । देतां आणीक उपमा ॥ १ ॥

---

१ पं. न करीं रे संग.—२ पं. संकल्पा ही वरी न ये मन.

॥ ध्रु. ॥ ऐसा ठाव नाहीं कोठें । देव उभाउभी भेटे ॥ ध्रु ॥
आहेति सकळ । तीर्थें काळें देती फळ ॥ २ ॥
तुका ह्मणे पेठ । भूमिवरी हे वैकुंठ ॥ ३ ॥

॥ ११४ ॥

तिर्थी धोंडा पाणी । देव रोकडा सज्जनीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मिळालिया संतसंग । समर्पितां भलें अंग ॥ ध्रु ॥
तीर्थी भाव फळे । येथें आनाड तें वळे ॥ २ ॥
तुका ह्मणे पाप । गेलें गेल्या कळे ताप ॥ ३ ॥

॥ ११५ ॥

घेऊनियां चक्र गदा । हा चि धंदा करी तो ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भक्ता राखे पायापासीं । दुर्जनासी संहारी ॥ ध्रु ॥
अव्यक्त तें आकारलें । रूपा आलें गुणवंत ॥ २ ॥
तुका ह्मणे पुरवी इच्छा । जया तैसा विठ्ठल ॥ ३ ॥

॥ ११६ ॥

देखोनि पुराणिकांची दाढी । रडे फुंदे नाक ओढी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ प्रेम खरें दिसे जना । भिन्न अंतरीं भावना ॥ ध्रु ॥
आवरितां नावरे । खुर आठवी नेवरे ॥ २ ॥
बोलों नये मुखावाटां । ह्मणे होतां ब्यांचा तोटा ॥ ३ ॥
दोन्ही सिंगें चारी पाय । खुणा दावी ह्मणे होय ॥ ४ ॥
मना आणितां बोकड । मेला त्याची चरफड ॥ ५ ॥
होता भाव पोटीं । मुखा आलासे शेवटीं ॥ ६ ॥
तुका ह्मणे कुडें । कळों येतें तें रोकडें ॥ ७ ॥

॥ ११७ ॥

दुर्जनाची गंधी विष्ठेचिया परी । देखोनियां दुरी व्हावें तया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अइका हो तुह्मी मातहे सज्जन । करूं संघष्टन नये बोलों ॥ ध्रु ॥
दुर्जनाचे अंगीं अखंड विटाळ । वाणी रजस्वला स्रवे तैशी ॥ २ ॥
दुर्जनाचें भय धरावें त्यापरी । पिसाळलेवरी धांवे श्वान ॥ ३ ॥
दुर्जनाचा भला नव्हे अंगसंग । बोलिलासे त्याग देशाचा त्या ॥ ४ ॥
तुका ह्मणे किती सांगावें पृथक । अंग कुंभीपाक दुर्जनाचें ॥ ५ ॥

॥ ११८ ॥

अतिवादी नव्हे शुद्धया बीजाचा । ओळखा जातीचा अंत्यज तो ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वेद श्रुति नाहीं ग्रंथ ज्या प्रमाण । श्रेष्ठाचें वचन न मानी जो ॥ ध्रु ॥
तुका ह्मणे मद्यपानाचें मिष्टान्न । तैसा तो दुर्जन शिवों नये ॥ २ ॥

॥ ११९ ॥

शब्दा नाहीं धीर । ज्याची बुद्धि नाहीं स्थिर ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ त्याचें न व्हावें दर्शन । खळा पंगती भोजन ॥ ध्रु ॥
संतास जो निंदी । अधम लोभासाठीं वंदी ॥ २ ॥
तुका ह्मणे पोटीं । भाव अणीक जया होटीं ॥ ३ ॥

॥ १२० ॥

चोरें चोरातें करावा उपदेश । आपुला अभ्यास असेल तो ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ शिंदळीच्या मांगें वेचितां पाउलें । होईल आपुलें तिच्या ऐसें ॥ ध्रु॥
तुका ह्मणे भितों पुढिलिया दत्ता । ह्मणऊनि चिंता उपजली ॥ २ ॥

---

१. पं. अधम. २. पं. अंगणीं.

॥ १२१ ॥

मांडवाच्या दारा । पुढें आणिला ह्मातारा ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ ह्मणे नवरी आणा रांड । जाळा नवऱ्याचें तोंड ॥ ध्रु ॥

समय न कळे । काय उपयोगीं ये वेळे ॥ २ ॥

तुका ह्मणे खरा । येथूनिया दूर करा ॥ ३ ॥

॥ १२२ ॥

कांहीं नित्यनेमाविण । अन्न खाय तो[1] चि श्वान ॥

वांयां मनुष्यपण । भार वाहे तो वृषभ ॥ १ ॥

॥ धु. ॥ त्याचा होय भूमी भार । नेणे यातीचा आचार ॥

जाला दावेदार । भोगवी अघोर पितरांसि ॥ ध्रु ॥

अखंड अशुभ वाणी । खरें न बोले चि स्वप्नीं[2] ॥

पापी तयाहुनी । आणिक नाहीं दुसरा ॥ २ ॥

पोट पोसी एकला । भूतीं दया नाहीं ज्याला ॥

पाठीं लागे आल्या । अतिताचे दाराशीं ॥ ३ ॥

कांहीं संतांचें पूजन । न घडे तीर्थांचें भ्रमण ॥

यमाचा आंदण । सीण थोर पावेल ॥ ४ ॥

तुका ह्मणे त्यांनीं । मनुष्यपणा केली हानी ॥

देवा विसरूनी । गेलीं ह्मणतां मी माझें ॥ ५ ॥

॥ १२३ ॥

कन्या गो करी कथेचा विकरा ॥ चांडाळ तो खरा तया नांवें ॥ १ ॥

---

१ त. दे. तो. श्वान.—२ तं. दे. न बोले स्वप्नीं.

गुण अवगुण हे दोन्ही प्रमाण। यातिशीं कारण नाहीं देवा ॥ २ ॥*
आशाबद्ध नये करूं तें करिती । तुका ह्मणे जाती नरकामधीं ॥ ३ ॥

॥ १२४ ॥

हरिहरां भेद । नाहीं करूं नये वाद ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ एक एकाचे ल्हदयीं । गोडी साखरेच्या ठायीं ॥ ध्रु ॥
भेदकासी नाड । एक वेलांटी च आड ॥ २ ॥
उजवें वामांग । तुका ह्मणे एक चि अंग ॥ ३ ॥

॥ १२५ ॥

वक्त्या आधीं मान । गंध अक्षता पूजन ।
श्रोता यति जाला जाण । तरी त्या नाहीं उचित ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ शीर सर्वांगा प्रमाण । यथाविधि कर चरण ।
धर्माचें पाळण । सकळीं सत्य करावें ॥ ध्रु ॥
पट्टे पुत्र सांभाळी । पिता त्याचीं आज्ञा पाळी ।
प्रमाण सकळीं । ते मर्यादा करावी ॥ २ ॥
वरासनीं पाषाण । तो न मानावा सामान्य ।
ग्रेर उपकरणें । सोनियाचीं परी तीं नीच ॥ ३ ॥
सोनियाचा पैंजण । मुगुटमणि केला हीण ।
जयाचें कारण । तया ठायीं अळंकार ॥ ४ ॥
सेवका स्वामीसाठीं मान । त्याचें नाम त्याचें धन ।
तुका ह्मणे जाण । तुह्मी संत तदर्थीं ॥ ५ ॥

---

* पं. "जे जैसें करिती ते तैसें पावती । भोग ते भोगिती केले कर्मीं" ॥ हें कडवें जास्ती आहे.— १ त. अधिकार.— २ त. दे. पटपुत्रा सांभाळी.

॥ १२६ ॥

घरीं रांडा पोरें मरती उपवासीं । सांगे लोकांपासीं थोरपण ॥ १ ॥
नेऊनियां घरा दाखवावें काय । काळतोंडा जाय चुकावूनि ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मी जाणों त्या प्रमाण । ठकावे हे जन तैसे नहों ॥ ३ ॥

जोहार-अभंग ३.

॥ १२७ ॥

मायबाप जोहार । सारा साधावया आलों वेसकर ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मागील पुढील करा झाडा । नाहीं तरी खोडा घालिती जी ॥ ध्रु
फाकूं नका रुजू जालिया वांचून । सांगा जी कोण वेरीं तीं धण्या ॥२
आजि मायबाप करा तडामोडी । उद्यां कोणी घडी राहेना हो ॥ ३ ॥
तुका ह्मणे कांहीं न चले ते बोली । अखरते सालीं झाडा घेती ॥ ४ ॥

॥ १२८ ॥

येऊं द्या जी कांहीं वेसकरास । आंतून बाहेर वोजेचा घास ॥ १ ॥
जों यावें तों हात चि रिता नाहीं । कधीं तरीं कांहीं द्यावें घ्यावें ॥ २ ॥
तुका ह्मणे उद्यां लावीन ह्मनेरा । जे हे दारोदारांभोंवतीं फिरा ॥ ३ ॥

॥ १२९ ॥

देती घेती परज गेली । घर खालीं करूनियां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धांवणियाचे न पडे हातीं । खादली राती काळोखीं ॥ ध्रु ॥
अवघियांचें अवघें नेलें । कांहीं ठेविलें नाहीं मागें ॥ २ ॥
सोंग संपादुनि दाबिला भाव । गेला आधीं माव वरि होती ॥ ३ ॥
घराकडे पाहूं नये सें चि जालें । अमानत केलें दिवाणांत ॥ ४ ॥
आतां तुका कोणा न लगे चि हातीं । जाली ते निश्चिती बोलों नये ॥५
॥ ३ ॥

१त. जो हार माय बाप जोहार पं. मायबाप जोहार जी जोहार.—२ पं. धरिती धण्या.—३पं. मनेरा

॥ १३० ॥

शुकसनकादिकीं उभारिला बाहो । परिक्षितीला हो दिसां सातां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उठाउठी करी स्मरणाचा धांवा । धरवत देवा नाहीं धीर ॥ ध्रु ॥
त्वरा जाली गरुड टाकियेला मार्गें। द्रौपदीच्या लागें नारायणें ॥ २ ॥
तुका ह्मणे करी बहु च तांतडी । प्रेमाची आवडी लोभ फार ॥ ३ ॥

॥ १३१ ॥

बोलिलों तें कांहीं तुमचिया हिता । वचन नेणतां क्षमा कीजे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वाट दावी तया न लगे रुसावें। अतित्याई जीवें नाश पावे ॥ ध्रु ॥
निंब दिला रोग तुटाया अंतरीं । पोभाळितां वरि आंत चरे ॥ २ ॥
तुका ह्मणे हित देखण्यासि कळे । पडती आंधळे कूपा माजी ॥ ३ ॥

॥ १३२ ॥

माकडें मुठीं धरिले फुटाणे । गुंतले ते नेणे हात तेथें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय तो तयाचा लेखावा अन्याय। हित नेणे काय आपुलें तें ॥ ध्रु॥
शुकें नळिकेशीं गोवियेले पाय । विसरोनि जाय पक्ष दोन्ही ॥ २ ॥
तुका ह्मणे एक ऐसे पशुजीव । न चले उपाव कांहीं तेथें ॥ ३ ॥

॥ १३३ ॥

हरि तूं निष्ठुर निर्गुण । नाहीं माया बहु कठिण ।
नव्हे तें करिसी आन । कवणें नाहीं केलें तें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ घेऊनि हरिश्चंद्राचें वैभव । राज्य घोडे भाग्य सर्व ।
पुत्र पत्नी जीव । डोंबाघरीं वोपविलीं ॥ ध्रु ॥
नळा दमयंतीचा योग । विघडिला त्यांचा संग ।
ऐसें जाणे जग । पुराणें ही बोलती ॥ २ ॥

---

१ पं. लोभापर. त. लोभपर.—२ पं. शिणावें.

राजा शिबी चक्रवर्ती । कृपाळु दयां भूतीं ।
तुळविलें अंतीं । तुळें मास तयाचें ॥ ३ ॥
कर्ण भिडतां समरंगणीं । बाणीं व्यापियेला रणीं ।
मागसी पाडोनी । तेथें दांत तयाचे ॥ ४ ॥
बळी सर्वस्वें उदार । जेणें उभारिला कर ।
करूनि काहार । तो पाताळीं घातला ॥ ५ ॥
श्रियाळाच्या घरीं । धरणें मांडिलें मुरारी ।
मारविलें करीं । त्याचें बाळ त्याहातीं ॥ ६ ॥
तुज भावें जे भजती । त्यांच्या संसारा हे गति ।
ठाव नाहीं पुढती । तुका ह्मणे करिसी तें ॥ ७ ॥

॥ १३४ ॥

चाल केलासी मोकळा । बोल विठ्ठल वेळोवेळां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुज पापचि नाहीं ऐसें । नाम घेतां जवळी वसे ॥ ध्रु ॥
पंच पातकांच्या कोडी । नामें जळतां न लगे घडी ॥ २ ॥
केलीं मागें नको राहों । तुज जमान आह्मी आहों ॥ ३ ॥
करीं तुज जीं करवती । आणिक नामें घेऊं किती ॥ ४ ॥
तुका ह्मणे काळा । रीग नाहीं निघती ज्वाळा ॥ ५ ॥

॥ १३५ ॥

बाळ बापा ह्मणे काका । तरी तो कां निपराध ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जैसा तैसा भाव गोड । पुरवी कोड विठ्ठल ॥ ध्रु ॥
साकरेसि ह्मणतां धोंडा । तरी कां तोंडा न रुचे ॥ २ ॥
तुका ह्मणे आरुष बोल । नव्हे वोल आहाच ॥ ३ ॥

---

१ पं. दयाळु भूतीं.–२ पं. त्रासियेला.

॥ १३६ ॥

चित्तीं नाहीं तें जवळीं असोनि काय । वत्स सांडी माय तेणें न्यायें ॥१॥
प्रीतीचा तो वायु गोड लागे मात । जरी जाय चित्त मिळोनियां ॥ २ ॥
तुका ह्मणे अवघें फिकें भावाविण । मीठ नाहीं अन्न तेणें न्यायें ॥ २ ॥

॥ १३७ ॥

काय काशी करिती गंगा । भीतरिं चांगा नाहीं तो ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अधणीं कुचर बाहेर तैसा । नये रसा पाकासि ॥ ध्रु ॥
काय टिळे करिती माळा । भाव खळा नाहीं त्या ॥ २ ॥
तुका ह्मणे प्रेमें विण । बोले भुंके अवघा शीण ॥ ३ ॥

॥ १३८ ॥

शिंदळा साल्याचा नाहीं हा विश्वास । बाईल तो त्यास न विसंभे ॥ १ ॥
दुष्ट बुद्धि चोरी करी निरंतर । तो ह्मणे इतर लोक तैसे ॥ २ ॥
तुका ह्मणे जया चित्तीं जे वासना । तयाची भावना तयापरी ॥ ३ ॥

काला चेंडुफळी–अभंग १००.

॥ १३९ ॥

झेला रे झेला वरचेवर झेला । हातिचें गमावी तो पाठीं साहे टोला ॥ १ ॥
॥ध्रु.॥ त्रिगुणाचा चेंडू हातें झुगारी निराळा । वरिलिया मुखें मन लावीं तेथें डोळा ॥ ध्रु ॥
आगळा होऊनि धरी वरिचिया वरी । चपळ तो जिंके गांढ्या ठके येरझारीं २
हातीं सांपडलें उमें बैसों नेदी कोणी । सोरीमार्गे सोरी वेती ओणवें करूनि ॥ ३ ॥
डाई पडिलिया सोसी दुःखाचे डोंगर । पाठीवरी भार भोंवता ही उभा फेर ॥ ४ ॥
तुका ह्मणे सुख पाहे तयाचें आगळें । जिंकी तो हरवी कोणी एका तरी काळें ॥ ५

१ पं. जिंकीतो हरिसी.

॥ १४० ॥

अज्ञानि कां थीर पोरा न ह्मणसी किर। धरूनियां धीर लाजे बुर निघाला ॥१॥

ध्रु.मोकळा होतासि कां रे पडिलासि डाई। वरिलांचा भार आतां उतरेसा नाहीं॥

मेळवूनि मेळा एकाएकीं दिली मिठी। कवळिलें एक बहु बैसविलीं पाठीं॥ २ ॥

तळील तें वरी वरील तें येतें तळा। न सुटे तोंवरी येथें गुंतलिया खेळा॥ ३ ॥

सांडितां ठाव पुढें सईल धरी हात। चढेल तो पडेल ऐसी ऐका रे मात॥ ४ ॥

तुका ह्मणे किती आवरावे हात पाय। न खेळावें तोंच बरें वरी न ये डाय ॥ ५ ॥

कोडें---अभंग २.

॥ १४१ ॥

कोडें रे कोडें ऐका हें कोडें । उगवूनि फार राहे गुंतोनियां थोडें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ पुसतसे सांगा मी हें माझें ऐसें काई ।

रुसूं नका नुगवे तो ह्मवे आपुली आई ॥ ध्रु ॥

सांगतों हें मूळ काहीं न धरावी खंती । जालें जीवो मेलें मरो प्रारब्धा हातीं॥२॥

तुका ह्मणे अभिमान सांडावा सकळीं ॥ नये अंगावरी वांयां येऊं देऊं कळी ॥३॥

॥ १४२ ॥

नुगवे तें उगवून सांगितलें भाई। घालुनियां ताळा आतां शुद्ध राखा घाई॥१॥

॥ध्रु.॥ आतां कांहीं नाहीं राहिलें ।म्यां आपणा आपणम्पाहिलें ॥ ध्रु ॥

कमाईस मोल येथें नका रीस मानूं। निवडूं नये मज कोणा येथें वानूं॥ २ ॥

तुका ह्मणे पदोपदीं कान्हो वनमाळी । जयेजत मग सेवटिला एक वेळीं ॥३॥

॥ १४३ ॥

हेरुष आनंदाचा । घोष करा हरिनामाचा ।

कोण हा दैवाचा । भाग पावे येथील ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ पुण्य पाहिजे बहुत । जन्मांतरींचें संचित ।

---

१ दे. ज्यालें ज्यवो. त. ज्यालें जेवो.— २ दे. त. हारस.—३ दे. उरी कांहीं.

होईल करीत । आला अधिकारी तो ॥ ५ ॥
काय पाहातां हे भाई । हरुषें नाचा धरा घाई
पोटभरी कांहीं । घेतां उरी न ठेवा ॥ २ ॥
जें सुख दृष्टी आहे । तें च अंतरीं जो लाहे ।
तुका ह्मणे काय । कळिकाळ तें बापुडें ॥ ३ ॥

॥ १४४ ॥

अवघे गोपाळ ह्मणती या रे करूं काला ।
काय कोणाची सिदोरी ते पाहों द्या मला ॥
नका कांहीं मागें पुढें रे ठेवूं [1]खरें च बोला ।
वंची वंचला तो चि रे येथें भोवंडा त्याला ॥ १
॥ ध्रु. ॥ घेतल्या वांचून झाडा रे नेदी आपुलें कांहीं
एकां एक ग्वाही बहुत देती मोकळें नाहीं ।
ताक सांडी येर येर रे काला भात भाकरी दहीं ।
आलें घेतो मध्यें बैसला नाहीं आणवीत तें ही ॥ ५ ॥
एका नाहीं धीर तांतडी दिल्या सोडोनि मोटा ।
एक सोडितील गांठी रे एक चालती वाटा ।
एक उभा भार वाहोनि पाहे उगा चि खोटा ।
एक तें करूनि आराले आतां ऐसें चि घाटा ॥ २ ॥
एकीं स्थिराविल्या गाई रे एक वळल्या देती ।
एकांच्या फांकल्या वोढाळा फेरे भोंवतीं घेती ।
एकें चाराबोरा गुंतलीं नाहीं जीवन चित्तीं ।
एक एका चला ह्मणती एक हुंबरी घेती ॥ ३ ॥
एकीं एकें वाटा लाविलीं भोळीं नेणतीं मुलें ।

---

१ पं. तुह्मी खरें च बोला.

आपण घरींच गुंतले माळा नासिलीं फुलें ।
गांठीचें तें सोडूं नावडे खाय आइतें दिलें ।
सांपडलें वेठी वोढी रे भार वाहातां मेलें ॥ ४ ॥
एक ते माया गुंतले घरीं बहुत काम ।
वार्ता ही नाहीं तयाची तया कांहीं च ठावें ।
जैसें होतें शिळें संचित तैसें लागलें खावें ।
हातोहातीं गेलें वेचुनि मग पडिलें ठावें ॥ ५ ॥
एकीं हातीं पायीं पेटे रे अंगीं लाविल्या राखा ।
एक ते सोलिव बोडके केली सपाट शिखा ।
एकते आळसी तळीं रे वरी वाढिल्या काखा ।
सिदोरी वांचून बुद्धि रे केला अवघ्यां वाखा ॥ ६ ॥
तुका ह्मणे आतां कान्होबा आह्मां वांटोनि द्यावें ।
आहे नाहीं आह्मांपाशीं तें तुज अवघें चि ठावें ।
मोकलितां तुह्मी शरण आह्मी कवणासि जावें ।
कृपावंतें कृपा केली रे पोट भरे तों खावें ॥ ७ ॥

॥ १४५ ॥

बैसवुनि फेरी । गडियां मध्यभागीं हरी ।
अवघियांचें करी । समाधान सारिखें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पाहे तो देखे समोर । भोगी अवघे प्रकार ।
हरुषें झेली कर । कवळ मुखीं देती ते ॥ ध्रु ॥
बोले बोलतिया सवें । देतील तें त्यांचें घ्यावें ।
एक एका ठावें । येर येरा अदृश्य ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । बहु आवडीचा हेवा ।

१पं. दे. पट.

कोणाचिया जीवा । वाटों नेदी विषम ॥ ३ ॥

॥ १४६ ॥

आह्मां निकट वासें । कळों आलें जैसें तैसें ।
नाहीं अनारीसें । कान्होबाचे अंतरीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पीडती आपुल्या भावना । जैसी जयाची वासना ।
कर्माचा देखणा । पाहे लीळा कौतुक ॥ छ ॥
खेळ खेळे न पडे डाई । ज्याचा भार त्याच्या ठायीं ।
कोणी पडतील डाई । कोणी कोडीं उगवीती ॥ २ ॥
तुका ह्मणे कवळ । हातीं घेऊनि गोपाळ ।
देतो ज्यांचें बळ । त्यांसि तैसा विभाग ॥ ३ ॥

॥ १४७ ॥

काम सारूनि सकळ । आले अवघे गोपाळ ।
जाली आतां वेळ । ह्मणती आणा सिद्दोऱ्या ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देती आपुलाला झाडा । गाई बैसविल्या वाडां ।
दोंदिल बोबडा । वांकड्याचा हरि मेळीं ॥ छ ॥
आपुलालिये आवडी । मुदा बांधल्या परवडी ।
निवडूनियां गोडी । हरि मेळवी त्यांत तें ॥ २ ॥
भार कागविला खांदीं । नव्हती मिळाली जों मांदी ।
सकळांचे संदी । वोझीं अवघीं उतरलीं ॥ ३ ॥
मागे जो तांतडी । त्यासि रागा येती गडी ।
तुझी कां रे कुडी । येथें मिथ्या भावना ॥ ४ ॥
एक एकाच्या संवादें । कैसे धाले ब्रह्मानंदें[1] ।
तुका ह्मणे पदें । यारे वंदूं हरीचीं ॥ ५ ॥

---

१ पं. परमानंदें.

॥ १४८ ॥

यमुनें पाबळीं । गडियां बोले वनमाळी ।
आणा सिदोऱ्या सकळी । काला करूं आजी ।
अवघें एके ठायीं । करूनि स्वाद त्याचा पाहीं ।
मजपाशीं आहे तें ही । तुह्मामाजी देतों ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणती बरवें गोपाळ । ह्मणती बरवें गोपाळ ।
वाहाती सकळ । मोहरी पांवे आनंदें ।
खडकीं सोडियेल्या मोटा । अवघा केला एकवटा ।
काला करूनियां वांटा । गडियां देतो हरि ॥ ध्रु ॥
एकापुढें एक । घाली हात पसरी मुख ।
गोळा पांवे तया सुख । अधिक चि वाटे ।
ह्मणती गोड जालें । ह्मणती गोड जालें ।
[१]आणिक देईं । नाहीं पोट धालें ॥ २ ॥
हात नेतो मुखापासीं । एर आशा तोंड वासी ।
खाय आपण तयासी । दावी वांकुलिया ।
देऊनियां मिठी । पळे लागतील पाठीं ।
धरूनि काढितील ओठीं । मुखामाजी खाती ॥ ३ ॥
ह्मणती ठकडा रे कान्हा । लावी घांसा भरी राणा ।
दुम करितो शहाणा । पाठोवाठीं तयाच्या ।
अवघियांचे खाय । कवळ कृष्णा माझी माय ।
सुरवर ह्मणती हाय हाय । सुखा अंतरलों ॥ ४ ॥

---

१ पं. आणीक देईं घालें ॥ नाहीं पोट आमुचें ॥

एक एका मारी । ढुंगा पाठी तोंडावरी ।
गोळा न साहवे हरि । ह्मणे पुरे आतां ।
येतो काकुलती । गोळा न साहवे श्रीपती ।
ह्मणे खेळों आतां नीती । सांगों आदरिलें ॥ ५ ॥
आनंदाचे फेरी । माजी घालुनियां हरी ।
एक घालिती हुंबरी । वाती सिंगें पांवे ।
वांकडे बोबडे । खुडे मुडे एक लुडे ।
कृष्णा आवडती पुढें । बहु भाविक ते ॥ ६ ॥
करी कवतुक । त्यांचें देखोनियां मुख ।
हरी वाटतसे सुख । खदखदां हांसे ।
एक एकाचें उच्छिष्ट । खातां न मानिती वीट ।
केलीं लाजतां ही धीट । आपुलिया संगें ॥ ७ ॥
नाहीं ज्याची गेली भुक । त्याचें पसरवितो मुख ।
अवघियां देतो सुख । सारिखें चि हरी ।
ह्मणती भला भला हरी । तुझी संगती रे बरी ।
आतां चाळविसी तरी । न वजों आणिकां सवें ॥ ८ ॥
गाई विसरल्या चार । पक्षी श्वापदांचे भार ।
जालें यमुनेचें स्थिर । जळ वाहों ठेलें ।
देव पाहाती सकळ । मुखें घोटूनियां लाळ ।
धन्य ह्मणती गोपाळ । धिग जालों आह्मी ॥ ९ ॥
ह्मणती कैसें करावें । ह्मणती कैसें करावें ।
यमुनाजळीं व्हावें । मत्स्य शेष घ्यावया ।

सुरवरांचे थाट । भरलें यमुनेचें तट ।
तंव अधिक ची हौंट । मटमटां वाजवी ॥ १० ॥
आनंदें सहित । क्रीडा करी गोपीनाथ ।
ह्मणती यमुनेंत हात । नका धुऊं कोणी ।
ह्मणती जाणे जीवींचें । ह्मणती जाणे जीवींचें ।
लाजे त्यास येथें कैचें । शेष कृष्णाचें ।
लाभ थोरिवे ॥ ११ ॥
धन्य दिवस काळ । आजी पावला गोपाळ ।
ह्मणती धालों रे सकळ । तुझिया नि हातें ।
मानवले गडी । एक एकांचे आवडी ।
दहीं खादलें परवडी । धणीवरी आजी ॥ १२ ॥
तुझा संग बरवा । नित्य आह्मां द्यावा ।
ऐसें करूनि जीवा । नित्य देवा चालावें ।
तंव ह्मणे वनमाळी । घ्यारे काठिया कांबळी ।
आतां जाऊं खेळीमेळीं । गाई चारावया ॥ १३ ॥
तुका ह्मणे प्रेमें धालीं । कोणा न साहवे चाली ।
॥ गाई गोपाळांसि केली । आपण यांसरी ॥ १४ ॥
आजि जाला आनंद । आजि जाला आनंद ।
चाले परमानंद । सर्वे आह्मांसहित ॥ १५ ॥

॥ १४९ ॥

या हो या चला जाऊं सकळा।पाहों हा सोहळा आजि वृंदावनींचा॥१॥
॥ धु. ॥ वाइला गोपाळें वेणुनाद पडे कानीं । धीर नव्हे मनीं चित्त जालें
चंचळ ॥ २ ॥

उरलें तें सांडा काम नका करूं गोवी। हे चि वेळ ठावी मज कृष्णभेटीची ॥२
निवतील डोळे याचें श्रीमुख पाहातां । बोलती तें आतां घरचीं सोसूं वाईट ॥ ३ ॥
कृष्णभेटीआड कांहीं नावडे आणीक। लाज तरी लोक मन जालें उदास॥४
एकाएकीं चालियेल्या सादावीत सवें। तुका ह्मणे देवें रूपें केल्या तन्मय ॥ ५

फुगड्या--अभंग २.

॥ १५० ॥

फुगडी फू फुगडी घालितां उघडी राहे। लाज सांडोनि एक एकी पाहे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ फुगडी गे अवघें मोडी गे। तरीच गोडी गे संसार तोडी गे॥ध्रु॥
मागें जें शिकली होतीस पोटीं। तें चि विचारूनि आतां उच्चारी ओठीं २ ॥
त्रिगुणांची वेणी तुझे उडते पाठीं। सावरूनि धरी घाली मूळबंदीं गांठी ॥३
आगळें पाउल जिंके एकाएक। पावसी मान हे मानवती तिन्ही लोक ॥४॥
तुका ह्मणे तुजमजमध्यें एक भाव। सम तुकें बार घेऊं पावों उंच ठाव॥ ५

॥ १५१ ॥

फुगडी फू सवती माझे तूं। हागुनि भरलें धू तुझ्या ढुंगा तोंडावरि थू॥१॥
॥ ध्रु. ॥ फुगडी घेतां आली हरी। ऊठ जावो जगनोवरी ॥ ध्रु ॥
हात पाय बेंबळ जाती । ढुंगण घोळितां लागे माती ॥ २ ॥
सात पांच आणिल्या हरी । वांचुनी काय तगसी पोरी ॥ ३ ॥
सरला दम पांगले पाय । आझुनि वरी घोळिसी काय ॥ ४ ॥
तुका ह्मणे आझुन तरी । सांगितलें तें गधडी करी ॥ ५ ॥

लखोटा--अभंग १. ॥ २ ॥

॥ १५२ ॥

लये लये लखोटा । मूळबंदि कासोटा ।
॥ १ भावा केलें साहें। आतां माझें पाहें ॥ १ ॥

---
१ पं. न साहे.

हातोहातीं गुंतली । जीवपणा मुकली ।
धीर माझा निका । सांडीं बोल फिका ॥ २ ॥
अंगीकारी हरि । नको पडों फेरी ।
लाज धरीं भांडे । जग झोडी रांडे ॥ ३ ॥
बैस भावा पाठीं । ऐक माझ्या गोष्टी ।
केला सांडीं गोहो । येथें धरीं मोहो ॥ ४ ॥
पाठमोरा डोल । आवरी तें बोल ।
पांगलीस बाळा । पुढें अवकळा ॥ ५ ॥
आतां उभी ठायीं । उभाउभीं पाहीं ।
नको होऊं डुकरी । पुढें गाढव कुतरी ॥ ६ ॥
नाम केलें खरें । आपुलें म्या बरें ।
तुका ह्मणे येरी । पांगविल्या पोरी ॥ ७ ॥

हुंबरी—अभंग १.

॥ १५३ ॥

तुह्मीं कोण घाली हुंबरी । साही पांगल्या अठरा चारी ॥ ध्रु ॥
सहस्र मुखावरी हरी । शेष शिणविलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ चेंडुवासवें घातली उडी । नाथिला काळिया देऊनि बुडी॥२॥
अशुद्ध पितां करुणा नाहीं । तुवां माउशी ही मारियेली ॥ ३ ॥
रावणाचें घर बुडविलें सारें । त्याचीं रांडापोरें मारियेलीं ॥ ४ ॥
जाणों तो ठावा आहेसि आह्मां । तुवां आपुला मामा मारियेला ॥ ५॥
याशीं खेळतां नाश थोरू । तुकयास्वामी सारंगधरू ॥ ६ ॥

हमामा—अभंग २. ॥ १ ॥

॥ १५४ ॥

मशीं पोरा वे रे बार । तुझें बुजीन खालील द्वार ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ पोरा हमामा रे हमामा रे ॥ ध्रु ॥
मशीं हमामा तूं घालीं । पोरा वरी सांभाळीं खालीं ॥ २ ॥
तरी च मशीं बोल । पोरा जिव्हाळ्याची ओल ॥ ३ ॥
मशीं घेतां भास । जीवा मीतूंपणा नास ॥ ४ ॥
मज सर्वे खरा । पण जाऊं नेदी घरा ॥ ५ ॥
आमुचिये रंगीं । दुजें तगेना ये संगीं ॥ ६ ॥
तुक्यासवें भास । हरी जीवा करी नास ॥ ७ ॥

॥ १५५ ॥

हमामा रे पोरा हमामा रे ·। हमामा घालितां ठकलें पोर ।
करी येरझार चौऱ्याशीची ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पहिले पहारा रंगासि आलें । सोहं सोहं सें बार घेतलें॥
देखोनि गंडी तें विसरलें । डाई पडिलें आपणची ॥ ध्रु ॥
दुसऱ्या पहारा महा आनंदें । हमामा घाली छंदछंदें ।
दिस वाढे तों गोड वाटे । परि पुढें नेणे पोर काय होतें तें ॥ २ ॥
तिसऱ्या पहारा घेतला बार । अहंपणें पाय न राहे स्थिर ।
सोस सोस करितां डाई पडसी । सत्य जाणें हा निर्धार ॥ ३ ॥
चौथ्या पहारा हमामा । घालिसी कांपविसी हातपाय ।
सुर्‍यापाटिलाचा पोर यम । त्याचे पडसील डाई॥ ४ ॥
हमामा घालितां भ्याला तुका त्यानें सांडिली गड्याची सोई।
यादवांचा मूल एक विठोबा त्यासवें चारितो गाई ॥ ५ ॥

गाई—अभंग १. ॥ २ ॥

॥ १५६ ॥

आह्मां घरीं एक गाय दुभताहे । पान्हा न समाये त्रिभुवनीं ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ वान ते सांवळी नांव तें श्रीधरा । चरे वसुंधरा चौदा भुवनें ॥ ध्रु ॥
वत्स नाहीं माय भलत्या सवें जाय । कुर्वाळी तो लाहे भावभरणा ॥२॥
चहूं धारीं क्षीर वोळली अमुप । धाले सनकादिक सिद्ध मुनी ॥ ३ ॥
तुका ह्मणे माझी भूक तेथें काय । जोगाविते माय तिन्ही लोकां ॥ ४॥

कांडण--अभंग २. ॥ १ ॥

॥ १५७ ॥

सिद्ध करूनियां ठेविलें कांडण । मज सांगातीण शुद्ध बुद्धि गे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आठव हा धरीं मज जागें करीं । मागिले पाहारीं सेवटिचा गे॥ध्रु
सम तुकें घाव घालीं वो साजणी ॥ मी तुजमिळणी जंव मिळें ॥ २ ॥
एक कशी पाखडी दुसरी निवडी । निःशेष तिसडी ओज करी ॥ ३ ॥
सरलें कांडण पाकसिद्धि करी । मेळवण क्षिरीसाकरेचें ॥ ४ ॥
उद्धव अक्रूर बंधु दोघेजण । बाप नारायण जेवणार ॥ ५ ॥
तुका ह्मणे मज माहेरीं आवडी । ह्मणोनि तांतडी मूळ केलें ॥ ६ ॥

॥ १५८ ॥

सावडीं कांडण ओवी नारायण । निवडे आपण भूस सार ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मुसळ आधारीं आवरूनि धरीं । सांवरोनि थिरीं घाव घालीं॥ध्रु॥
वाजती कांकणें अनुहात गजरें । छंद माहियेरे गाऊं गीति ॥ २ ॥
कांडितां कांडण नव्हे भाग शीण । तुजमजपण निवडे तों ॥ ३ ॥
तुका ह्मणे रूप उमटे आरिसा । पाक त्या सरिसा शुद्ध जाला ॥ ४ ॥

आडसण दळण--अभंग १. ॥ २ ॥

॥ १५९ ॥

शुद्धीचें सारोनि भरियेली पाळी । भरडोनि वोंगळी नाम केलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आडसोनि शुद्ध करीं वो साजणी । सिद्ध कां पापिणी नासियेलें ॥ध्रु॥
सुपीं तों चि पाहें धड उगटिलें । नव्हतां नासिलें जगझोडी ॥ २ ॥

सुपीं तों चि आहे तुज तें आधीन । दळिल्या जेवण जैसें तैसें ॥ ३ ॥
सुपीं तों चि संग घेई धडफुडी । एकसा गधडी नास केला ॥ ४ ॥
दळितां आदळे तुज कां न कळे । काय गेले डोळे कान तुझे ॥ ५ ॥
सुपीं तों चि वोज न करितां सायास । पडसी सांदीस तुका ह्मणे ॥ ६ ॥

दळण---अभंग १. १.

॥ १६० ॥

शुद्ध दळणाचें सुख सांगों काई । मानवित सईबाई तुज ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ शुद्ध तें वळण लवकरी पावे । डोलवितां निवे अष्टांग तें ॥ ध्रु ॥
शुद्ध हें जेवितां तन निवे मन । अल्प त्या इंधन बुडा लागे ॥ २ ॥
शुद्ध त्याचा पाक सुचित चांगला । अविट तयाला नाश नाहीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे शुद्ध आवडे सकळां । भ्रतार वेगळा न करी जीवें ॥ ४ ॥

॥ १६१ ॥ १.

उपज़ोनियां पुढती येऊं । काला खाऊं दहींभात ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वैकुंठीं तों ऐसें नाहीं । कवळ कांहीं काल्याचें ॥ ध्रु ॥
एकमेकां देऊं मुखीं । सुखीं घालूं हुंबरी ॥ २ ॥
तुका ह्मणे वाळवंट । बरवें नीट उत्तम ॥ ३ ॥

॥ १६२ ॥

याल तर या रे लागें । अवघे माझ्या मागें मागें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आजि देतों पोटभरी । पुरे ह्मणाल तोंवरी ॥ ध्रु ॥
हळू हळू चला । कोणी कोणाशीं न बोला ॥ २ ॥
तुका ह्मणे सांडा घाटे । तेणें नका भरूं पोटें ॥ ३ ॥

॥ १६३ ॥

शिंकें लावियेलें दुरी । होतों तिघांचे मी वरी ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ तुह्मी व्हारे दोहींकडे । मुख पसरूनि गडे ॥ ध्रु ॥
वाहाती त्या धारा । घ्यारे दोहींच्या कोंपरा ॥ २ ॥
तुका ह्मणे हातीं टोका । अधिक उणें नेदी एका ॥ ३ ॥

॥ १६४ ॥

पळाले ते भ्याड । त्यांसि येथें जाला नाड ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धीट घेती धणीवरी । शिंकीं उतरितो हरी ॥ ध्रु ॥
आपुलिया मतीं । पडलीं विचारीं तीं रितीं ॥ २ ॥
तुका लागे घ्यारे पांयां । कैं पावाल या ठाया ॥ ३ ॥

॥ १६५ ॥

धालें मग पोट । केला गड्यांनीं बोभाट ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ये रे ये रे नारायणा । बोलों अबोलण्या खुणा ॥ ध्रु ॥
खांद्यावरी भार । तीं शिणती बहु फार ॥ २ ॥
तुकयाच्या दातारें । नेलीं सुखी केलीं पोरें ॥ ३ ॥

॥ १६६ ॥

पाहाती गौळणी । तंव पालथी दुधाणी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणती नंदाचिया पोरें । आजि चोरी केली खरें ॥ ध्रु ॥
त्याविण हे नासी । नव्हे दुसरिया ऐसी ॥ २ ॥
सर्वें तुका मेळा । त्याणें अगुणा आणिला ॥ ३ ॥

॥ १६७ ॥

आतां ऐसें करूं । दोघां धरूनियां मारूं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मग टाकिती हे खोडी । तोंडीं लागली ते गोडी ॥ ध्रु ॥

कोंडूं घरामधीं । न बोलोनि जागों बुद्धी ॥ २ ॥
बोलावितो देवा । तुका गडियांचा मेळावा ॥ ३ ॥

॥ १६८ ॥

गडी गेले रडी । कान्हो नेदीस तूं चढी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आह्मी न खेळों न खेळों । आला भाव तुझा कळों ॥ ध्रु ॥
न साहावे भार । बहु लागतो उशीर ॥ २ ॥
तुका आला रागें । येऊं नेदी मागें मागें ॥ ३ ॥

हाल-अभंग २.

॥ १६९ ॥

यमुनेतटीं मांडिला खेळ । ह्मणे गोपाळ गडियांसि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हाल महाहाल मांडा । वाउगी सांडा मोकळी ॥ ध्रु ॥
नांवें ठेवूनि वांटा गडी । न वजे रडी मग कोणी ॥ २ ॥
तुका ह्मणे कान्हो तिळतांदळ्या । जिंके तो करी आपुला खेळ्या ॥३ ॥

॥ १७० ॥

बळें डाई न पडे हरी । बुद्धि करी शाहणा तो ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मोकळें देवा खेळों द्यावें । सम भावें सांपडावया ॥ ध्रु ॥
येतो जातो वेळोवेळां । न कळे कळा सांपडती ॥ २ ॥
तुका ह्मणे धरा ठायींच्या ठायीं । मिठी जीवीं पायीं घालुनियां ॥ ३ ॥

सुतुतू-अभंग १. ॥ २ ॥

॥ १७१ ॥

जीवशिवाच्या मांडूनि हाला । अहं सोहं दोन्ही भेडती भला ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ घाली सुतुतू फिरोनि पाही आपुणासि ।
पाही बळिया तो मागिला तुटी पुढिलासि ॥ ॥ ध्रु ॥
खेळिया तो हाल सांभाळी । धुम घाली तो पडे पाताळीं ॥ २ ॥
बळिया गांढ्या तो चि खेळे । दम पुरे तो वेळोवेळां खेळे ॥ ३ ॥
हातीं पडे तो चि ढांग । दम पुरे तो खेळिया चांग ॥ ४ ॥
मागें पुढें पाहे तो जिंके । हातीं पडे तो चि आधार फिके ॥ ५ ॥
आपल्या बळें खळे रे भाई । गडियाची सांडोनि सोई ॥ ६ ॥
तुका ह्मणे मी खेळिया नव्हें । जिकडे पडें त्या चि सवें ॥ ७ ॥

॥ १७२ ॥ १.

अनंत ब्रह्मांडें उदरीं । हरि हा बाळक नंदा घरीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नवल केव्हडें केव्हडें । न कळे कान्होबाचें कोडें ॥ ध्रु ॥
पृथ्वी जेणें तृप्त केली । त्यासि यशोदा भोजन घाली ॥ २ ॥
विश्वव्यापक कमळापती । त्यासि गौळणी कडिये घेती ॥ ३ ॥
तुका ह्मणे नटधारी । भोग भोगून ब्रह्मचारी ॥ ४ ॥

॥ १७३ ॥

कृष्ण गोकुळीं जन्मला । दुष्टां चळकांप सुटला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ होतां कृष्णाचा अवतार ॥ आनंद करिती घरोघरं ॥ ध्रु ॥
प्रेमें नाम वाचें गाती । सदा आनंदें नाचती ॥ २ ॥
तुका ह्मणे हरती दोष । आनंदानें करिती घोष ॥ ३ ॥

॥ १७४ ॥

मेळउनि सकळ गोपाळ । कांहीं करिती विचार ॥ १ ॥

---

१ पं. सदा नाम वाचें गाती ॥ प्रेमें आनंदें नाचती.